।। विद्या अमृतम् अश्नुते ।।

सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे
# कला व वाणिज्य महाविद्यालय

## पाचल - रायपाटण

**नॅक पुनर्मूल्यांकन 'बी' श्रेणी**

# सह्यगिरी

२०१८-१९

**प्रा. प्रमोद एस. मेश्राम**
संपादक

**डॉ. खंडू महादू कोतवाल**
प्राचार्य

## संपादक मंडळ

### अध्यक्ष

**प्राचार्य**
**डॉ. खंडू महादू कोतवाल**

### मुख्य संपादक

**प्रा. प्रमोद एस. मेश्राम**

### सहसंपादक

**प्रा. एन. जी. देवन**
**प्रा. डॉ. एस. एस. वाघमारे**

### विद्यार्थी सदस्य

**कु. पूजा कोलते**
**कु. प्रज्ञा मांजरे**



(खासगी वितरणासाठी)

**टिप –** या अंकातील साहित्याशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही.

# प्रकटन

**फॉर्म नं ०४ ( उपविधी क्र. ८ )**

| | | |
|---|---|---|
| **प्रकाशन स्थळ** | - | श्री. मनोहर हरी खापणे<br>कला व वाणिज्य महाविद्यालय,<br>पाचल – रायपाटण,<br>मु. पो. रायपाटण, ता. राजापूर,<br>जि. रत्नागिरी – पिन ४१६ ७०४ |
| **प्रकाशन काल** | - | वार्षिक |
| **मुद्रक** | - | स्वरूपानंद प्रिंटींग सर्व्हिसेस, लांजा |
| **प्रकाशक** | - | **प्राचार्य डॉ. खंडू महादू कोतवाल** |
| **राष्ट्रीयत्व** | - | भारतीय |
| **पत्ता** | - | श्री. मनोहर हरी खापणे<br>कला व वाणिज्य महाविद्यालय,<br>पाचल – रायपाटण,<br>मु. पो. रायपाटण, ता. राजापूर,<br>जि. रत्नागिरी – पिन ४१६७०४ |
| **संपादक** | - | **प्रा. प्रमोद एस. मेश्राम** |
| **राष्ट्रीयत्व** | - | भारतीय |
| **पत्ता** | - | श्री. मनोहर हरी खापणे<br>कला व वाणिज्य महाविद्यालय,<br>पाचल – रायपाटण,<br>मु. पो. रायपाटण, ता. राजापूर,<br>जि. रत्नागिरी – पिन ४१६७०४ |
| **प्रकाशकीय हक्क** | - | **प्राचार्य,**<br>श्री. मनोहर हरी खापणे कला व<br>वाणिज्य महाविद्यालय,<br>पाचल–रायपाटण, ता. राजापूर,<br>जि. रत्नागिरी, पिन ४१६७०४ |

वर दिलेला तपशील आमच्या माहितीप्रमाणे खरा आहे.

# हार्दिक शुभेच्छा !

# मा. श्री. मनोहरजी खापणे



# लिओ शिपिंग एजन्सी



१३०२, १३ वा मजला, रिअल टेक पार्क,
प्लॉट नं. ३९/२, सेक्टर-३० अे, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.
फोन नं. ०२२-२७८१४९२२/२३/२४
फॅक्स - ०२२-२७८१ ६३६३
इ-मेल - info@leoshipping.in

## सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय

पाचल - रायपाटण, मु. पो. रायपाटण,

ता. राजापूर, जि. रत्नागिरी, पिन - ४१६७०४

## प्राध्यापक वृंद

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **डॉ. के. एम. कोतवाल, प्राचार्य** | - | एम. कॉम., डी. एच. ई, एम.फिल., पीएच. डी. |
| २. | **प्रा. डॉ. ए. डी. पाटील** | - | एम.ए., पीएच. डी., इतिहास |
| ३. | **प्रा. पी. एस. मेश्राम** | - | एम. ए. (नेट) इतिहास |
| ४. | **प्रा. एस. व्ही. निंबाळकर** | - | एम. ए., एम.एड., एम.फिल., हिंदी |
| ५. | **प्रा. एस. एस. धोंगडे** | - | एम. ए., हिंदी |
| ६. | **प्रा. व्ही. एस. पाटील** | - | एम. ए., बी.एड., (नेट) मराठी |
| ७. | **प्रा. डॉ. बी. टी. दाभाडे** | - | एम. ए., पीएच. डी., मराठी |
| ८. | **प्रा. एन. जी. देवन** | - | एम. ए., इंग्रजी |
| ९. | **प्रा. एम. आर. कोंडागुर्ले** | - | बी.ए., एम. लिब., (नेट, सेट) (ग्रंथपाल) |
| १०. | **प्रा. बी. ए. कश्यप** (हंगामी) | - | एम. कॉम., एम. फिल., जी.डी.सी. ॲन्ड ए., कॉमर्स |
| ११. | **प्रा. डॉ. एस. एस. वाघमारे** (हंगामी) | - | एम.ए., बी.एड., एम. फिल., पीएच. डी., अर्थशास्त्र |
| १२. | **प्रा. एस. व्ही. चव्हाण** (हंगामी) | - | एम. कॉम. अकौंटंसी |

## प्रशासकीय कर्मचारी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **श्री. नरेश बापू पाचलकर** | - | मुख्य लिपिक |
| २. | **श्री. राजेश अंबाजी चव्हाण** | - | वरिष्ठ लिपिक |
| ३. | **श्री. संदीप लक्ष्मण सक्रे** | - | कनिष्ठ लिपिक |
| ४. | **सौ. स्नेहा विकास कोलते** | - | ग्रंथालय परिचर |
| ५. | **श्री. संतोष महादेव पालकर** | - | शिपाई |
| ६. | **श्री. मधुकर भिकाजी साटम** | - | शिपाई |
| ७. | **श्री. भगवान तुकाराम जाधव** | - | शिपाई |
| ८. | **श्री. गुलाब हरी मदगे** | - | शिपाई |



# संपादकीय...



महाविद्यालयाच्या यशाचे प्रतिबिंब असलेला 'सह्यगिरी' वार्षिकांक आपल्या हाती देतांना आनंद होत आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा आविष्कार म्हणजेच 'सह्यगिरी' होय. मागील वर्षभरात प्राध्यापकांनी, विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती करीत मानाचे स्थान प्राप्त केल्याचे यामधून दिसून येईल.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना निसर्गरम्य परिसरात ज्ञानाचे अखंड कार्य एखाद्या गुरुकुलाप्रमाणे करुन त्यांना वेगवेगळया योजनांची माहिती दिली जाते. यातूनच विद्यार्थ्यांचे कलागुण विकसीत होत असतात. महाविद्यालयात होत असलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांची मते अभिव्यक्त होत असतात. विद्यार्थ्यांमध्ये सर्वोच्च ज्ञानप्राप्तीची लालसा आजही दिसून येते. शिक्षणाचे स्वरुप जरी संगणकामुळे बदलले असले तरी, सामाजिक सुधारणेची, समाजात बदल घडवून आणण्याची किमया विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या लेखातून दिसून येते. आमच्या विद्यार्थ्यांनी असे प्रश्न हाताळून त्या प्रश्नांना बोलके केले असल्याचे आपल्याला दिसेल.

उच्च शिक्षणातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होत असतो. त्याचबरोबर कला, क्रीडा, संगणक, निबंध, वक्तृत्व, वाद-विवाद, राष्ट्रीय सेवा योजना, आजीवन अध्ययन विस्तार कक्ष, स्पर्धा परीक्षा, महिला विकास कक्ष, सांस्कृतिक विभाग या व अशा अनेक उपक्रमातून विद्यार्थ्यांमधील कलागुण विकसित केले जातात. एवढेच नाही तर राष्ट्रप्रेम, समाजसेवा, सामाजिक बांधिलकीही विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांतून निर्माण केली जाते.

'नॅक' पुनर्मूल्यांकनात 'बी' श्रेणी प्राप्त केल्यानंतर महाविद्यालयाच्या यशाचा आलेख प्रगतीपथावर असल्याचे दिसून येते. महाविद्यालय प्रगतीच्या क्षितीजावर आरुढ होत असताना त्याकामी संस्थाध्यक्ष मा. मनोहरजी खापणे साहेब व संचालक मंडळ वेळोवेळी मार्गदर्शन करीत असतात.

मुंबई विद्यापीठाच्या परीक्षेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. प्राध्यापकांनी पीएच.डी. प्राप्त करुन संशोधनाच्या क्षेत्रात महाविद्यालयाचा लौकिक वाढविला आहे.

म. जोतीबा फुले यांनी बहुजन विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्याचा शुभारंभ करुन त्यांच्यात शिक्षणाची कास निर्माण केली. तेच कार्य संस्थेच्या माध्यमातून होत आहे. शैक्षणिक क्रांतीतून भारताला बलशाली बनविण्याचे कार्य सर्वांच्या सहकार्यातून होत आहे. त्यामुळे आमचे अनेक विद्यार्थी मिलिटरी, पोलीस, प्राध्यापक, शिक्षण, बँक अशा अनेक क्षेत्रांत कार्यरत असल्याचे दिसून येते.

सर्व संपादक मंडळाने दिलेल्या सहकार्यातूनच 'सह्यगिरी' वार्षिकांक पूर्णत्वास आला. तरीसुद्धा वाचकांच्या प्रतिक्रिया मोलाच्या ठरतील, त्या नेहमी सुधारणेसाठी आवश्यक ठरतील. 'सह्यगिरी' वार्षिक अंकाच्या निर्मितीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले मिळाले. सर्व प्राध्यापक, संपादक मंडळ, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी या सर्वांचे सहकार्य लाभले. त्याचबरोबर कमी वेळेत उत्कृष्ट छपाईचे काम करणारे श्री. अतुल पत्की व त्यांचे सर्व सहकारी यांच्यामुळेच 'सह्यगिरी' अंक पूर्णत्वास आला. त्याबद्दल मी सर्वांचा मन:पूर्वक ऋणी आहे.

धन्यवाद !



**प्रा. प्रमोद एस. मेश्राम**

संपादक

# भावपूर्ण श्रद्धांजली !

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षामध्ये
जे देशभक्त, स्वातंत्र्यसेनानी,
थोर नेते, धारातीर्थी पडलेले जवान, लेखक,
संशोधक, कवी, साहित्यिक, कलावंत, शास्त्रज्ञ,
खेळाडू, राजकीय, सामाजिक कार्यकर्ते,
शेतकरी, हितचिंतक दिवंगत झाले, तसेच
नैसर्गिक आपत्तीत मृत पावलेल्या ज्ञात-अज्ञात व्यक्ती
यांना नम्रतापूर्वक अभिवादन करुन भावपूर्ण श्रद्धांजली
अर्पण करण्यात येत आहे.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो ही
ईश्वरचरणी प्रार्थना !





*अपयश नावाच्या रोगासाठी आत्मविश्वास आणि अथक परिश्रम ही जगातील सर्वात गुणकारी औषधे आहेत.*

**- डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम**

## सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे
# कला व वाणिज्य महाविद्यालय

पाचल - रायपाटण, मु. पो. रायपाटण,
ता. राजापूर, जि. रत्नागिरी, पिन - ४१६७०४

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- २ (एफ) व १२ (बी) खाली युजीसीची मान्यता
- मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्नता
- नॅक पुनर्मूल्यांकन 'बी' श्रेणी
- निसर्गाच्या सान्निध्यात प्रशस्त इमारत.
- अध्ययन, अध्यापनास सुयोग्य वातावरण.
- राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक, क्रीडाविषयक विविध उपक्रम.
- प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्रांचे आयोजन.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष उपक्रम.
- विद्यार्थ्यांच्या सर्व गुणांच्या संवधर्नासाठी संवाद वार्तापत्र.
- 'स्पंदन' अर्धवार्षिक अंकाचे प्रकाशन, 'सह्यगिरी', 'मायबोली', 'दर्पण' भित्तिपत्रिका.
- शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा इ. मध्ये नेत्रदीपक कामगिरी.
- स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन व प्रोत्साहन.
- राज्य व राष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये प्राध्यापकांचा सहभाग.
- समृध्द ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकेची सुविधा.
- प्राध्यापकांचे संशोधनपर लेख ISSN / ISBN मध्ये प्रकाशित.
- भव्य क्रीडांगण, विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन.
- ग्रंथालय विभागाचे संगणकीकरण.
- विद्यार्थ्यांच्या साहित्यिक कलागुणांच्या संवधर्नासाठी 'सह्यगिरी' वार्षिक अंकाचे प्रकाशन.

सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे
# कला व वाणिज्य महाविद्यालय

पाचल - रायपाटण, मु. पो. रायपाटण,

ता. राजापूर, जि. रत्नागिरी, पिन - ४१६७०४

## – व्हिजन –

*विद्यार्थी वर्गाला आणि समाजाला शिक्षणाच्या क्षेत्रात आणि त्याच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात उच्च दर्जाची सेवा देण्याची जबाबदारी व विशेषाधिकार आहे, हाच महाविद्यालयाचा दृष्टिकोन आहे.*

## – मिशन –

*दुर्गम व मागास भागातील तरुणांच्या सुप्त गुणांचा व बुद्धिमत्तेचा विकास करुन त्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी उच्च शिक्षणाद्वारे कोकणाचा पर्यायाने राष्ट्राचा विकास करण्यासाठी चालना देणे.*

# सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय

पाचल - रायपाटण, मु. पो. रायपाटण,

ता. राजापूर, जि. रत्नागिरी, पिन - ४१६७०४

## संचालक मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. मनोहर हरी खापणे | - | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. शंकरराव गंगाराम चव्हाण | - | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. चंद्रकांत आत्माराम लिंगायत | - | सरचिटणीस |
| ४. | मा. श्री. राजेश कृष्णाजी सावंत | - | सहचिटणीस |
| ५. | मा. श्री. प्रदिप चंद्रकांत खापणे | - | खजिनदार |
| ६. | मा. श्री. सुरेश शांताराम आयरे | - | सदस्य |
| ७. | मा. श्री. अशोक रघुनाथ सक्रे | - | सदस्य |
| ८. | मा. श्री. संजय कृष्णाजी जोशी | - | सदस्य |
| ९. | मा. श्री. सिध्दार्थ सखाराम जाधव | - | सदस्य |

## महाविद्यालय विकास समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. मनोहर हरी खापणे | - | अध्यक्ष |
| २. | मा. चंद्रकांत आत्माराम लिंगायत | - | सदस्य |
| ३. | मा. प्रदिप चंद्रकांत खापणे | - | सदस्य |
| ४. | मा. खुशिराम शिवाजी मोरे | - | सदस्य |
| ५. | मा. बाळकृष्ण रमेश सावंत | - | सदस्य |
| ६. | मा. मनोज भिकू गांगण | - | सदस्य |
| ७. | डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील | - | सदस्य (शिक्षक प्रतिनिधी) |
| ८. | प्रा. नंदकुमार गोविंद देवन | - | सदस्य (शिक्षक प्रतिनिधी) |
| ९. | प्रा. विकास शंकर पाटील | - | सदस्य (शिक्षक प्रतिनिधी) |
| १०. | प्रा. संजय वसंत निंबाळकर | - | सदस्य (IQAC समन्वयक) |
| ११. | प्रा. सुभाष सिताराम धोंगडे | - | सदस्य (शिक्षक प्रतिनिधी) |
| १२. | श्री. नरेश बापू पाचलकर | - | सदस्य (शिक्षकेतर प्रतिनिधी) |
| १३. | कु. गणेश विठ्ठल हाप्पे | - | सदस्य (विद्यार्थी परिषद सचिव) |
| १४. | डॉ. खंडू महादू कोतवाल | - | प्राचार्य व सचिव |



भग्न शिवालय परिसर निर्जन
पळसतरूंचे दाट पुढे बन
तरुवेली करतिल गर्द झुला

उंच पुकारिल मोर काननी
निळ्या ढगांतून भरेल पाणी
लहरेल विजेची सोनसळा

वाहत येईल पूर अनावर
बुडतिल वाटा आणि जुने घर
जाईल बुडुन हा प्राण खुळा

शांता शेळके

# मराठी विभाग

## विभागीय संपादक - प्रा. डॉ. बी. टी. दाभाडे

# अंतरंग....

मराठी विभाग


| अ.क्र. | लेख/कविता/कथा | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | अहिल्याबाई होळकर यांचा गृहप्रवेश | अमोल अनंत लाड | १५ |
| २. | शाळा | अनिकेत बावकर | १७ |
| ३. | जगणं | गौरी ठाकूरदेसाई | १७ |
| ४. | तेजस्विनी अहिल्याबाई होळकरांचे कामकाज | विकास धुळू शिंदे | १८ |
| ५. | आयुष्याला द्यावे उत्तर... | सुचिता नवनाथ शिंदे | १९ |
| ६. | गुंतलेले मन | कृष्णकांत श्रीकांत कदम | १९ |
| ७. | महात्मा गांधींनी केलेला सत्याग्रह | सूरज चंद्रकांत शेट्ये | २० |
| ८. | शेतकरी | सुचिता नवनाथ शिंदे | २२ |
| ९. | किमया बापाची ! | स्नेहा राजाराम नारकर | २२ |
| १०. | आजच्या युगातील स्त्रिया | स्वप्नाली शिर्के | २३ |
| ११. | बाप | प्राजक्ता प्रकाश हरळकर | २५ |
| १२. | जीवन जगवण्यासाठी औषध | सुयोग श्रीकांत ठोंबरे | २६ |
| १३. | आई | प्राजक्ता प्रकाश हरळकर | २७ |
| १४. | एकटे एकटे वाटतंय | मयुरी उदय कोलते | २७ |
| १५. | खरचं देश स्वतंत्र झाला का ? | प्रथमेश प्रकाश आंबेरकर | २८ |
| १६. | शिक्षक मी... | सलोनी संजय नांदलस्कर | २९ |
| १७. | शिवप्रेम | कांचन सुधाकर गुरव | २९ |
| १८. | प्लॅस्टिक बंदी | प्रणव पुंडलिक हळदणकर | ३० |
| १९. | मनातल्या आठवणी | सायली किशोर बेर्डे | ३१ |
| २०. | तहान | सिद्धी शशिकांत गांगण | ३१ |
| २१. | लेक वाचवा ! | श्रद्धा रमेश पवार | ३२ |
| २२. | माझा पहिला गुरु; माझी आई ! | राखी रविंद्र डोळस | ३४ |
| २३. | आई-बाप | राकेश सुधाकर सावंत | ३४ |
| २४. | वाढते प्रदूषण धोकादायक पातळीवर | प्रसाद नरेंद्र नारकर | ३५ |
| २५. | हृदयातील प्रेम | प्राजक्ता मनोहर सुतार | ३६ |

# अंतरंग.....

मराठी विभाग


| अ.क्र. | लेख/कविता/कथा | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| २६. | भारत | पूनम पंढरी चव्हाण | ३६ |
| २७. | मुलगी वाचवा, मुलगी शिकवा | नेहा ठाकूर | ३७ |
| २८. | गर्भकन्येचा फास | पूनम पंढरी चव्हाण | ३९ |
| २९. | छत्रपती शिवराय | राकेश सुधाकर सावंत | ३९ |
| ३०. | संगणक क्षेत्र आणि रोजगाराच्या संधी | विनायक महेश पांचाळ | ४० |
| ३१. | आईचे डोळे | अश्विनी शांताराम पवार | ४२ |
| ३२. | जीवनात यशस्वी होण्याचा मार्ग | सिद्धेश दयानंद मोरे | ४२ |
| ३३. | 'शिक्षक' भावी पिढीचा शिल्पकार | सुचिता नवनाथ शिंदे | ४३ |
| ३४. | आठवण कॉलेजची | सुदेश विलास बने | ४४ |
| ३५. | जीवनाचे सार | मयुरी उदय कोलते | ४४ |
| ३६. | वाढता भ्रष्टाचार | आदित्य सुभाष माळी | ४५ |
| ३७. | प्रजासत्ता की धर्मसत्ता | कृष्णकांत श्रीकांत कदम | ४६ |
| ३८. | आजची स्त्री सुरक्षित आहे का ? | सलोनी संजय नांदलस्कर | ४७ |
| ३९. | महिला स्वातंत्र्य | निलम सुरेश सावंत | ४८ |
| ४०. | आजची स्त्री खरच स्वतंत्र आहे का ? | राखी विजय लांजेकर | ५० |
| ४१. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक अष्टपैलू व्यक्तीमत्व | दिनेश गोपाळ घवाळी | ५२ |
| ४२. | राष्ट्रीय सेवा योजना : एक संस्कारक्षम उपक्रम | अश्विनी मोतिराम माने | ५४ |
| ४३. | मैत्री | अश्विनी शांताराम पवार | ५६ |
| ४४. | जीवनात यशस्वी होण्याचा मार्ग | कांचनी विलास चव्हाण | ५७ |
| ४५. | वाढती लोकसंख्या | सिद्धेश दयानंद मोरे | ५८ |
| ४६. | वाचन ही काळाची गरज | सुविधा तुकाराम चव्हाण | ५९ |
| ४७. | भीमा कोरेगाव विजयस्तंभ : एक प्रेरणास्त्रोत | प्रितेश हरिश्चंद्र कुळये | ६० |
| ४८. | महात्मा ज्योतिबा फुले यांचे समाजासाठी कार्य | सर्वेश राजाराम धुळप | ६२ |
| ४९. | राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे विचार आजही प्रेरणादायी | अपेक्षा मधुकर कदम | ६४ |

# अंतरंग.....

मराठी विभाग



| अ.क्र. | लेख/कविता/कथा | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ५०. | शहरातील समस्या | रितेश प्रकाश धावडे | ६५ |
| ५१. | स्त्रियांवरील अत्याचार | सुकन्या अरविंद जाधव | ६७ |
| ५२. | भारतातील दारिद्र्य | निर्मला सोमराया नाईक | ६८ |
| ५३. | पर्यावरण व आजची स्त्री | आस्मा गुलजार मापारी | ७० |
| ५४. | लोकसंख्येची समस्या | दिप्ती दशरथ माळी | ७१ |
| ५५. | सुशिक्षितांची बेकारी | शीतल रविंद्र दबडे | ७३ |
| ५६. | बँकांचे बदलते स्वरूप | स्मिता सुभाष कानडे | ७४ |
| ५७. | करिअर | यशश्री रघुनाथ शेटे | ७५ |
| ५८. | जन्मदाती आई | सायली संजय शेट्ये | ७६ |
| ५९. | तरुणपिढीची नेटवारी | अस्मिता अनंत पाटेकर | ७७ |
| ६०. | स्वातंत्र्याची ७० वर्षे | प्रिया प्रकाश भुर्के | ७८ |
| ६१. | स्त्रीभ्रूण हत्या : एक सामाजिक समस्या | रिचा सुभाष शिंदे | ८० |
| ६२. | वाचन संस्कृती आणि आजचा विद्यार्थी | सलोनी संजय नांदलस्कर | ८१ |
| ६३. | भारतीय संविधान आणि आरक्षण | प्राजक्ता प्रकाश बाणे | ८४ |







# अहिल्याबाई होळकर यांचा गृहप्रवेश

**अमोल अनंत लाड**
तृतीय वर्ष, कला

गौतमाबाई आणि मल्हार यांचा संसार सुरु झाला. मल्हाररावांचे सैन्य सर्व दिशांना संचार करित होते. त्यांना उसंत नव्हती. अनेक चढाया, युद्धे यातून त्यांच्या शौर्याच्या कथा पुढे येत होत्या.

गौतमाबाईंना पुत्र झाला आणि सगळीकडे आनंदी आनंद पसरला. आजोबांचे खंडेराव हेच नांव ठेवण्यात आले. खंडेराव हळूहळू मोठे होऊ लागले. त्याच्या शिक्षणाची चोख व्यवस्था केली. पण या मुलाची लक्षणे विपरित होती. त्याला राज्यकारभार, लढाया, घोडे वगैरे मध्ये अजिबात रस नव्हता. तो अतिशय भांडकुदळ, उद्धट, तापट होता. तारुण्यात पदार्पण केल्यावर तर दुर्गुण अधिकच उसळू लागले. नशापाणी करण्याचं त्याला व्यसन लागलं. त्याचे राहणीमान डामडौलाचे असे. आचारविचार मात्र होत होते. हे बघून मल्हारराव दुःख, चिंतेत बुडून गेले होते. आपल्या पुत्राचे जीवन मार्गी कसे लागेल याची चिंता त्यांना लागली होती.



एकदा बाजीरावाबरोबर लढाईहून परत येताना सैन्याचा तळ चौडी गावातील सीना नदीच्या काठी होता. नदीकाठी महादेवाचं देऊळ होतं. तिथे अहिल्या आपल्या आईबरोबर दर्शनाला आली होती. मैत्रिणीबरोबर नदीकाठच्या वाळूत शिवलिंग तयार करत होती. शाळूंकेवर वाळूचे लहान लहान गोळे ठेवून काढत होती. तोच सैन्यातला घोडा उधळला. मैत्रिणी ओरडल्या, अहिल्ये पळ घोडा उधळला. मैत्रिणी पळाल्या सुद्धा, पण अहिल्या ? तिने आपले सर्व शरीर पिंडीवर झाकले. भरधाव छापा टाकत तिथे पोहोचले. तिला संतापाने खसकन उभे करीत बाजीरावांनी ओरडून विचारले, ''पोरी, इथे का थांबलीस ? उधळता घोडा तुडवून गेला असता तर ?'' त्यावर मुळीच न घाबरता आपले तेजस्वी डोळे बाजीरावांच्या डोळ्याला भिडवत ती म्हणाली. '' जे आपण घडवावे ते जीवापाड प्रसंगी जीव सांडूनही रक्षण करावे. असंच सगळी वडील माणसे सांगतात, मी तेच केले. मी घडवलेल्या पिंडीचे रक्षण केले. माझे काही चुकले का ?'' त्या तेजस्वी चिमुरडीचे शब्द ऐकून बाजीराव थक्क झाले. तिच्या डोळ्यात विलक्षण तेज होते. तिचा बाणेदारपणा बघून मल्हाररावांकडे वळत उत्स्फूर्तपणे म्हणाले '' मल्हारबा, या पोरीस तुमची सून करुन घ्या, ती राज्याचे प्राणपणाने रक्षण करेल. हिचे डोळे रत्नासारखे तेजस्वी आहेत. तुमचा कुळ पुत्र खंडेराव त्याला राज्याच्या लायक हिच ठरु शकेल. हिला सून करून घ्या. आणि राज्य कारभाराच्या अनेक पदरांचं शिक्षण द्या.

बीड जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौडी हे एक लहान गाव. माणकोजी शिंदे आणि सुशिला या मातापित्यांच्या पोटी अहिल्येने जन्म घेतला. तिला दोन भाऊ होते. चौडीची ही अहिल्या बघताच बाजीराव आणि मल्हाररावांनी तिच्या आईवडिलांची गाठ घेऊन अहिल्येला मागणी घातली. थाटात लग्नसमारंभ पार पडला. अहिल्या होळकरांची सून झाली. १७७३ मध्ये हा विवाह झाला आणि अहिल्या भाग्याची सोनपाऊले घेऊनच होळकरांच्या घरात आली. मल्हाररावांचे ऐश्वर्य वाढत चालले, अहिल्येच्या लग्नाबरोबर तिचे शिक्षण सुरू झाले.

पेशवे यांची राजधानी पुणे येथे होती. परंतु त्यांचं काम मात्र उत्तर हिंदुस्थानातच बहराला आलं होतं. मल्हाररावांच्या मदतीने बाजीराव पेशवे उत्तर हिंदुस्थानातील सूत्रे हलवीत होते. अनेक लहानमोठ्या लढाया चालू होत्या. १७३० रोजी मल्हाररावांनी माळव्यावर जे आक्रमण केले त्याचं सेनापतीपद मल्हाररावाकडे होते. त्यावेळचे मोगल सरदार पळून गेले. २ ऑक्टोबर १७३० रोजी मल्हाररावांना माळव्यातील सर्व परगण्याचे अधिकार मिळाले. नंतर महमद बंगरनेही माळवा परत काबीज करण्याचा प्रयत्न केला, पण त्याला मल्हाररावाच्या शौर्यापुढे हार पत्करावी लागली. आता माळव्यावर मराठ्यांची सत्ता स्थापन करण्यासाठी पेशव्यांनी जहागीरदारी आणि वतनदारीची प्रथा राबविली. आपल्या प्रमुख सरदारांना वतने दिली. याच प्रथेनुसार राणोजी शिंदे यांना उज्जैन, आनंद पवार यांना धार आणि जिवाजी पवारास देवास मिळाले. त्यानंतर २० जानेवारी १७३४ रोजी पेशव्यांनी होळकरांना माळव्यात वंशपरंपरा चालणारी वतने परगणे, इनाम दिले. मल्हाररावांचा खास गौरव करून होळकर राज्याची रितसर स्थापना करण्यात आली. हे वैभव अहिल्यादेवीच्या पायगुणामुळे, त्यांच्यातील असामान्य कर्तृत्वामुळे प्रतिदिन वाढतच गेले.

आपल्या पराक्रमी सासऱ्याच्या सुयोग्य मार्गदर्शनाखाली त्यांनी सर्व राज्यकारभार नावारूपास आणला. भालेरावांच्या पाठीवर अहिल्याबाईंना तीन वर्षांनी एक कन्यारत्न झाले. तिचे नाव मुक्ता असे ठेवण्यात आले.



‘स्त्रीभ्रूण हत्या’ विषयावरील रांगोळी पाहताना प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल व कार्यक्रम अधिकारी.




गोल्ड कार्ड विद्यार्थीनीला पाटप करताना डॉ. ए. डी. पाटील.

# शाळा



ड्युटीवरील खुर्चीपेक्षा
माझ्या शाळेचा बाकच बरा होता
कामाच्या या व्यापापेक्षा
आमच्या शाळेचा गृहपाठच बरा होता......

कितीही असला नोकरीचा लळा
तरी माझ्या शाळेचा फळाचं बरा होता
वरिष्ठांच्या सततच्या टेंशन पेक्षा
गुरुजींच्या छडीचा मारच बरा होता...

मोबाईल वरील व्हॉट्सॲप, फेसबुकपेक्षा
मैदानी खेळांचा थाटच मोठा होता
हरवलो आहे शहरात सुख मिळवण्यासाठी
पण मित्रा आपला तो काळच बरा होता......



**अनिकेत बावकर**
प्रथम वर्ष, वाणिज्य

# जगणं

आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकांस दिसत नाही

हरवला तो आपसातला
जिव्हाळयाचा संवाद
एकमेकांस दोष देऊन
नित्य चाले वादविवाद

धाव धाव धावतो आहे
दिशा मात्र कळत नाही
हृदयाचे पाऊल कधी
हृदयाकडे वळत नाही

इतकं जगून झालं पण
जगायला वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
कशालाच कशाचा मेळ नाही

क्षण एक येईल असा
घेऊन जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास

अजूनही वेळ आहे
थोडं तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरुन बघून घ्या



**गौरी ठाकूरदेसाई**
प्रथम वर्ष, वाणिज्य



# तेजस्विनी अहिल्याबाई होळकरांचे कामकाज

**विकास धुळू शिंदे**
तृतीय वर्ष, कला

उदंड कीर्ती मिळवणाऱ्या तेजस्वी अहिल्याबाईंचे सांसारिक जीवन म्हणजे केवळ उन्हाळा होता. गौतमाबाई आणि मल्हारराव त्यांना पोरके करुन निघून गेले. मालेरावांचा भीषण मृत्यू झाला. खंडेराव तर कधीच निघून गेले. खंडेरावांच्या नऊ सती, मल्हाररावांच्या दोन सती, मालेरावांच्या दोन सती अशा तेरा स्त्रियांना सती जाताना त्यांनी पाहिलं. मुक्ताबाईला एकच मुलगा नथू. हा एकच नातू पण त्यालाही क्षयरोगाने ग्रासले होते. कधी ताप, कधी खोकला. वैद्याचं संशोधन त्याच्या कामी येत नव्हते. मुक्ताबाई तर जणू मातृसेवेसाठीच जन्मली होती. तिचाच फक्त आधार होता. तिच्यासंगतीने अहिल्याबाईच्या सांसारिक उन्हाळयात थोडा गारवा येत असे.

त्यांचा दिनक्रम आखलेला असे. सकाळी पहाटेच उठत. स्नान वगैरे आटोपून शंकराची पूजा करीत, स्त्रोते म्हणत. मग दिवसभराच्या कामाची आखणी करीत नंतर पेलाभर दूध पिऊन तक्रारीचे कागद वाचून ठेवीत. गुप्त पत्रे लिहीत. फडणीशी कोतवालातली कामे बघून भोजन करावे. त्यानंतर न्यायदान, व्यवस्था, हिशोब बघता बघता मध्यरात्रही उलटून जाई. अहिल्याबाई कुणाचा निष्कारण अनादर करीत नसत.

चांदवड येथील मामलेदाराने एका बोहऱ्याचा छळ चालवला होता. ही हकीगत अहिल्यादेवीला कळताच त्यांनी मामलेदारास ठणकावले, की प्रजेची हर प्रकारे इज्जत केली पाहिजे. सन्मान केला पाहिजे. तुमच्याबद्दल पुन्हा कोणत्याही प्रकारची तक्रार आल्यास त्याचा परिणाम चांगला होणार नाही. तुकोजी होळकरांना सुध्दा त्या हिशोबासाठी वेठीस धरत. हिशोबातले गोंधळ त्यांना एका नजरेत समजत. तुलाराम होळकर यास त्यांनी लिहिलेले पत्र उपलब्ध आहे. चिरंजीव तुलाराम होळकर यांस अहिल्याबाईंचा आशीर्वाद ! तुम्ही शेगाव परगण्यात लोकांवर मन मानेल तसा जुलूम करुन त्यांच्याकडून पैसे वसूल केले आहेत. प्रजेच्या मामल्यासाठी महालच्या अधिकाऱ्यांना तुम्ही तंग केलेत. ह्याचे काय कारण ? तुम्हास कळविण्यास येते की, आजपर्यंत तुम्ही मन मानेल त्याप्रमाणे रूपये वसूल केलेत. त्याचा खुलासा सरकारात पेश करावा. यापुढे देण्याघेण्याच्या संबंधात स्वार पाठवून कोणत्याही प्रकारचा अन्याय केलात आणि त्याबद्दल तक्रार आली तर तुमचे कार्य अक्षम्य समजले जाईल.

अहिल्याबाई मृदू होत्या. तितक्याच वेळप्रसंगी अत्यंत कठोर होत्या. पुणे दरबारातून हरिपंत आले होते. ते अहिल्याबाईचा पाठिंबा बारभाईला मिळवण्यासाठी ते अहिल्याबाईना म्हणाले, 'मातोश्री रघूनाथरावांनी वैर मांडले आहे. त्यामुळे आपला पाठींबा बारभाईस शपथपूर्वक घ्यावा' त्यावर उसळून देवी म्हणाल्या, 'कैलासवासी सुभेदारांपासून आमची निष्ठा कैलासवासी बाजीरावांचे गादीशी, त्या गादीशी जे असतील ते आमचे मार्तंड रघूनाथरावास नर्मदा उतरू दिली नाही. आम्हालाही शपथक्रिया करावी लागते. असं आपण आश्चर्य मनीच्या एक निष्ठेने आम्ही कधीच बेल भंडारा उचलला आहे. बेल म्हणजे आमच्या लेखी भाजीपाला नव्हे. आपले बोलणेच अप्रशस्त. असा स्वभावाला पीळ होता. हरिपंतांनी जाणले की अहिल्यादेवी अत्यंत हुशार, बोलण्यात धीट आणि फटकळ, व्यवहारात चोख. त्यांनी माहेरचा डौल पाहिला. बाजारपेठा, संशोधन केंद्रे, पाठशाळा किल्ल्याची शिबंदी, युध्दभांडार, चिलखते, भाला, बरच्या, जंबुरे तोफा इ. त्यांनी अहिल्यादेवींचे दरबारी कामकाज पाहण्यांची इच्छा व्यक्त केली. मात्र गुप्तपणे मला बघायचे आहे की, त्या न्यायदान कसे करतात. मी फार प्रशंसा ऐकून आहे.

हरिपंत एका शेतकऱ्याच्या वेशात येऊन बसले. दरबारात एक कवी आला. आपले कवन त्याने वाचायला सुरूवात केली.

देवि अहिल्ये शुध्दमति तू सर्वांची माता
ईश्वर आला तुझ्या स्वरूपे होऊनिया त्राता
तव पायाशी तीर्थे सगळी देवदेवळे ती
स्वर्गामध्ये नारद तुबंर तव लीला गाती

या चार ओळी ऐकताच अहिल्यादेवी म्हणाल्या, कविराज तुमची माझ्याविषयी श्रद्धा मी जाणते. त्याचा आदरही करते. पण मजसारखीची ही अतिशयोक्ती मला ऐकवत नाही. प्रेम आणि शक्ति या दोन्ही गोष्टीचा वापर करून त्यांनी राज्याची प्रगती साधण्याचा सदैव प्रयत्न केला. त्या प्रजेसाठीच जगत होत्या.

# आयुष्याला द्यावे उत्तर .....

असे जगावे दुनियेमध्ये, आव्हानाचे लावून अत्तर
नजर सोडूनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर

नको गुलामी नक्षत्रांची, भीती आंधळी ताऱ्यांची
आयुष्याला भिडतानाही, चैन करावी स्वप्नांची

असे दांडगी इच्छा ज्यांची मार्ग तयाला मिळती सत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर ....

पाय असावे जमिनीवरती, कवेस अंबर घेताना
हसू असावे ओठांवरती, काळीज कापून देताना,

संकटासही ठणकावून सांगावे, आता ये बेहत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर

करुन जावे असे ही काही, दुनियेतूनी या जाताना,
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवटचा देतांना...

स्वर कठोर त्या काळाचाही,
क्षणभर व्हावा कातर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर ...



**सुचिता नवनाथ शिंदे**
प्रथम वर्ष, वाणिज्य

# गुंतलेले मन

हळूवारपणे तुला जपणारं
तुझ्या आठवणीत रमणारं
प्रेमाच पाखरु होऊन फक्त
तुझ्या भोवती घिरट्या घालणारं
तुझ्यात गुंतलेले मन
तुझ्या स्पर्शाने फुलणारं
तुझ्या हसण्यानं मोहरणारं
बस तुझा एक प्रेमळ शब्द आणि
स्वर्गात घेवून जाणारं
तुझ्यात गुंतलेले मन
चांदण्या सारखे शीतल असणारं
सूर्यासारखं उज्ज्वल असणारं
आणि थोडासा प्रखरपणा
बस तुझचं दर्शन घडणारं
तुझ्यात गुंतलेले मन
दगडासारखं कणखर असणारं
तलवारी सारखं धारदार असणारं
आणि थोडासा मऊपणा
क्षणात विरघळून जाणारं
तुझ्यात गुंतलेल मन
पाण्यासारखं स्वच्छ असणारं
वाऱ्यासारखं संथ वाहणारं
आणि फुलाच्या गंधाप्रमाणे दरवळणारं
तुझ्यात गुंतलेले मन
ना तुझ्याशिवाय रमणारं
ना तुझ्या शिवाय करणारं
फक्त आणि फक्त तुझ्या
काळजीपोटी तुझ्या आठवणीत भिजणारं
तुझ्यात गुंतलेले मन.



**कृष्णकांत श्रीकांत कदम**
तृतीय वर्ष, वाणिज्य



# महात्मा गांधीनी केलेला सत्याग्रह

**सूरज चंद्रकांत शेटचे**
तृतीय वर्ष, कला

ही घटना आहे १८८१ सालातली. राजकोट शहरातील इंग्रजी शाळेतील पहिलीचा वर्ग, इन्स्पेक्टर शाळा तपासणी करत होते. पहिलीच्या मुलांना त्यांनी पाच इंग्रजी शब्द लिहायला सांगितले. त्यापैकी एक 'केटल' हा होता. तो मोहनने चुकीचा लिहिला होता. वर्गशिक्षक वर्गात फिरत होते. ते येता जाता बुटाने मोहनला डिवचीत होते. आपण इतरत्र पाहत नसताना शिक्षक असे का करतात, हे मोहनला कळेना. चुकून गुरूजींचा बूट तसा पडला असावा, असेही त्याला वाटले.



इन्स्पेक्टरांनी सर्वांचे लेखन तपासले. मोहनने पाचपैकी एक शब्द चुकीचा लिहिला होता. इतरांचे लेखन सर्व बरोबर होते. इन्स्पेक्टरनी ते वर्गशिक्षकांच्या लक्षात आणून दिले. तपासणी संपल्यावर वर्गशिक्षकांनी मोहनला बोलावले व त्याला ते म्हणाले, अरे तुझ्यामुळे मला कमीपणा आला. तो कसा इतरांचे सर्व शब्द बरोबर होते, पण तुझा एक शब्द चुकला कोणता. 'केटल' त्याचे स्पेलिंग चुकले हो, तो लिहिण्यात माझी चूक झाली. मला त्याचे स्पेलिंगच आठवलं नाही.

पण तुझा तो शब्द दुरूस्त करता आला असता. कसा ? दुसऱ्याचं बघून, त्यासाठी मी तुला बुटाने डिवचीत होतो. हां, आता माझ्या लक्षात आलं, तुम्ही बुटाने का डिवचीत होता ते, पण मला वेगळचं वाटलं. तुम्ही सुपरव्हिजन करत होता. मला वाटलं की, मी कुणाचं तरी बघून लिहितोय, असं तुम्हाला वाटतंय. म्हणून तुम्ही सूचना देतायं. अरे तू दुसऱ्याचं बघ आणि शब्द दुरूस्त कर, असं मी त्यातून सूचवत होतो.

पण मला तसे वाटले नाही. तुम्ही दुसऱ्याचं बघून काढायला सांगणार कसे ? म्हणून मी माझ्याच लेखनाकडे पाहत राहिलो. बावळटचं दिसतोय. पुढे कसं होणार तुझं ? गुरूजींच्या बोलण्याचा मोहनला राग आला नाही. त्यांच्या बद्दलचा आदरही कमी झाला नाही. पण मोहनने कॉपी करण्याचे टाळले. आपल्याला येते तेच खरे हेच त्याने चालू ठेवले. हायस्कूलमध्ये मोहनची गणना हुशार विद्यार्थ्यांत नसे. प्रत्येक वर्षी अभ्यास किंवा वर्तन याबद्दल खराब शेरा कधीच वाटत नव्हता. त्याला अभ्यासाबद्दल अभिमान कधीच वाटत नव्हता.

उलट अभ्यासाबद्दल बक्षीस मिळाले तर त्याला आश्चर्य वाटे. वर्तनाला मात्र तो जास्त महत्व देत असे. मोहनचे वडील आजारी पडले. वडिलांची सेवा करण्याची त्याला तीव्र इच्छा होती.त्यामुळे वडिलांची सेवा करण्यात त्याला अडचणी येऊ लागल्या. त्याने वडिलांच्या सेवेसाठी व्यायामाची माफी मिळावी म्हणून विनंती केली. पण ती मान्य झाली नाही.

एक दिवस आकाशात ढग जमले होते. त्यामुळे वेळ कळेना. ज्यावेळी मोहन व्यायामाला गेला त्यावेळी सर्वजण निघून गेले होते. दुसऱ्या दिवशी मुख्याध्यापकांनी विचारले, काल व्यायामला गैरहजर का होतास ? मी आलो होतो, पण उशिरा, कारण वडिलांच्या सेवेसाठी घरी थांबलो होतो. आकाशात ढग असल्याने वेळ कळली नाही? तू खोटं बोलतोस. दंड भर आणि पुन्हा असे करू नकोस. मोहनला अतिशय दुःख झाले. तो रडू लागला. मनात विचार आले, मी खोटा

नाही हे कसं सिध्द करू? सत्य आचरणाऱ्याने गाफील राहू नये हेच खरे.

मोहनने वडिलांचे हेडमास्तरांना लिहिलेले पत्र आणले. या पत्रामुळे त्याला व्यायामातून मोकळीक मिळाली. वडिलांच्या सेवेसाठी त्याला घरी राहायला परवानगी मिळाली. त्याला जास्त आनंद अशासाठी झाला की, आपण सारे खरेपणानेच मिळविले. हा मोहन म्हणजे आपले जीवन हे सत्याच्या प्रयोगासाठी खर्ची घालणारे आपले राष्ट्रपिता मोहनदास करमचंद्र गांधी. ते आफ्रिकेत वकिली करण्यासाठी गेले. हिंदी बांधवावरील अन्याय दूर करण्यासाठी धडपडले.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचं त्यांनी नेतृत्व केले. शेतकरी, कामगार यांच्यासाठी त्यांनी संघर्ष केले. स्त्रिया व दलितांना मानाचे स्थान मिळावे म्हणून ते धडपडले. अहिंसेच्या मार्गाचा अवलंब केला जावा यासाठी आग्रही राहिले. सत्तेच्या जवळ असूनही सत्तेपासून दूर राहणारे जगातले ते पहिले होते. भारताचे खऱ्या अर्थाने ते राष्ट्रपिता ठरले. बापूजींच्या जीवनातून फक्त भारतातीलच नव्हे, तर जगातील अनेक व्यक्तींना प्रेरणा मिळाली.

महात्मा गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ चा. ३० जानेवारी १९४८ रोजी त्यांचा खून करण्यात आला. बापूजी देहाने आपल्यातून गेले; पण त्यांचे जीवन आणि कार्य हे दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक बनले. १९ व्या वर्षी १८८८ मध्ये गांधीजी वकिलीचे शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेले. गांधीजी आणि कस्तुरबा यांना चार मुले झाली. हरीलाल, मणिलाल, रामदास आणि देवदास.

रवींद्रनाथ ठाकूर यांनी सर्वप्रथम गांधीजींना 'महात्मा' ही उपाधी दिली. 'महात्मा' या संस्कृत शब्दाचा अर्थ आहे महान आत्मा. लोक गांधीजींना बापूजी म्हणत. १९४४ साली नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी गांधीजींना 'राष्ट्रपिता' संबोधले.

'गांधी जयंती' हा दिवस जागतिक स्तरावर सन्मान आणि आदर व्यक्त करण्यासाठी साजरा करण्यात येतो. गांधीजींच्या राजघाट येथील समाधीवर 'हे राम' हे शब्द लिहिलेले आहेत. अनेकांच्या मते त्यांचे हे अखेरचे शब्द होते.

''विध्वंस हा आतंकतावादाच्या नावाखाली केला गेला की, स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या नावाखाली केला गेला की, त्यातील मृतांसाठी, अनाथांसाठी आणि गृहिणींसाठी केला गेला तर काय फरक पडणार ? डोळ्यासाठी डोळा सर्व जगाला आंधळे करून सोडेल. अशी अनेक ध्येयं आहेत, ज्यासाठी मी जीव द्यायला तयार आहे. पण असे एकही ध्येय नाही ज्यासाठी मी कुणाचा जीव घेईन.''




राष्ट्रीय एकता दिनानिमित्त मार्गदर्शन करताना प्रा. व्ही. एस. पाटील.

# शेतकरी



तळपता सूर्य डोक्यावर घेऊनी
जेवताना कांदा भाकर खाऊनी
तापलेल्या मातीला घामाने भिजवूनी
पिक निर्माण करतो तो शेतकरी
शरीरात असे काहीतरी
जे शरीरात ऊर्जा निर्माण करी
सगळी त्याला अन्नधान्य म्हणती जरी
उर्जा तिच निर्माण करी शेतकरी
शेतीसाठी हा कर्ज काढी
कर्जासाठी जाई सावकाराच्या दारी
निसर्ग ही कधी कधी कोपे भारी
धान्याची सर्व नासाडी करी
शासनही अशावेळी मदत न करी
मग शेतकरी आत्महत्या करी
कधीतरी मध्येच सरकारला जाग देई
मग एखाद्या पिकाला हमीभाव देई
आश्वासन असे जे कधी पूर्ण न होई
अशामुळेच रोज शेतकऱ्यांचा जीव जाई !!!



**सुचिता नवनाथ शिंदे**
प्रथम वर्ष, वाणिज्य

# किमया बापाची !

सुखाच्या तराजूत तोलणारा
असा तो माप होता
रक्ताचं पाणी करुन आम्हाला
सुखी ठेवणारा असा माझा बाप होता

आम्हाला आनंदी ठेवण्यासाठी
स्वतः परिस्थितीशी लढायचा
आमच्या डोळ्यात अश्रू न आणता
स्वतः मात्र दुःखात रडायचा

कुटुंबातील दुःखाची दोरी
आम्हाला कधी खेचू दिली नाही
हृदयद्रावक परिस्थितीचे काटे
आम्हाला कधी टोचू दिले नाही

आनंदाच्या झुल्यावर
नेहमीच आम्हाला झुलवलं
निरागस ते बालपण
एका फुलाप्रमाणे फुलवलं

अशा माझ्या बाबांना
मलाही सुख द्यायचं होतं
माझ्या बालपणाप्रमाणं त्याचं म्हातारपण
आनंदाच्या वाटेवर न्यायचं होतं

वेध तुमच्या आठवणींचे
बाबा असे लाऊ नका
विनंती करतो बाबा तुम्हाला
मला सोडून दूर जाऊ नका
मला सोडून दूर जाऊ नका ......!



**स्नेहा राजाराम नारकर**
प्रथम वर्ष, वाणिज्य

# आजच्या युगातील स्त्रिया



**स्वप्नाली शिर्के**
द्वितीय वर्ष, कला

ह्या विषयावर काही लिहायला घेतले की, द्विधा मनस्थिती होते. पुरुषांच्या जोडीने पुढे जाणारी की हे जग बघण्याआधीच अंधारात जाणारी यापैकी कोणाचे नक्की उदाहरण द्यायचे ह्याचा विचार करावा लागतो. स्त्रियांची बुद्धिमत्ता ही निसर्गातच असते असं खुद्द महाकवी कालिदासानं म्हटलं आहे. असे असूनही बायकांना काय कळतं ? बोलून मोकळे होणारे असंख्य लोक समाजात वावरताना दिसतात. एकेकाळी पुरुषांच्या बरोबरीने समाजात स्थान घेणारी म्हणून उदाहरण देण्यात येणारी स्त्री हल्ली मात्र जन्मासाठीच लढताना दिसते. मूळात गर्भाशयात असल्यापासून ते जन्म घेईपर्यंत एवढेच काय ते तिचे आयुष्य आहे असे वाटू लागलयं. बाळाला जन्म दिल्यानंतर आईमार्फत त्याला अन्नपुरवठा करणारी नाळ कापली जाते. परंतु स्त्री जेव्हा जन्म घेते तेव्हाच तिची नाळ ही समाजाशी बांधली गेलेली असते. पण हे मान्य करण्यास मात्र समाज तयार होत नाही. पुरातन काळापासून आई अथवा माता ह्या शब्दाला एक विशेष महत्त्व आहे. अनेक शिलालेखांमध्ये मातृदेवतेचे वर्णन दिसते. मूळात एखाद्या जन्माच्या उत्पत्तीचे मूळच ते असते. प्राचीन काळात स्त्रीला अनन्यसाधारण महत्त्व होते. पण आज परिस्थिती पूर्णपणे वेगळी झाली आहे. बदल घडवून आणण्यासाठी शिवराय, लोकमान्य, भगत सिंग यांसारखे युगपुरुष जन्माला यावेत असे ओरडून सांगणारा समाज मात्र त्यांना जन्म देणारी ही एक स्त्रीच होती हे मात्र विसरत आहे. आपल्या आई - बहिणींची विटंबना होत असताना, एक दिवस गर्दी करून मेणबत्ती जाळणे एवढेच काय ते चित्र आज दिसतयं. नेहमी स्त्रियांना नाण्यांसारखे जगावं लागते. जश्या नाण्यांना दोन बाजू असतात अगदी तसेच आई - बायको - बहिण - मैत्रीण अश्या अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. पण हे करत असताना हल्ली समाजाने नाण्यांच्या दोन्ही बाजू ह्या गुळगुळीत केल्या आहेत. स्त्रियांच्या शरीराकडे आपल्या डोळयांना पूर्ण स्वातंत्र्य देऊन बघणारे पुरुष मात्र स्त्री - स्वातंत्र्य ह्या विषयावर बोलल्याचे सांगतात.

आज २१व्या शतकात नोकरी अथवा शिक्षणाच्या निमित्ताने स्त्रियांनी उंबरठा ओलांडला असला तरी अजूनही अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते. पण ह्या परिस्थितीत स्त्री स्वतःच जबाबदार आहे ? हल्ली तिने प्रसार माध्यमांतून केलेल्या प्रदर्शनाचे तर हे प्रतिसाद नाहीत ना ? हा विचार मनात आल्याशिवाय राहत नाही. पुढच्या पिढीला जन्म देणाऱ्या ह्या स्त्रीने अश्या गोष्टींमुळे हीच पिढी त्याचे दुष्परिणाम तर भोगणार नाही ना ह्याचा विचार नक्की करायला हवा. स्त्रियांचा आजही वस्तू म्हणून वापर करुन हवा तेव्हा उपभोग घेतला जातो. अनेक जाहिरातदार जाहिरातीतून प्रसिद्धीसाठी त्यांचा वापर करुन घेतात. हा त्यांच्या कलेचा वापर नसून त्यांच्या शरीराचा व्यापार आहे. हे त्या मॉडेल मात्र विसरतात हे खरच निंदनीय आहे. स्त्रियांना नक्कीच प्रसिद्धी मिळावी आणि मिळालीच पाहिजे, पण ती अशी शरीर प्रदर्शनातून नको ह्याचा विचार प्रत्येक स्त्रीने करायला हवा. पूर्वी स्त्री जशी उंबरठ्याच्या आतच सुरक्षित होती. तिच परिस्थिती पुन्हा उद्भवते की काय ? असं वाटायला लागलयं.

याला जबाबदार कोण ? यावर उपाय काय ? हे कुठे थांबेल ?..... अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यास व योग्य ती पाऊल उचलण्याची आज खरंच गरज आहे. आधुनिकतेच्या नावाखाली स्त्रियांचे पुरुषी वागणे, बोलणे नको तितके "फ्री" वागणे, भडक कपडे, फॅशन, तसेच टी. व्ही. सिनेमात नको ती दृष्ये, हावभाव, अंगविक्षेप क्लोजअपने दाखवणे हे देखील ह्या सर्वाला तितकेच कारणीभूत ठरत आहे. आणि हे कोणाच्याही वैयक्तिक स्वातंत्र्यावर हे भाष्य नाही.... पण प्रत्येक गोष्टीला एक

मर्यादा ही असतेच आणि जेव्हा ही मर्यादा ओलांडली जाते तेव्हा मात्र समाज बोट दाखवायला मोकळा होतो. मग ती स्त्री असो वा पुरूष. आज बलात्कारी स्त्रीला न्याय मिळवताना सुद्धा कोर्टापुढे पुन्हा पुन्हा शाब्दीक बलात्काराला सामोरे जावेच लागते. आजच्या युगामध्ये स्त्री ही पुरुषाएवढीच आघाडीवर असलेली आपल्याला पहावयास मिळते. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात ती पुरुषांच्या बरोबरीने काम करताना प्रगती पथावर आहे. अर्थाजनामध्येही ती पुरुषाएवढीच काही ठिकाणी त्यापेक्षाही जास्त करताना दिसते. साहजिकच पूर्वीपेक्षा आताच्या युगात स्त्रीला समाजात मोठे स्थान प्राप्त झाले आहे. ते तिने स्वतःच्या कर्तृत्वाने, कष्टाने, बुद्धिमतेने मिळविलेले आहे. यात काही शंकाच नाही. एकूण सर्वच बाबतीत स्त्रिया ह्या पुरुषांच्या बरोबरीने आघाडीवर आहेत, असे म्हटले तरीही तिच्यावर अन्याय होताना आजही दिसून येतोच आहे. आजही वर्तमानपत्र उघडले की जास्तीत जास्त स्त्रीयांबाबतच्या अन्यायाच्या अनेक बातम्या असतात. नवविवाहितेच्या आत्महत्या, सूनेचा छळ करुन मारले, अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन तिची निर्घृण हत्या अशा बातम्याच जास्त असतात. सुशिक्षित वर्गातही पहिली पत्नी सुगरण, सुस्वभाव, समजूतदार असली तरीही तिला मुलीचं झाल्या तर तो दोष तिचाच समजून पतीचा दुसरा विवाह लावला जातो. स्त्री आपल्या पतीच्या प्रेमाखातर त्याच्या आवडीचे, आठवणींवर सगळे आयुष्य काढण्यास तयार होते. त्याच्या मुलांना मोठे करते. स्वतः चा विचारही ती कधी करत नाही पण पुरुषांचे तसे नसते.



**सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त प्रमुख पाहुण्या सौ. कांता कांबळे यांचे स्वागत करताना सौ. कोलते.**



**महाविद्यालय परिसरात श्रमदान करताना स्वयंसेवक.**

# बाप



तुमच्या कामाला उपमा कसलीच मिळाली नाही
तुमची पडद्यामागची भूमिका मला कधी कळलीच नाही
आज कळतयं तेव्हा योगायोग कसा घडायचा
मी उशीरा आले की तुम्हीच दार उघडायचा
हे जग बघ ना तुझं प्रेम वरवर कसं पाहून गेलं
नि माफ करा बाबा लिहायचं राहूनच गेलं.
बनियनला पडलेली भोकं अन् वाढलेली दाढी
मग कळलं मला माझ्याकडे कशी आली गाडी
हे जग बघ ना तुमचं प्रेम वरवर कसं पाहून गेलं
नि माफ करा बाबा तुमच्यावर लिहायचं राहूनच गेलं
बाबा तुम्ही आमच्या सगळ्यांचे मळे फुलवलेत
अन् तुम्ही शिवारात कसं करपून गेलात
आपण गेल्यानंतर हे सर्वकाही बोलण्यात अर्थ नाही
आणि तुमच्या जबाबदाऱ्या पेलतील इतका माझा खांदा काही समर्थ नाही
नि माफ करा बाबा तुमच्यावर लिहायचं राहूनच गेलं
बाबा कोण होतात तुम्ही नक्की
कधी माझ्या नशिबाची शिदोरी होता,
कधी माझ्या नशिबाची तिजोरी होता, माझ्या अंतरी तुम्ही होता
आई खरंतर काटकसर करीत होती खरे संसारी तुम्ही होता
नि माफ करा बाबा तुमच्यावर लिहायचं राहूनच गेलं
बाबा तुम्ही कधी वासराची गाय झाला नाही
लंगड्याचा पाय झाला नाही, दूधाची साय झाला नाही
आणि बाबा माझ्यासाठी तुम्ही काय काय झाला नाहीत ?



**प्राजक्ता प्रकाश हरळकर**
व्दितीय वर्ष, कला



# जीवन जगवण्यासाठी औषध

**सुयोग श्रीकांत ठोंबरे**
द्वितीय वर्ष, कला

'औषध न लगे मजला', असे सर्वांनाच वाटते. पण कधी ना कधी तरी बहुतेक सर्वांनाच औषधाचा कडू घोट रिचवावा लागतो. काही जणांना तर औषधाची सोबत तहयात स्वीकारावी लागते. म्हणूनच औषधांविरहीत घर आजच्या काळात औषधालाही सापडणे कठीण!

स्वातंत्र्यपूर्व काळात अवघे ४७ वर्षे असलेले आयुर्मान आज ६७ वर्षापर्यंत पोहोचले आहे. निश्चितच हे प्रगतीचे प्रतीक ! पण यासोबतच विविध आजारांचे आलेखही सातत्याने उंचावत आहेत. टीबीसारख्या जुन्या आरोग्य समस्यांनी आज अधिक घातक स्वरुप धारण केले आहे. मलेरिया, डायरिया, कुष्ठरोग अशा पूर्वीच्याच आजारांसोबत नवीन इन्फेक्शन, स्वाईन फ्लूसारखी साथ, डेंग्यू अचानक उद्भवत आहे. बेशिस्त जीवनशैलीशी निगडीत आजाराचे प्रमाणही झपाट्याने वाढत आहे. 'मधुमेहाची राजधानी' अशी बिरुदावली मिळवण्या इतपत भारतात मधुमेहाचे प्रमाण वाढत आहे. पूर्वी पन्नाशी, साठीला होणारे आजार आज तिशी - चाळीशीतच आपल्याला ग्रासून टाकत आहेत. जसे 'डिजिट बर्डन' (आजाराचे ओझे) वाढले व वाढतयं, तशी औषधांची गरजही सातत्याने वाढत आहे. आज आपल्याकडे तब्बल ५५० मूळ औषधे त्यांची १लाखावर औषधं, उत्पादने आणि हजारोंनी औषध कंपन्या आहेत. आरोग्यावर व औषधाखेरीज खर्च हा ८० टक्के लोक स्वतःच्या खिशातून करतात. जागतिक बँकेच्या अभ्यासानुसार ग्रामीण भागात कर्जबाजारी होण्याचे महत्त्वाचे एक कारण उपचारांवर होणारा खर्च हे आहे.

आपण चर्चा करत आहोत मुख्यतः ॲलोपथीच्या औषधांची. ही आधुनिक औषधे कमी मालमत्तेत मात्रेतही गुणकारी. त्वरीत परिणाम करणारी, या प्रभावी औषधांमुळे जीवन-मृत्यूमध्ये एखाद्या गोळीचे, इंजेक्शनचे अंतर उरले आहे. जीव वाचवणे व जीव जगवणे सोपे झाले आहे. मात्र ही औषधे मूलतः रसायने. कोणतेच औषध सर्व गुणसंपन्न नाही. जेथे सुपरिणाम आहे. तेथे दुष्परिणामही आहे. योग्य मात्रेत अचूक पद्धतीने घेतले, तर अमृत अन्यथा विषही ठरु शकणाऱ्या या औषधांच्या मूर्त स्वरुपात (डोसेज फॉर्ममध्ये) खूप वैविध्य व नावीन्य आणले आहे. उदाहरणच द्यायचे झाले, तर पूर्वी फक्त गिळायच्या टॅबलेट्स होत्या. आता जिभेवर ठेवायच्या, जिभेखाली ठेवायच्या, चघळायच्या, पाण्यात विरघळून घ्यायच्या असे अनेक प्रकार आहेत.

काही औषधे जेवणाआधी घ्यायची, काही जेवणानंतर, काही औषधे एकत्र घ्यायची नाहीत, कारण त्यामुळे त्यांच्यात आंतरक्रिया होऊन दुष्परिणाम होतात. किंवा त्यांचा अपेक्षित परिणाम होत नाही. अशा एक ना अनेक बाबींचा विचार आधुनिक औषधे वापरताना सर्व संबंधित घटकांना करावा लागतो. वरील विवेचनावरुन लक्षात आले असेल, की ग्राहकांना म्हणजे सर्वसामान्य रुग्ण आणि नातेवाईकांना औषधाविषयी पुरेशी माहिती असणे गरजेचे आहे. नेमकी ही माहिती देणार कोण ? डॉक्टर, हेल्थ एक्सपर्ट, रोगनिदान करुन औषध लिहून देणारे औषधांविषयी मार्गदर्शन करायला त्यांना वेळ असेलच, असे नाही. औषध दुकानातील फार्मासिस्टने औषधांविषयी समुपदेशन करणे अपेक्षित पण परदेशात जशी फार्मसिस्टची भूमिका रुग्ण समुपदेशक म्हणून प्रस्थापित झाली आहे.

थोडक्यात आज अगदी सुशिक्षित असलेला रुग्णही 'औषध साक्षर' असतो असे नाही. त्यामुळेच योग्य माहिती अभावी रुग्णामध्ये काहीशी गोंधळाची दिशाहीन स्थिती दिसते. औषधांचा चुकीचा वापर अगदी मुबलक प्रमाणात दिसतो.

# आई



आई काय असते जरा जाणून तर बघ
एक कविता तिच्यासाठी जरा करुन तर बघ
घरातल्या घरात वाहणारा प्रेमळ सहवास असते आई
घरामध्येच असतात तिच्या दिशा दाही
तिचे पंख हे मोठेच असतात
जरा उडून तर बघ
जरी मावळले तरी असते जळत
मनातल्या मनात असते ती दळण दळत
तिच्यासाठी एक चपाती जरा लाटून तर बघ
कधी येतो पाऊस कधी येतं ऊन
चालत असते ती जन्मभर जरा थांबून तर बघ
आईच्या अश्रूंचे ढग बनतात
होशील खरा पुरुष, अरे जरा आई बनून तर बघ
जग जिंकण्याची असते सर्वांनाच घाई
लागता ठेच मात्र फक्त आठवते ती आई



**प्राजक्ता प्रकाश हरळकर**
द्वितीय वर्ष, कला

# एकटे एकटे वाटतंय

आजकाल खूप एकटे एकटे वाटतयं
भल्या मोठ्या गर्दीतही जणू एकांत भासतोय
कल्लोळ आहे पण सर्व काही शांत वाटतयं

खूप माणसे आहेत सोबत
ओळखीचे आणि अनोळखी
प्रेम करणारे आणि द्वेष करणारे
बरं वाईट मधला फरक जाणणारे
पण तरी त्यांचा सहवास दूर जाणवतोय

माहित नाही काय मन शोधतयं
जुन्या आठवणीत कधी रमतयं
काही तरी हातातून निसटलय
यांच दुःख काळजात उठतयं
म्हणून मन कश्यासाठी तरी झुरतयं

आता कसे हे मन हलके करायचं
कोणाजवळ मनाचं कवाड उघडायचं
बंदिस्त जीवाला आता मुक्त व्हायचयं
माझ्या शब्दांनी साथ दिली आजवर
तरी मन आज कुणाचा तरी आधार मागतयं



**मयुरी उदय कोलते**
द्वितीय वर्ष, कला



# खरचं देश स्वतंत्र झाला का ?

**प्रथमेश प्रकाश आंबेरकर**
प्रथम वर्ष, वाणिज्य

पारतंत्र्याच्या बेड्यातील पक्षी मुक्त होऊन उडाला का ? अजूनही विचार पडतो मला की, भारत स्वतंत्र झाला का ? खरच मनाला अजूनही एक प्रश्न स्पर्श करतो की, स्वातंत्र्य मिळून ७२ वर्षे झाल्यानंतर खरचं भारतास स्वातंत्र्य मिळाले का ? की अजूनही भारत पारतंत्र्याच्या बेड्यात स्वातंत्र्याची प्रज्वलित किरणे दूरूनच पाहतो आहे ? मग भारताच्या समोर हा अनोळखी स्वातंत्र्य शब्द कसा लागला ? अशी प्रश्नमाला अचानक मनासमोर उभी राहते आणि या प्रश्नांच्या उत्तराचा पाठलाग करताना समस्यांचा तांडव नृत्य करु लागतो.

कारण त्यावेळच्या परदेशातून आलेल्या शत्रूपेक्षा आता स्वदेशातील शत्रू भयानक झाला आहे. कारण देशसेवेच्या नावाखाली राजकारणात जाणारे नेते हे आता समाजकारण करण्याऐवजी भष्ट्रकारणच जास्त करतात. थोडक्यात भष्ट्राचाराची गटारे सर्वत्र उथळून वाहत आहेत आणि त्यांची दुर्गंधी ही सामान्य माणसाला न पेलण्यासारखी आहे. थोडक्यात भष्ट्राचारासारख्या भल्यामोठ्या वादळात सामान्य माणूस स्वतःचे ढोपर टेकत आहेत. मग तेव्हा मनात विचार येतो की, खरच देश स्वतंत्र झाला आहे का?

तसेच आताच्या सबल स्त्रियांना पाहताना नयनच दुर्बल होतात. कारण पारतंत्र्यातील स्त्री आणि आताची स्त्री यांची तराजूत तुलना करताना त्या तराजूत कोणताच बदल दिसत नाही. त्यावेळच्या भीतीने डोक्यावर पदर घेऊन वावरणारी स्त्री आणि आताची निर्भिडपणे वावरणारी स्त्री बदल इतकाच पण अत्याचाराची संख्या मात्र तेवढीच मग पुन्हा एकदा मनात प्रश्न येतो की, देश खरच स्वतंत्र झाला आहे का ?

तसेच स्वातंत्र्यापूर्वी इंग्रजांनी जातीवादाच्या टाकलेल्या ठिणगीचे रुपांतर आता आपलेच लोक दणक्यात करतात, आणि मग वाहू लागतात लाल रक्ताचे पाट ? फक्त देशात स्वातंत्र्य हा नवीन शब्द आला. पण हिंदू, मुस्लिम, बौद्ध या शब्दाची विदिर्ण रांगोळी मात्र अजूनही असमानतेची घरे रंगवत आहे. जो तो आपापल्या जातीचा झेंडा घेऊन रस्त्यावर जातीजातीचा बाजार मांडत आहे. शेवटी लढत आहे माणूसच माणसाशी आणि जातीच्या उफळत्या बाजारात विसरुन जात आहे. त्या माणुसकीच्या जातीला मग स्वतंत्र्य भारताला माणूस स्वतःहून ढकलत आहे. पारतंत्र्याच्या सागरात, आणि अशावेळी असा प्रश्न उभा राहतो की, खरच देश स्वतंत्र झाला आहे का ?

पारतंत्र्याच्या दुर्गंधीत गुदमरलेल्या सामान्य माणसाला स्वातंत्र्याचा श्वास घेण्यासाठी युवकाला आपल्या बलदंड करांची ताकद दाखवायला हवी, आणि स्वातंत्र्यात असून पारतंत्र्यात वावरणाऱ्या भारताला मुक्ततेच्या विस्तीर्ण नभाला स्पर्श करता यावा यासाठी तरी सर्व युवकांनी एकत्र यायला हवे !

* * *

## - विचारधन -

**आपले जीवन हे एक आपणांस मिळालेले दान आहे, त्याचे दान करीत राहिल्यानेच त्याचे मोल वाढते.**

आपले शरीर, रंग, रुप, कल्पकता, बुद्धी इत्यादी अनेक गोष्टी निसर्गतः आपल्याला मिळत असतात, म्हणजे हे एक प्रकारचे आपल्याला मिळालेले दान आहे; मग अशा दानाचा इतरांच्या कल्याणासाठी उपयोग करीत राहिल्यास त्या दान म्हणून मिळालेल्या जीवनाचा उपयोग आपण चांगल्या रितीने करीत राहिलो आहोत, असे वाटते.

# शिक्षक मी ....



शिक्षक मी, शिक्षक मी
संस्कृतीचा रक्षक मी
बदलते संदर्भ स्वीकारणारा
नवसाहित्याचा वाचक मी
शिक्षक मी, शिक्षक मी !

शाळा माझी पंढरी
तिचा खरा वारकरी मी
विद्यार्थी माझे दैवत
त्यांच्या भविष्याचा कैवारी मी !

नवसमाजाचा निर्माता
अन् समतेचा पाईक मी
दया, क्षमा अन् शांतता
सत्य, परमार्थाचा पाईक मी !

विश्वास, श्रद्धा, सेवा अन्
समाजमनाचा आरसा मी
बहुजन हिताय, बहुजन सुखाय
फुले - सानेंचा वारसा मी
शिक्षक मी, शिक्षक मी !



**सलोनी संजय नांदलस्कर**
प्रथम वर्ष, वाणिज्य

# शिवप्रेम



विजेसारखी तलवार
चालवून गेला
निधड्या छातीने
महाराष्ट्र हलवून गेला
असा माझा राजा
शिवछत्रपती होऊन गेला...
आई भवानी मातेचे होते
ते खूप मोठे भक्त
स्वराज्य मिळवून देण्यासाठी वाहिले
त्यांनी आपले रक्त...
आई भवानी मातेच्या आशीर्वादाने
त्याने स्वराज्य रचिले
स्वराज्यासाठी माझा राजा एकटाच झुरला
मुघल सत्तेमुळे माझा महाराष्ट्र नेहमी रडला
जनतेच्या अंधारी तो एकटाच सूर्य ठरला...
क्षत्रिय कुळात झाला त्यांचा जन्म
असा माझा राजा सामान्यांसारखा राहिला
त्यांच्या कर्तृत्वामुळे सर्वांच्या मनी
घर करुन राहिला



**कांचन सुधाकर गुरव**
प्रथम वर्ष, वाणिज्य



# प्लॅस्टिक बंदी

**प्रणव पुंडलिक हळदणकर**
तृतीय वर्ष, वाणिज्य

सर्वप्रथम या विषयावर बोलायचे झालेच तर हे सत्य समोर येते की, दैनंदिन जीवनात आपण जसा अनेक वस्तूंचा, सेवांचा, अन्न पदार्थांचा वापर करतो तसेच प्लॅस्टिकचाही वापर अपरिहार्यपणे करतो आहे. एवढे दैनंदिन जीवनाशी त्याचा संपर्क येवू लागला आहे. उदाहरण द्यायचेच झाल्यास आपण सकाळी उठल्यावर दात घासण्यासाठी जो प्रथम हातात ब्रश घेतो तो प्लॅस्टिकचाच असतो.आणि रात्री शेवटी घरातला कचरा काढून तो बाहेर ज्या डब्यात टाकतो तोही प्लॅस्टिकचाच असतो अशा प्लॅस्टिकने आपल्या दैनंदिन जीवनात आपली जागा पक्की करुन ठेवली आहे.



प्लॅस्टिकपासून होणारी हानी, त्याचे दुष्परिणाम याबाबत विचार केला तर प्लॅस्टिकचा शोध हा वरदानापेक्षा शापच जास्त आहे हे आपल्या लक्षात येईल. प्लॅस्टिकच्या शोधानंतर शास्त्रज्ञांच्या एवढे लक्षात आले नाही की, त्याचा वापर हा एवढ्या मोठ्या प्रमाणात होईल. मुंबईसारख्या मोठमोठ्या शहरात रोज हजारो टन प्लॅस्टिक कचरा निर्माण होतो की, ज्याची विल्हेवाट लावणे अशक्य झाले आहे. कारण हा असा घटक आहे की, जो कालांतराने पर्यावरणात विलिन होऊ शकत नाही आणि जाळला तर त्यापासून निघणारे विषारी वायू, कार्बनडायऑक्साईड यापासून सजीव जीवांना धोका होतोय. त्यामुळे हा असा प्रश्न आहे की, कधी न संपणारं, अविघटनशील असे हे प्लॅस्टिक दिवसेंदिवस पर्यावरणात कितीतरी हजारो पटीने वाढतच चाललयं. भीषण अशी अतिशय गंभीर समस्या पूर्ण जगासमोर उभी राहिलीय ती म्हणजे प्लॅस्टिक.

आज - काल खाण्याचे पदार्थ ड्राय - फ्रुट, फुड्स च्या या जमान्यात सर्रास सर्व अन्नपदार्थ हे प्लास्टिकच्या पिशवी किंवा इतर प्लॅस्टिक उत्पादनातून दिल्या जातात. त्यामुळे त्याचा वापर झाला की, हे उरलेलं प्लॅस्टिक उघड्यावर गटारात टाकले जाते त्यामुळे प्राणी ते खातात आणि याचे पचन न झाल्याने त्याच्या जठरात, घशात ते प्लॅस्टिक तसेच राहते आणि थोड्या अवधीतच त्याचा मृत्यू होतोय. या प्लॅस्टिकमुळे कितीतरी पक्षाच्या जाती नामशेष होत चालल्यात. एवढेच काय मानवालाही कॅन्सर सारखा आजार होण्यामागे या प्लॅस्टिकचा हात आहे. गरम पदार्थ प्लॅस्टिक पिशवीतून मागितल्यास प्लॅस्टिक मधील काही अंश आपल्या जेवणात उतरतात आणि आपल्याला कॅन्सर होण्याची शक्यता असते. गटारात टाकलेले प्लॅस्टिक नाल्यामध्ये अडकून पावसाळ्यामध्ये पूर येण्याचे धोके वाढले आहेत. मुंबईमध्ये तर पावसाळ्यात दर वर्षी गटारे तुंबून खोल्यांमध्ये पाणी भरल्याच्या घटना आपण ऐकतोच.

सरकारने या प्लॅस्टिक बंदीसाठी अनेक कायदे केले. ते काही प्रमाणात अंमलात आले. २०१८मध्ये सरकारने प्लॅस्टिक बंदीवर कठोर कायदा केला. एवढा कठोर कायदा की ज्याच्याकडे प्लॅस्टिक दिसेल त्याच्याकडून सरळ ५००० रु. वसूल करायचे यासाठी एक वेगळी टीम नियुक्त केली. परंतु पुन्हा त्यावर तोडगा काढून प्लॅस्टिक पुन्हा आलेच. विज्ञानाच्या सहाय्याने कितीतरी उपाय शोधले आहे. कागदी पिशव्या, कागदी भांडी की ज्यांचे विघटन होईल. त्याचा वापर मोठ्या प्रमाणात होईल याचा प्रयत्न आपण सर्वांनी करणे गरजेचे आहे. आपल्याला पर्यावरणातून प्लॅस्टिक घालवणे हे आपल्या आणि आपल्या पुढच्या पिढीसाठी खूप आवश्यक आहे. यासाठी आपण नक्कीच प्रयत्नशील राहू.....

# मनातल्या आठवणी



हरवलेले हे दिवस येतील का पुन्हा
जगलो आज आणि उद्या हाच दिवस जुना
नशिबानेच एकदा पुन्हा कुठेतरी भेटू
आठवणीला एकदा एकत्र मिळून वेचू !!

पण तेव्हा सर्व काही बदललेलं असेल
कोणीतरी बोलावतयं म्हणून भेट लवकर सुटेल !!

लांबपर्यंत चालणाऱ्या गप्पागोष्टी राहणार नाही
आठवणींचा हा झरा मग त्या दिशेने वाहणार नाही !!

आज सोबत आहोत वाटेल तसं जगून घ्या
जीवनभर पुरतील अशा आठवणी जपून घ्या !!!!



**सायली किशोर बेर्डे**
तृतीय वर्ष, वाणिज्य

# तहान



सरली सुरेख थंडी — सुकली तळी जळाची
फोफावला उन्हाळा — पाणी पिण्यास नाही
संतप्त सूर्य आता — त्या सानुल्या जीवांची
ओकेल तप्त ज्वाळा — होईल लाही लाही

पक्षी दिशा दिशांना — त्यांच्या जीवाकरिता
फिरतील ते थव्यांनी — इतकी कराच सेवा
सुकतील कंठ त्यांचे — वाटीत एवढेसे
मग शोधतील पाणी — पाणी भरुन ठेवा



**सिद्धि शशिकांत गांगण**
तृतीय वर्ष, वाणिज्य



# लेक वाचवा !

**श्रद्धा रमेश पवार**
प्रथम वर्ष, वाणिज्य

मुलगी म्हणजे परक्याचे धन समजणे, तिला पालक आपल्यावरील बोजा समजतात. इतकच काय दैनंदिन व्यवहारात सहजतेने मुलींना दुय्यम वागणूक दिली जाते. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा ही मानसिकता किती चुकीची आहे. हेही सोदाहरण दाखवण्यात आले. कंपन्यांच्या नावाच्या पुढे 'ब्रदर्स' लागलेले आपण सहजतेने स्वीकारतो .... पण तुम्हाला कधी 'अमुकतमुक ॲन्ड सिस्टर्स' असे वाचायला मिळाले का ? आपण कोणाकडे पाहुणे म्हणून जाणार असलो तर मुलासाठी बंदूक अथवा तत्सम खेळ घेऊन जातो. मुलगी असेल तर तिच्यासाठी बाहुली घेऊन जातो. बोलतानाही अगोदर पुरुषवाचक उच्चार होणार, जसे बाहुला - बाहुली हे सर्व इतक्या सहजतेने होते, की त्यामध्ये काही चूक आहे हे आमच्याही लक्षात येत नाही.




स्त्रीभ्रूणहत्येबाबतच्या सामाजिक संस्थांच्या जाहिरातीमध्ये काही प्रतिमा वापरल्या जातात, त्याबाबतही अज्ञान दिसून येते, काही वेळा पहिली मुलगी किंवा दोन मुली असलेल्या गर्भवती महिलेवर यंत्रणांचे लक्ष्य, वगैरे बातम्या वाचण्यात येतात, अशा प्रकारची वक्तव्ये चुकीची आहेत. संबंधित महिलेच्या व्यक्तीगत अधिकारांचे उल्लंघन ठरते. अनेकदा एखाद्या संस्थेकडून उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र मिळवण्याचा खटाटोप केला जातो हा पूर्णपणे प्रसिद्धी स्टंट आहे. असे प्रमाणपत्र मिळविलेल्या किती अंगणवाड्या, रुग्णालयांचा सेवादर्जा सुधारलेला आहे हा प्रश्नच पडतो.

भारताला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे उलटून गेली तरीही हुंडाबळी, स्त्रीभ्रूणहत्या आणि स्त्री पुरुष भेदभाव सारख्या लज्जास्पद गोष्टी अजूनही समाजात दिसून येतात. आपण २१ व्या शतकात पोहचूनही आज महिलांना दुय्यम दर्जा दिला जातो. महिला या समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहेत. परंतु आजकाल महिलांविषयक गुन्हे दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. गुन्ह्यापैकी एक म्हणजे स्त्रीभ्रूणहत्या. वाढत्या स्त्रीभ्रूण हत्येमुळे एकूण लोकसंख्येमध्ये महिलांची आकडेवारी खालावली आहे. खालावत जाणारे लिंग गुणोत्तर आणि समाजाचा समतोल राखण्यासाठी स्त्री भ्रूणांचे संरक्षण करणे हे काळाची गरज बनली आहे, कारण स्त्री आणि पुरुष हे निसर्गाचे एक समान घटक आहेत. स्त्री - भ्रूण हत्या रोखण्यासाठी आणि लहान मुलींचे संरक्षण करण्यासाठी भारत सरकारने आणि सामाजिक संस्थांनी खूप अभियाने सुरू केली आहेत "बेटी बचाओ, बेटी पढाओ" हे अशाच अभियानांपैकी एक.

खूप अशा भारतीय महिला स्वातंत्र्य सेनानी, खेळाडू, शास्त्रज्ञ, समाजसेविका, अभिनेत्री, आणि नेत्यांनी भारताचे नाव देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवले आहे. राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर, राजमाता जिजाऊ, आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले, सरोजिनी नायडू, विजयालक्ष्मी पंडीत, कल्पना चावला, सुनिता विल्यम्स, सानिया मिर्झा, सायना नेहवाल, साक्षी मल्लिक, पी.व्ही.सिंधू अशा काही इतिहासातील आणि अलीकडच्या

काळातील कर्तबगार महिलांची नावे आहेत.

जीवन जगणे हा माणसाचा मूलभूत हक्क आहे. आणि स्त्री-भ्रूण हत्या करुन लोक तो हक्क क्रूरपणे हिसकावून घेत आहेत. ११ ऑक्टोबरला पूर्ण जगभरात आंतरराष्ट्रीय बालिका शिशु दिवस (International Girl Child Day) साजरा केला जातो. या दिवशी मुली आणि महिलांबद्दलच्या समस्या जसे की, लैंगिक भेदभाव, स्त्रीभ्रूण हत्या आणि शिक्षण, आरोग्य सेवा यामध्येही सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या समस्यांबद्दल जनजागृती केली जाते, व या समस्यांचे निर्मूलन करण्याचे प्रयत्न केले जातात. ह्या दिवशी बालविवाह, महिलांवर होणारे अत्याचार याबद्दल जनजागृती केली जाते. अशा सर्व समस्यांशी दोन हात करण्यासाठी भारत सरकारने ''बेटी बचाओ, बेटी पढाओ'' या अभियानाची सुरुवात केली आहे. ''मुलगी वाचवा, मुलगी शिकवा'' हा संदेश या अभियानामार्फत दिला जात आहे. या अभियानाला मराठीमध्ये ''लेक वाचवा, लेक शिकवा'' असेही म्हणतात.

''बेटी बचाओ, बेटी पढाओ'' हे स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी भारत सरकारद्वारे सुरु करण्यात आलेले अभियान आहे. या अभियानाची ओळख, ४ ऑक्टोबर २०१४ रोजी करण्यात आली. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातर्फे २२ जानेवारी २०१५ रोजी हरियाणा मधील पानिपतमध्ये अधिकृतपणे सुरुवात करण्यात आली. ऑगस्ट २०१६ सालच्या ऑलिम्पिक खेळांमध्ये कास्य पदक मिळवणारी साक्षी मलिक हिला ''बेटी बचाओ, बेटी पढाओ'' अभियानाची ब्रँड ॲम्बेसिडर बनवण्यात आले. ''बेटी बचाओ, बेटी पढाओ'' अभियान घराघरात पोहचवण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सेल्फीविथडॉटर (selfi with daughter) या सोशल मिडियावर हॅशटॅग चा वापर करून अपलोड करण्याचे आवाहन दिले. यामुळे ''बेटी बचाओ, बेटी पढाओ'' अभियानावर जागतिक स्तरावर लोकप्रियता मिळाली.

* * *



निवासी शिबिरात
योगा करताना स्वयंसेवक.



विद्यापीठामार्फत जिल्हास्तरावर घेतलेल्या
मेहंदी रेखाटन स्पर्धेमध्ये
मेहंदी रेखाटताना कु. आशिया फरास.

# माझा पहिला गुरु माझी आई !



माझ्या आयुष्याची सुरुवात या दोन शब्दांपासून झाली
त्या वेळेस या दोन शब्दांचा अर्थ समजत नव्हता
आणि आता अर्थ काढायला शब्द कमी पडतात
जे शब्द तिनेच मला शिकवले
तिच्या डोळयातून पहिल्यांदा मी या जगाकडे पाहिलं
त्या प्रेमळ नजरेने
आजही तसेच पाहण्याचा प्रयत्न करते
तिनं मला प्रेम करायला शिकवलं
जगावर माणसांवर
प्रेमाची भाषा शिकवली
जी कुठल्याच शाळेत शिकवली जात नाही
अशी माझी आई माझा पहिला गुरु



**राखी रविंद्र डोळस**
तृतीय वर्ष, वाणिज्य

# आई बाप



सेवा कर आईबापाची आठवून श्रावणबाळाला
आठवून श्रावण बाळाला
विसरु नको रे कधी मानवा धन्य त्या आईबापाला

नऊ महिने आईने तुझा तो भार वाहिला
तुझं रडणं ऐकूनी बाप तो धावूनी आला
विसरु नको रे कधी मानवा धन्य त्या आईबापाला

होऊनी सागर मायेचा आईने इच्छा पुरविल्या
घेऊनी पोटाला चिमटा बापाने शाळेत घातले
विसरु नको रे कधी मानवा धन्य त्या आईबापाला

आईबापाला हाकलूनी घराचा मालक तो झाला
मुलाचे कर्तव्य टाकूनी ना अर्थ तुझ्या जीवनाला
विसरु नको रे कधी मानवा धन्य त्या आईबापाला



**राकेश सुधाकर सावंत**
द्वितीय वर्ष, वाणिज्य



# वाढते प्रदूषण धोकादायक पातळीवर

**प्रसाद नरेंद्र नारकर**
प्रथम वर्ष, वाणिज्य

जगभरातील एकूण प्रदूषणाच्या मृत्यूपैकी भारतात एक चतुर्थांश लोक मरतात. सुरक्षित मर्यादेपेक्षा हे प्रमाण दहा पटीने जास्त आहे. २०१७ साली नोव्हेंबरमध्ये दिल्लीतील विषारी धुळीने इंडियन मेडिकल असोशिएशनला सार्वजनिक आरोग्य आपतकालीन म्हणून घोषित करण्यास भाग पाडले. आणि नागरिकांना घराबाहेर राहण्याची आणि शाळा बंद करण्याची सूचना केली होती. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालातील जगातील ८५९ सर्वात प्रदुषित शहरांच्या यादीत मुंबईचे ६३ वे स्थान आहे.



प्रदूषित शहरांच्या यादीत वाढत चाललेली भारतीय शहरांची नावे ही एक प्रकारे धोक्याची घंटा आहे. ज्या देशातील माणसांचे सरासरी आर्थिक उत्पन्न कमी आहे. ज्यांच्याकडे प्रदूषण नियंत्रणाच्या योग्य उपाययोजना नाहीत. अशा देशांना प्रदूषणाचा विळखा बसत आहे. यात भारतासह आफ्रिका खंडातील देशांचाही समावेश आहे.

दरवर्षी वायुप्रदूषणामुळे जगभरात ७० लाख लोकांचा मृत्यू होत असल्याची माहिती या अहवालातून समोर आली आहे. तसेच वायूप्रदूषणामुळे हृदयासंबंधीच्या समस्या, श्वसन रोग यासारख्या समस्यांमध्येही वाढ होत असल्याचे समोर आले आहे. जगातील प्रदूषित शहरांपैकी भारतातील १४ शहरे आहेत.पृथ्वीवरील १० पैकी ९ लोक प्रदूषित वातावरणात श्वास घेतात आणि दरवर्षी ७ दशलक्ष लोकांचा मृत्यू होतो. असे WHO च्या अहवालामध्ये नमूद केले आहे. वायूप्रदूषणाचे मुख्य स्त्रोत सल्फेट, नायट्रेट आणि काळा कार्बन हे आहे. कोळशावर चाललेला ऊर्जा प्रकल्प, रस्त्यावरील वाहनांचे प्रदूषण, विविध कारखान्यातून होणारे वायू उत्सर्जन तसेच उर्जेचा चुकीचा वापर यामुळे ही समस्या जटिल बनली आहे.

वायूप्रदूषणामुळे जवळपास सर्व आशियाई देश आणि आफ्रिकन देशांमध्ये हृदयरोग, ब्रेनस्ट्रोक आणि फुफ्फुसाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढले आहे. माणूस दिवसेंदिवस प्रदूषणामुळे रोगी होत चालला आहे. अनेक रोगांनी त्याला विळखा घातला आहे.

हवेतून होणारे वायूप्रदूषण म्हणजे फटाके व त्यातून होणारे प्रदूषण, केरकचरा व नाले त्यांची दुर्गंधी, प्लॅस्टिकचे ज्वलन हे वायूप्रदूषण निर्माण करतात. अनेक आजारांना आमंत्रण देतात. त्यामुळे त्यांची योग्य विल्हेवाट लावणे आवश्यक आहे व त्याचबरोबर लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे आवश्यक आहे.

यू एन एजन्सीचे मूल्यांकन उपग्रह डेटा आणि मॉडेलिंगवर आधारित आहे. मागील अहवालावरुन मोठ्या प्रमाणात सुधारित केलेल्या संख्येसह हा नवीन अहवाल जागतिक आरोग्य संघटनेने मांडला आहे. यापासून भारत सरकारने बोध घेवून वाढत्या प्रदूषणावर मात करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे. सौरऊर्जा, सार्वजनिक वाहनांचा वाढता वापर यावर भर देणे देशासाठी महत्त्वाचे आहे. तरच पर्यावरणविषयक समाधानकारक चित्र दिसेल.

# हृदयातील प्रेम

माझ्या हृदयात ग तू
स्वतः बनूनी वाहतेय तू
मी तुझाच आहे ना
मग माझ्याकडे अशी का पाहतेय !

असं एकसारखं पाहू नकोस
आपल्यात निर्माण होईल दुरावा
सांग माझं प्रेम सिद्ध करण्यासाठी
मी काय देऊ तुला पुरावा !
असं वाटतयं एखाद्या धबधब्यात
तू परीसारखी नाहतेस
माझ्या हृदयात ग तू रक्त बनूनी वाहतेस !

फुलांच्या या बागेत कुठे तू हरवलीस
शोधून शोधून थकलो मी
तू तर माझ्याजवळच मिरवलीस
कधी वाटलं नव्हतं मग जाशील सोडून
तूच बनवलेली प्रेमाची रांगोळी
एक दिवस जाईल मोडून
माझ्या जवळ अशी गीत गातेस
माझ्या हृदयात गं तू
रक्त बनूनी वाहतेस !

बंदिस्त झाल्या दाही दिशा
जीवना आला अंधार गं
शोधू लागलो प्रकाशाची वाट
जीवनाला आला बहार गं
असं वाटतं, माझ्या कानी अजूनही तू गुणगुणतेस
माझ्या हृदयात ग तू
रक्त बनूनी वाहतेस !



**प्राजक्ता मनोहर सुतार**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

# भारत



जगात ज्याची मोठी शान
भारत आमुचा देश महान ।।

भारताच्या डोक्यावर हिमालय मुकूटधारी
ताजमहालावर तर फिदा दुनिया सारी।।

रत्नांची नगरी आहे भारत
ऋषीमुनींनी लिहिली गीता, भागवत ।।

राजेंनी उभारले शून्यातून स्वराज्य
त्यांनीच नष्ट केले मोगलांचे साम्राज्य ।।

रामायणातले राम - लक्ष्मण महाभारतातले कृष्ण - अर्जून
इतिहासात नाव त्यांचे घेतात आवर्जून ।।

संविधानिक मूल्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता
देशात नांदते राष्ट्रीय एकात्मता ।।

देश आमचा कृषिप्रधान जगी त्याचा मोठा मान
जिंकू किंवा मरु हा नारा जगी आमचा देश प्यारा ।।



**पूनम पंढरी चव्हाण**
द्वितीय वर्ष, वाणिज्य



# मुलगी वाचवा मुलगी शिकवा

**नेहा ठाकूर**
द्वितीय वर्ष, कला

ज्या माऊलीच्या कुशीतून या स्वराज्याने जन्म घेतला त्या राजमाता जिजाऊ, स्त्री शिक्षणाची क्रांतीकारक सावित्रीबाई फुले याबरोबर स्त्रीच्या हक्कासाठी ज्या माऊलींनी लढा दिला त्या प्रत्येक माऊलीला रणरागिणीला माझा मानाचा मुजरा. पुरुषात्वाच्या ओझ्याखाली लपलेलं स्त्रीचं जग उघड्या साश्रूनयनांनी बघायचयं. काळाच्या पड्याआड ओढू नको आई मला आता जगायंचय. ही आर्त पुकार आहे. गर्भातल्या मुलीची, जिला आतही सोसावं लागतंय आणि बाहेरही, खरचं आपण इतके निह्रदय झालो आहोत का ? आई पाहिजे, ताई पाहिजे, आजी पाहिजे, मैत्रिणदेखील पाहिजे मग तुम्हाला मुलगी का नको हाच गंभीर विषय 'लेक वाचवा लेक शिकवा' 'मुलगी शिकली प्रगती झाली' हे बोधवाक्य आपण ऐकत आलोय. एक मुलगी शिकली तर मोठेपणी संपूर्ण कुटुंब सुधारते. स्त्री हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे. 'शिकलेली आई घरादाराला पुढे नेई' हे ऐकायला खरचं किती छान आणि गोड वाटतं. पण आज आपण प्रत्येक जन घरादाराचा वंश पुढे नेणारी आई गर्भातच मारुन टाकतोय. गर्भनिदान करुन स्त्रीभ्रूणहत्या होताना आपण पाहात आलोय. आणि या वंशाच्या दिव्यानं गोड वंशाच्या पणती मिळणं अशक्य झालयं. इतकी भीषण परिस्थिती आपल्या महाराष्ट्रावरच नव्हे तर संपूर्ण भारतावर ओढावत चाललीय. खुडू नका हो या कळयांना उमलू द्या हो या फुलांना, जाणून मर्म या बालिकेचा फुलवूया धर्म हा मानवाचा, जाणोनी अर्थ या जीवनाचा कन्येस पुत्र माना सारथी या युगाचा. आज समाजात स्त्री पुरुष समानता नुसतं म्हटलं जातं. पण खरचं तिला तिचा दर्जा, मान, सन्मान मिळालाय का ? कायम अपेक्षित आणि विखारी नजरेने स्त्रीची फक्त अवहेलनाच होत चाललीय. अगदी गर्भात असल्यापासून स्त्रीचं जीवन अस्थिर असतं. आज समाजात असलेल्या प्रत्येक घटकानं विचार केला पाहिजे की, मी ही कुठल्यातरी आईच्याच पोटी जन्म घेतला आहे मग मुलगा हवा या हट्टापोटी भविष्यातील आई म्हणजेच गर्भातल्या मुलीला तुम्ही मारुन टाकताय. आज समाजात अशी परिस्थिती असली तरी कित्येक दवाखान्यांमध्ये त्या पालकांना मुलगी जन्मली म्हणून त्या पालकांचा संपूर्ण खर्च माफ केला जातोय. कित्येक पालक मुलगी जन्मली म्हणून आनंदोत्सव साजरा करतात. गेल्या एक दोन वर्षांपासून पंकजा ताई मुंडे यांनी तर प्रत्येक पालकास एक मुलगी असेल तर त्या पालकास १ लाख रुपये देवू केलेत आणि याच समाजात आमदार, खासदार लोकांसारखे म्हणतात की, तुम्हाला ती मुलगी आवडली ना तुम्ही मला कॉल करा मी आणण्यास मदत करतो. अहो याच समाजात अशी माणसं देखील आहेत की, स्त्रीभ्रूणहत्या, महिलांवर, मुलींवर अत्याचारदेखील करतायत. पण आज जर ग्रामीण भागात पाहिलं तर वंशाच्या दिव्यासाठी कित्येक वंशाच्या पणत्या विजवल्या जातायत आणि याला कारणीभूत याच समाजातील स्वार्थी आणि मनाने दरिद्री असणारे लोकच आहेत. निर्मिती केली असं आवश्य म्हणा पण ज्या माऊलीनं शिवबाला जन्म दिला, ज्या माऊलीनं शिवबाला लढायला शिकवलं, ज्या माऊलीनं शिवबाला घडवलं, त्याच माऊलीच्या लेकींना



आज गर्भातच मारले जात आहे. छत्रपती नंतर या स्वराज्याची धुरा सांभाळणारे युवराज आणि येसूबाई यांनी देखील या स्वराज्याचे किती गड राखले आहेत. आपल्या भारताला आपल्या महाराष्ट्राला जसा इतिहास महापुरुषांचा आहे तसाच इतिहास रणरागिणींचा देखील आहे.

पण याच समाजात काही पालक मुलींना शिक्षणापासून वंचित ठेऊ लागले आहेत. मुलींना शिकवायचं म्हणजे नेमके काय करायचं, शाळा, पाटी, पुस्तक, दप्तर हे शाळेचे साहित्य त्यांच्या हातात दिलं म्हणजे शिक्षण झाले का ? असं मुळीच नाही. आज समाजात जरा डोकावून पहा, समाजाची खरी परिस्थिती तुम्हाला कळेल. सकाळी शिक्षणासाठी घराबाहेर पडलेली मुलगी संध्याकाळी घरी परत येईल याची हमी आज मी ही देऊ शकत नाही आणि तुम्हीही आणि याचसाठी स्त्रियांना, मुलींना स्वसंरक्षणाचे शिक्षण देणं गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात आयाबहिणींची अब्रू लुटणाऱ्यांचे हात-पाय जागीच कलम केले जात असत आणि आज याच छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीत कपाळी चंद्रकोर आणि गळ्यात रुद्राक्षांच्या माळा घालणारे काही युवक भर रस्त्यात तरुणींवर अत्याचार करतायत. आज जगभराची परिस्थिती पाहिली तर माझा शेतकरी बाप उभ्या जगाचा पोशिंदा आत्महत्या करतोय, विचार करा सकाळी बाहेर गेलेला पती समोरच्या झाडाला लटकतोय हे बघून तिच्या मनावर काय बांधलं असेल पण त्या क्षणी ती रडत बसत नाही त्या क्षणी ती लढत असते. तुम्ही ऐकलयं की कुठल्या स्त्रीनं एका संसाराला कंटाळून आत्महत्या केलीय, कधीच नाही. ती फक्त लढत असते. एका कुटुंबात आई, वडील, मुलगा, मुलगी राहत असतात. वडील कामानिमित्त बाहेर गेलेले असतात आणि त्याच दिवशी घरात पाहुणे आलेले असतात. पाहुण्यांना चहा करण्यासाठी घरात दूध संपलेलं असतं. आई तिच्या लाडक्या मुलाला म्हणते जा रे बाळा दूध घेऊन ये. आमचं बाळ म्हणतं आई मला वेळ नाही आहे. तीच आई आपल्या लाडक्या मुलाला परत एकदा सांगते, एका हातात ग्लास घेत आणि पाहुण्यांसमोरुन तो ग्लास ठाणठाण वाजवत तो पाहुण्यांना दाखवत जातो. तुम्हाला दूध आणायला चाललोय पण त्याच घरातील आई त्या मुलीला सांगते, मुलगी एका नजरेतून ओळखते की, आपल्या आईकडे एवढा एकच रुपया आहे. हा रुपया हरवला तर परत पैसे नाहीत. तो रुपया घेते. गच्च मुठीत पकडते. ग्लास घेते. फाटक्या फ्रॉकमध्ये ग्लास लपवते पाहुण्यांना कळूसुद्धा देत नाही की, माझ्या बापाच्या घरात दूध संपलय. ते दूध मी तुम्हाला आणायला चाललेय. आणि मग आईला दूध देते आणि सांगते आई चहा करा आणि त्याच समाजात या आईची आजी होते. आणि याच आजीला सर्वात जास्त वंशाच्या दिव्याची हाव सुटलेली असते. पण खरचं मुलगी म्हणजे प्रेमाचा सागर, मायेचा आगर. लहानपणी आई-बाबांना कुटुंबात मदत करणारी ही मुलगीच असते. सासर आणि माहेर या अनोळखी कुटुंबाचं शेवटच्या क्षणी बाबाही आर्त किंकाळी मारते. म्हणूनच म्हणावसं वाटतं 'मुलगी वाचवा, मुलगी शिकवा'.




**महिला सबलीकरण विषयावरील मार्गदर्शिका सौ. सुशिला मुंडे यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल.**

# गर्भकन्येचा फास



पुत्रच जन्म घ्यावा पोटी आस केव्हा मिटेल का ?
गर्भकन्येच्या गळयाचा फास केव्हा सुटेल का ?
जगायची आशा होती, बागडायची मनिषा होती
बाबा तुमच्या कुशीमध्ये विसावयाची आस होती

मायेचा हात कसा ममरक्ताने माखून गेला
जीवनाची आसच नव्हे तर एक जीवनच कापून गेला
पण बाबा, आईसवे असलेली मातृत्वाची
नाळ केव्हा तुटेल का ?
गर्भकन्येच्या गळयाचा फास केव्हा सुटेल का ?

आक्रोश रोखला कसातरी हुंदका काही थांबत नाही
पत्थराची दुनिया झाली, काहीच कसं वाटत नाही
पोटचा गोळा तुडवताना हृदय कसं फाटत नाही
स्त्रीची जन्मकहाणी अशीच का ?
स्त्रीच्या जन्माला फाशीच का ?

फासावरतीच जगणे आमुचे फासावरतीच मरण का ?
नराधम कसे देव मानू मी तवं चरणी मी शरण का ?
पुत्रच जन्म घ्यावा पोटी आस केव्हा मिटेल का ?
गर्भकन्येच्या गळयाचा फास केव्हा सुटेल का ?



**पूनम पंढरी चव्हाण**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

# छत्रपती शिवराय



जन्म झाला त्यांचा शिवनेरी गडावर
लिहावे तितके कमी त्यांच्या बालपणावर

सरदार शहाजीराजे हे त्यांचे पिताश्री
महाराणी जिजाबाई त्यांच्या मातोश्री

दादोजी कोंडदेव हे त्यांचे गुरु
सातव्या वर्षापासून त्यांचे
शिक्षण झाले सुरु

लहान वयात सुरुवात केली
स्वराज्य कार्याला
एक नवी उमेद मिळाली
जगण्यासाठी महाराष्ट्राला

अनेक गड ताब्यात घेऊन
विजय मिळवला सत्तेवर
पळ काढण्यासाठी वेळ आली
मोगल सैन्यावर



**राकेश सुधाकर सावंत**
द्वितीय वर्ष, वाणिज्य



# संगणक क्षेत्र आणि रोजगाराच्या संधी

**विनायक महेश पांचाळ**
द्वितीय वर्ष, कला

'घरोघरी मातीच्या चुली' ही म्हण सर्वांना माहितच आहे. परंतु या शतकामध्ये घरोघरी संगणक व इंटरनेटचे युग म्हणून प्रचलित आहे. माहिती मिळवणे, माहिती साठविणे, माहितीच्या विविध प्रक्रिया करणे. माहितीची देवाणघेवाण करणे. याकरिता संगणकाचा उपयोग सर्वच क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात होतो आहे. माहिती - तंत्रज्ञान क्षेत्राची घोडदौड थांबविणे आता कठीण झाले आहे. संगणकाचा उपयोग जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये होत आहे.



अगदी सकाळी उठल्यानंतर आपण पेपर वाचतो. हा पेपर संगणकाचा उपयोग करुन तयार केला जातो. विविध बँका, कारखाने, शासकीय - निमशासकीय खाजगी कार्यालये, रेल्वे, एस. टी. महामंडळ, विविध प्रवासी सेवा संस्था, हॉटेल्स, रुग्णालये, विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा इ. ठिकाणी संगणकाचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जातो इंटरनेटमुळे जगात एक नवीन क्रांती घडली आहे. ई-जीवन क्रांती जीवनाचा एक भाग बनली आहे. म्हणूनच या क्षेत्रांमध्ये तरुणांना रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध झालेल्या आहेत. या संधी वाढतच जाणार आहेत. या क्षेत्रांमध्ये योग्य प्रशिक्षित असलेल्या मनुष्यबळाची कमतरता सतत भासत आहे. अत्यंत कमी खर्चामध्ये व कमी कालावधीमध्ये तरुणांना संगणकाचे आवश्यक ज्ञान घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहता येते.

अगदी दहावी / बारावी उत्तीर्ण - अनुत्तीर्ण विद्यार्थीही या क्षेत्रामध्ये यशस्वी होऊ शकतात. युवक - युवती संगणकाच्या विशिष्ट विषयाचे ज्ञान घेऊन त्या ज्ञानावर आधारित नोकरी करु शकतात किंवा स्वतःचा व्यवसाय सुरु करु शकतात. संगणकासंबंधीचे अगदी प्राथमिक ज्ञान मिळवण्यासाठी 'एम. एस. सी. आय. टी. सारखा कोर्स करु शकतात. या कोर्समध्ये वर्ड डॉक्युमेंट, मायक्रोसॉफ्ट एक्सेल, पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन आणि इंटरनेटच्या वापराबाबतचे प्राथमिक शिक्षण दिले जाते. वर्ड डॉक्युमेंट या सॉफ्टवेअर मध्ये टायपिंग करता येतं. पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनमध्ये मोठमोठ्या कंपन्यांना विविध प्रकारचे प्रकल्प आपण तयार करुन देऊ शकतो. संगणक क्षेत्रातील डेस्कटॉप पब्लिशिंग (डी.टी.पी.) या प्रणालीचा उपयोग प्रिंटींग टेक्नॉलॉजीमध्ये (छपाई तंत्रज्ञानात) खूप मोठ्या प्रमाणात होत आहे. डीटीपी ऑपरेटर म्हणून नोकरी करु शकतो. या क्षेत्रांचा अनुभव घेऊन विद्यार्थी संगणकावर घरी व्यवसायदेखील सुरु करु शकतो.

कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना टॅलीपॅकेजवर आधारित कम्प्यूटर फायनान्शिअल अकाऊंटिंगचा कोर्स करता येतो. तो तीन महिन्यापासून ते दीड वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी आहे. प्रत्येक क्षेत्रात फायनान्स अकाऊंटिंग हे संगणकीकृत झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना या क्षेत्रांमध्ये नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. विविध कंपन्या, कार्यालये,

महाविद्यालये, शाळा इ. ठिकाणी टॅलीवर आधारित कामाच्या संधी उपलब्ध आहेत. टॅलीचा योग्य अनुभव घेतल्यास या क्षेत्रामध्ये स्वतःचा व्यवसाय सुरु करता येऊ शकतो. कम्प्यूटर हार्डवेअर आणि नेटवर्किंगच्या क्षेत्रांमध्येही तरुणांना अनेक संधी उपलब्ध आहेत.

संगणकासाठी सर्व्हिसिंग, देखभाल, दुरुस्ती सतत लागतच असते. कम्प्यूटर हार्डवेअर आणि त्याचे नेटवर्कींग हेही तुम्हाला कमी काळात शिकता येते. हे कोर्स सर्टिफिकेट व डिप्लोमा कोर्सेस आहेत. खाली दिलेले अभ्यासक्रम कमीत कमी ६ महिने ते २ वर्षापर्यंतचे आहेत.

1) Computer Hardware and Networking
2) Certificate Course in P.C. Maintainance
3) Certificate Course in Networking

'कम्प्यूटरचे डॉक्टर म्हणजेच हार्डवेअर इंजिनियरची मागणी दिवसेंदिवस वाढते आहे. आपण स्वतःचं कम्प्यूटर हार्डवेअर सेल्स ॲन्ड सर्व्हिस सेंटर सुरु करु शकतो.

याशिवाय इंटरनेट व वेब डिझाईनिंगचे क्षेत्र युवकांना खुणावते आहे. विविध संस्था, कार्यालये यांना आपल्या वेबसाईट्स तयार कराव्या लागतात. अशा प्रकारच्या सेवा देणाऱ्या युवकांना अतिशय व्यापक क्षेत्र खुले केले आहे. त्याबरोबरच ॲनिमेशनसारख्या क्षेत्रांमध्ये नोकरी-व्यवसायाच्या संधी उपलब्ध आहेत.

तरुणांनी आपली आवड व कल ओळखून या क्षेत्रातील प्रशिक्षण घ्यावे आणि स्वतःच्या पायावर उभे रहावे.



**प्रश्नमंजुषा कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. बी. ए. कश्यप.**



**रक्तगट व हिमोग्लोबीन चेकींग कॅम्पमधील एक क्षण.**



# आईचे डोळे

डोळे मिटून प्रेम करते
ती प्रियसी असते...
डोळे मिटल्यासारखे करते,
ती मैत्रिण असते...
डोळे बटारुन प्रेम करते
ती पत्नी असते...
डोळे मिटेपर्यंत प्रेम करते
ती आई असते...
खरंच.... आई किती वेगळीच असते
प्रत्येक डोळ्यांत साचलेले तळे असते



**अश्विनी शांताराम पवार**
तृतीय वर्ष, वाणिज्य

# जीवनात यशस्वी होण्याचा मार्ग



पाचलच्या कुशीत आले मी जन्माला
कोकणभूमीच्या या मुलांना घडवायला
मनोहर हरी खापणे कॉलेज नाव मिळाले मला
झाला आनंद या पाचल गावाला
कॉलेजमध्ये या आलेले सर्वजन
घेऊन गेले ते उत्कृष्ठ शिक्षण
ज्यांनी घेतले इथे ज्ञान
त्यांनी वाढवली या कॉलेजची शान
कित्येक वर्षे सरली माझी जरी
तरीही नाही झाले मी म्हातारी
अजूनही ज्ञान देण्याची आहे माझी तयारी
इथला स्टाफ तर खूप भारी
म्हणूनच म्हणतात सर्वजन
मनोहर हरी खापणे कॉलेज लय भारी



**सिद्धेश दयानंद मोरे**
द्वितीय वर्ष, वाणिज्य



# 'शिक्षक' भावी पिढीचा शिल्पकार

**सुचिता नवनाथ शिंदे**
प्रथम वर्ष, वाणिज्य

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर रोजी जन्मदिन हा 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. 'शिक्षक' हा भावी पिढ्यांचा शिल्पकार असून त्यांच्याकडूनच आपल्याला ज्ञान व जगाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी मिळत असते. आपल्या गुरु, शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस....

डॉ. राधाकृष्णन यांचे शिक्षकांप्रती असलेले प्रेम व आदर पाहून सरकारने त्यांचा जन्मदिन हा 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करण्याचा संकल्प केला. ती परंपरा अजूनही सुरु आहे व भविष्यातही सुरुच राहिल. १९६२ मध्ये डॉ.राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेव्हा त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकाचा गौरव दिन म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याचे त्यांनी सांगितले होते.



डॉ. राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी मद्रास जवळील तिरुराणी येथे झाला. ते ब्राम्हण कुळातील असल्याने त्यांच्या घरात नेहमी धार्मिक विधी केला जात असे. त्या धार्मिक वातावरणातच ते लहानाचे मोठे झाले. वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी त्यांनी मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण केली. 'तत्वज्ञान' हा त्यांचा आवडता विषय असल्याने त्यांनी या विषयात पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी मद्रासच्या एका महाविद्यालयात नोकरी केली. नोकरी करत असताना त्यांनी शिक्षण सोडले नाही. त्यांनी 'वेदांतातील नीतिशास्त्र' या विषयावर प्रबंध सादर केला. त्यांच्या प्रबंधास विद्यापीठाने सर्वोत्तम प्रबंध म्हणून जाहीर करुन त्यांचा गौरव केला. एक उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून त्यांनी आपल्या कार्यातून स्वतःची साऱ्या जगाला ओळख करुन दिली. कुशल व्यक्तिमत्त्व व इंग्रजी भाषेवर असलेल्या त्यांच्या प्रभुत्वामुळे परदेशात त्यांची प्रशंसा झाली. त्यांच्या ऋणातून आपण कधीच मुक्त होऊ शकत नाही. ऑक्सफर्ड विद्यापीठातही ते 'नीतिशास्त्र' या विषयाचे प्राध्यापक होते. शिक्षकांना वैदिक काळापासूनच गुरुचे स्थान आहे. त्यांच्या ऋणातून आपण कधीच मुक्त होऊ शकत नाही. आज शिक्षणाचे अवमूल्यन केले जात असल्याचे चित्र समाजात दिसत आहे तसेच गुरु-शिष्य संबंधामधील पवित्र भावना लोप पावत आहे. या संबंधामधील पावित्र्य कायम ठेवण्यासाठी व डॉ. राधाकृष्णन यांच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी शिक्षण दिन साजरा केला जातो.

शिक्षक हा समाज परिवर्तन करणारा एक घटक आहे. भविष्यातले विचारवंत, कलाकार, लेखक, तत्वज्ञ, पुढारी, डॉक्टर, प्राध्यापक, इंजिनियर, शास्त्रज्ञ तयार करण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये असते. मातीच्या गोळ्याला कुंभार आकार देऊन त्यापासून एखादी प्रतिकृती तयार करत असतो. अगदी त्याचप्रमाणे शिक्षक बालकाचा कोऱ्या मनावर योग्य संस्कार करुन त्यातून भविष्यातील जबाबदार नागरिक घडवित असतात. आपल्या आई - वडिलांनंतर शिक्षक हे आपले अप्रत्यक्षरित्या पालकच असतात. शिक्षक हे आपल्याला केवळ पुस्तकी ज्ञान शिकवित नाहीत तर आपण त्यांच्याकडून जगण्याची कला आत्मसात करत असते.

आपल्या व्यक्तिमत्वावर त्यांच्याकडून संस्कार, संस्कृती, परंपरा, चालीरिती व आदर असे पैलू पाडले जात असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंचा शिक्षक दिनी कृतज्ञता व्यक्त करुन त्याचे ऋण फेडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

* * *

# आठवण कॉलेजची



रुप तुझं देखणं आवड तुला गजऱ्याची
खळी तुझ्या गालावर, लाईन तुझी नजरेची
भाळलया रुप तुझं वय तुझ विसावं
धडधडल्या जिवात काळीज माझं बसावं
चालनं तुझं लयभारी ठुमका तुझ्या कमरेचा
चिकणा -चिकणा दिसतोय झुमका तुझ्या कानाचा
आठवणीत तुझ्या रात्र -रात्र तळमळतोय
रोज - रोज कॉलेजला येऊन जीव तुला लावतोय
ऐक पोरी थोडं तरी जवळ मला घेणं
नाही सहन होत तुझ दूर-दूर जाणं
शब्द आहे प्रेमाचा रंग गुलाबी तुझ्या गालाचा
आता तरी दे मला इशारा तुझ्या प्रेमाचा



**सुदेश विलास बने**
तृतीय वर्ष, वाणिज्य

# जीवनाचे सार

जन्माला आला आहेस
थोडं जगून बघ
जीवनात खूप दुःख आहे
जरा थोडं सोसून बघ
चिमूटभर दुः खाने कोसळू नकोस
दुःखाचे पहाड चढून बघ
यशाची चव चाखून बघ
अपयश का येते ते निरखून बघ
डाव मांडण सोपं असतं
थोडं खेळून बघ
घरटं बांधण सोपं असतं
थोडी मेहनत करुन बघ
जगणं कठीण मरणं सोपं असतं
दोन्हीतल्या वेदना झेलून बघ
जीणं मरणं एक कोडं असतं
जाता - जाता एवढं सोडवून बघ
जाता - जाता एवढं सोडवून बघ



**मयुरी उदय कोलते**
द्वितीय वर्ष, कला



# वाढता भ्रष्टाचार

**आदित्य सुभाष माळी**
प्रथम वर्ष, वाणिज्य

भारत दिवसेंदिवस विकसित राष्ट्र बनण्याकडे वाटचाल करत आहे. परंतु आपल्या समोर आजही अनेक गंभीर समस्या आहेत. वाढती लोकसंख्या बेरोजगार या सोबतच भ्रष्टाचार ही आपल्या देशासमोरील गहन समस्या आहे. अगदी सरकारी शिपायापासून ते मोठ-मोठ्या राजकीय नेत्यांपर्यंत अनेक लोक भ्रष्टचाराला स्वतः खतपाणी घालत आहेत. आज भारतातील कोणतेही छोटे मोठे काम करायचे झाले तर आपल्याला समोरच्याला थोडेफार चहापाणी द्यावेच लागते. कोणालाच त्यात काही वावगे वाटत नाही, पण कळत नकळत आपणही भ्रष्टाचाराला वाव देत आहोत.

भ्रष्टाचाराला सुरुवात झाली कशी व कुठून याबद्दल कोणीही माहिती सांगत नाही, पण हे खरं आहे की, जसजसा माणसांकडे पैसा येऊ लागला तस तसा माणूस चैनीच्या व दिखाव्याच्या गोष्टींकडे आकर्षित होऊ लागला. पूर्वी जेव्हा माणसाकडे जास्त पैसा नव्हता तेव्हा त्यांच्यासाठी दैनंदिन गरजेच्या वस्तू महत्त्वाच्या होत्या. त्यांची अपेक्षा फक्त दोन वेळेचे पुरेसे जेवण आणि जीवनावश्यक वस्तू मिळवणे एवढेच होते. त्यामुळे पूर्वीचे बहुतेक लोक मेहनती आणि निर्मळ मनाचे होते. जसजशी सुधारणा होत गेली तश्या अनेक चैनीच्या वस्तू उपलब्ध होऊ लागल्या. गरज नसतानाही त्या हव्याहव्याशा वाटू लागल्या.

आपल्या पदाचा, अधिकाराचा कमीतकमी मेहनत करुन जास्तीत जास्त नफा करुन घेणे हा भ्रष्टाचारामागचा उद्देश असतो. पण सामान्य माणूस जेवढा गुन्हेगार तेवढाच लाच मागणारा माणूस किती सहजपणे आपण नकळत गुन्हा करत असतो. किती वेळा बघतो आपण नाक्यावर पोलिसांनी पकडले की, सर्वजण पोलिसांच्या हातावर पन्नास - शंभर रुपये टेकवून पुढे निघून जातात. सरकारी नोकरीच्या ठिकाणी तर लाखाची लाच दिली जाते. शाळेत कॉलेजात ॲडमिशन घेताना कोण - कोणाला पैसे चारले जातात. इतकच नव्हे तर देवळाच्या रांगेमध्ये सुद्धा आपण १०००-५०० रुपये देऊन लवकर दर्शन घेतो का? देवाच्या दर्शनासाठी इतर फक्त उन्हात ताटकळत असताना आपण मात्र जोरावर पुढे जाऊन दर्शन घेतो. पटत असेल का हे देवाला ? आपल्या मनाला तरी पटते का ?

किती वेळा लोक दुसऱ्यांना पैसे देऊन नोकरी किंवा उच्च पद मिळवतात. निवडणुकांमध्ये मतदारांना पैसे देऊन मतं खरेदी केली जातात. नंतर जेव्हा अशा लोकांना अधिकार प्राप्त होतात तेव्हा हे लोक अनेक पटींनी वाटलेले पैसे वसूल करतात. आपली प्रत्येक कामे करताना आपल्याला त्यांना पैसे द्यावे लागतात का ? हे आपल्याला आधी कळत नाही. जे लोक चांगली कामं करुन निवडून येण्याऐवजी मतदाराला पैसे चारुन निवडून येतात ते लोक निस्वार्थपणे समाजाची सेवा करणार नाहीत. तेव्हा आपण डोळ्यांवर बक्षिसांची पट्टी बांधून कोणालाही निवडून देतो आणि मग भारतातील सिस्टिमला नाव ठेवत बसतो.

काही दिवसांपूर्वी मी एक लघुपट पाहिला होता. त्यात एक भ्रष्ट अधिकारी असतो जो पैसे घेऊन मेडिकल कॉलेजमध्ये मुलांचे ॲडमिशन करुन देत असतो. त्यामुळे चांगली बुद्धिमत्ता असलेली मुले पैशाच्या जोरावर डॉक्टरकीसाठी पैसे मिळवतात. पुढे ही मुले पैसे चारुन पेपर चोरुन पास होतात. काही काळानंतर या अधिकाऱ्याच्या मुलाला भयंकर रोग होतो आणि त्यांना ऑपरेशन करायचे असते तो मुलाला घेऊन हॉस्पिटलमध्ये जातो तर तिथे त्याला पैसे घेऊन डॉक्टर झालेला मुलगा आढळतो. तो ज्या हॉस्पिटलमध्ये जातो तिथे सर्वत्र पैशाच्या जोरावर बनलेले डॉक्टर असतात. त्याला आणखी चूक उमगते पण आता वेळ निघून गेलेली असते.

का नाही आपण आपल्याला सुधारत ? हे सर्व तोपर्यंत थांबणार नाही जोपर्यंत त्या देशातील प्रत्येक नागरिक आपली सामाजिक जबाबदारी उचलणार नाही.

भ्रष्टाचाराचे वारे बंद कोण करेल का ?
भ्रष्टाचाराचा सूर्य तो नभातून सरेल का ?



# प्रजासत्ता की धर्मसत्ता

**कृष्णकांत श्रीकांत कदम**
तृतीय वर्ष, वाणिज्य

२६जानेवारी १९५० रोजी भारत प्रजासत्ताक झाला. ज्याला आपण गणतंत्र दिवस असेही म्हणतो. प्रजासत्ताक किंवा गणतंत्र या शब्दाचा अर्थ होतो प्रजेची सत्ता, या भारतात राहणाऱ्यांची सत्ता होय. २६ जानेवारी १९५० पूर्वी भारतात इंग्रजांची सत्ता होती. १५ ऑगस्ट १९४७ ला जरी भारताला स्वातंत्र्य मिळाले असे आपण म्हणतो तरी २६ जानेवारी १९५० पर्यंत भारताचे नाव ''ब्रिटीश डोमिनियन इंडिया'' म्हणजेच ''इंग्रज अधिपत्याखालील भारत'' असेच होते. २६ जानेवारी १९५० पर्यंत भारताचे राष्ट्रगीत " God save the king" हेच होते. २६ जानेवारी १९५० पर्यंत भारतात इंग्रजांनी भारताला स्वतंत्र राष्ट्र घोषित करताना निर्माण केलेला सामंजस्य करार ज्याला ''भारतीय स्वातंत्र्यता कायदा १९४७'' हाच लागू होता.

२६ जानेवारी १९५० पासून भारतात भारतीय संविधानुसार प्रजासत्ताक कारभार सुरु झाला. भारताचे नाव 'भारत' असे घोषित करण्यात झाले. २६ जानेवारी १९५० पर्यंत भारतात इंग्रजांची सत्ता होती असे जरी आपण म्हटलं तरी भारतीय जनमानसांवर आणखीन एक सत्ता हुकूम गाजवत होती ती म्हणजे धर्मसत्ता. धर्माच्या नियमांची सत्ता, स्वतःला धर्मप्रमुख म्हणवणाऱ्यांची सत्ता होती. अशी नियमावली जिला बहुसंख्येने असलेले हिंदू ''मनुस्मृती'' म्हणत तर अल्पसंख्य मुस्लिम ''हदीस'' म्हणत. ही सत्ता हजारो वर्षापासून सुरु होती. यात वर्णानुसार, जातीनुसार लोकांनी कार्य करावे. प्रत्येक वर्णाच्या लोकांनी त्यांचे नेमून दिलेले म्हणजेच उच्चवर्णीयांसाठी सेवेचे काम करावे. मनुस्मृतीनुसार 'ब्राम्हण' हा सगळयात उच्चस्थानी याने शिक्षण घ्यावे. पूजा कराव्यात याला कोणीही शिक्षा करु शकत नाही. यांच्याकडे वर मान करुन कोणही बघू veÙes Dieeoerj qpee ekeâel ÙeeÙe DeeF&s yeeÙeâes veme ÙeeWej KeeueskeeKeeue '#eef$eÙe' Ùeeves j epÙe keâej Yeej meeYeeUeJe,

ब्राम्हणाच्या नियमानुसार राज्य चालवावे. ब्राम्हण सोडून इतरांना शिक्षा द्याव्यात.

त्या खालोखाल येतो 'वैश्य' म्हणजेच व्यापारी समाज याने व्यापार करावा, आणि पैसा जमा करावा आणि तो धार्मिक कार्यासाठी ब्राह्मणांना द्यावा. आणि सगळयात शेवटी अगदी तळाला येतो शुद्र आणि अंति शुद्र यांनी या वरील तिन्ही समाजाची सेवा करावी. त्यांच्याकडे पाणी भरावे त्याची घाण उचलावी, यांच्यासाठी शेती करुन त्यांची पोटे भरावीत, ब्राह्मण म्हणतील त्या पूजा घालाव्यात, ब्राह्मण जेवण भरवावीत. अगदी जन्माला येण्याआधी गर्भसंस्कार, त्यानंतर नामकरण तो तरुण झाल्यावर सुरक्षा, पूजा, नंतर लग्न आणि मृत्यू आणि मृत्यूनंतर ही दरवर्षी श्राद्ध पूजा, प्रत्येक वेळेस ब्राह्मणाची गरज म्हणजेच ब्राह्मणांच्या पोटापाण्याची सोय, असा हा अगदी ''मनुस्मृती'' चा लिखित कायदा होता. म्हणजेच धर्माची सत्ता होती. अगदी २६ जानेवारी १९५० पर्यंत ती संपूर्ण भारतभर लागू होती. २६ जानेवारी १९५० नंतर भारताचे प्रत्येक भारतीय स्त्री आणि पुरुषाला स्वतः चे मत मांडण्याचा, व्यक्त करण्याचा अधिकार मिळाला त्यांना शिक्षणाचा अधिकार मिळावा प्रत्येकाला बरोबरीची संधी प्राप्त झाली. त्यांना देशाचे नियम बनविण्याचा अधिकार प्राप्त झाला. त्यासाठी निवडणूक प्रक्रिया सुरु झाली. त्यांना निवडणुकीच्या माध्यमातून स्वतः चा प्रतिनिधी संसदेत पाठविण्याचा अधिकार मिळाला. संसदेत त्यांना समान न्याय मिळवण्याचा अधिकार मिळाला. संविधानानुसार स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, विज्ञान आणि शिक्षणाचा अधिकार मिळाला.

''मनुस्मृती'' चे म्हणजेच धर्माचे नियम झुगारुन तो शिक्षण घेवू लागला. तो डॉक्टर झाला, इंजिनियर झाला. आय.ए.एस्. झाला, आय.पी.एस. झाला, वकील आणि न्यायाधीश झाला. तो खासदार आणि आमदार झाला. हे सर्व साध्य झालं फक्त संविधानामुळे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहिण्यासाठी केलेल्या मेहनतीमुळे त्यांच्या अथक प्रयत्नामुळे शक्य झाले.

* * *



# आजची स्त्री सुरक्षित आहे का ?

**सलोनी संजय नांदलस्कर**
प्रथम वर्ष, वाणिज्य

८ मार्च हा 'जागतिक महिला दिन' म्हणून साजरा केला जातो. ८ मार्च १९५७ साली न्यूयॉर्कच्या शिलाई कामगार असलेल्या महिलांनी कामातल्या शोषणाविरुद्ध आवाज उठवला आणि पहिल्यांदाच रस्त्यावर उतरुन स्वतःच्या हक्कासाठी संघटीत झाल्या आणि तेव्हापासून हा प्रेरणादायी दिवस 'जागतिक महिला दिन' म्हणून साजरा केला जातो.

गौतम बुद्धांनी स्त्री मुक्तीसाठी पहिले पाऊल उचलले. त्यानंतर ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीच्या शिक्षणासाठी व स्त्री मुक्तीसाठी आशेचे किरण दाखवले आणि पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजात स्त्रियांना समानतेने वागविले जात नाही, म्हणून त्यांना कायदेशीर हक्क व अधिकार मिळवून दिला.

पण या सगळयाने आजची स्त्री सुरक्षित आहे का ? हा प्रश्न मनात येतचं असतो. स्त्री एक मुलगी, बहीण, सून, आई, वहिनी, मैत्रिण, काकी, मावशी, आजी या भूमिका सहजरित्या पार पाडते. ती शिक्षित असो किंवा अशिक्षित पण ती संसारातले किंवा व्यवहारातले प्रश्न चुटकीनिशी सोडवते.आयुष्यभर पूर्ण घर सांभाळणारी गृहिणी, सगळयांसाठी रुचकर जेवण बनवणारी अन्नपूर्णा, शिक्षणाचे धडे शिकवणारी सरस्वती, चालायला बोलायला आणि संस्कार देणारी आई, सगळयांची काळजी घेणारी देवी, पतीला साथ देणारी अर्धांगिनी घरावरील आलेल्या संकटाला सामोरे जाणारी रक्षिका अशी ही स्त्री जी निस्वार्थ मनाने या भूमिका सहजरित्या पार पाडते.

आजची स्त्री म्हणजे सुंदर आवाज असणारी गानकोकिळा ''लता मंगेशकर'', पंतप्रधान ''इंदिरा गांधी'', IPS ऑफिसर ''किरण बेदी '' आणि अंतराळात पोचलेली ''कल्पना चावला'' यांनी दाखवून दिले आहे की, कोणत्याही क्षेत्रात स्त्रिया मागे नाहीत. तरीपण स्त्रियांना पाहिजे असलेले मान - सन्मान, प्रतिष्ठा त्यांना मिळत नाही. त्यांच्या वाटेला येतो तो फक्त अपमान, अपमान आणि अपमान....पूर्वी स्त्रीला वयात येण्याआधीच तिचा विवाह करण्यात यायचा, बाहुलीचा खेळ, मांडण्यासाठी आयुष्याचा खेळ मांडावा लागायचा, हुंडा न दिल्यामुळे सासरचे टोमणे ऐकावे लागायचे, तिला जिवंतपणीच मरणयातना भोगाव्या लागायच्या, आता जग जरी बदलले असले तरी पण या गोष्टी अजूनही थांबल्या नाहीत. कित्येक स्त्रिया या त्रासाला अजूनही बळी पडत आहेत.

एक संस्कृतमधले वचन आहे, "यंत्रनार्यस्तु पुज्यते, रमन्ते तंत्र देवता'' याचा अर्थ जिथे स्त्रियांचा आदर केला जातो आणि पूजले जाते तिथे देवाचे स्थान असते.पण या समाजात अजूनसुद्धा स्त्रियांना मान, आदर दिला जात नाही. मंदिरात जसे काळीमाता, दुर्गा, लक्ष्मी यांना पूजले जाते पण यांचे रुप घेऊन आलेली स्त्री फक्त विटंबना सहन करते, याला कारण कोण समाज की स्त्री ?

मुलगा वंशाचा दिवा आणि मुलगी परक्याचे धन का मानले जाते ? जिकडे मुलाला वंशाचा दिवा मानला जातो तिकडे मुलीला वंशाची पणती का नाही मानले जात? पुरुषप्रधान संस्कृतीचे प्रारंभ कुटुंबात आईपासून सुरु होते तरी आजही भ्रूणहत्या होत आहे, आईपासून आपले लेकरु हिसकावले जात आहे. पण हे दुःख या समाजाला कळणार नाही. कळेल ते फक्त शेतकऱ्याला कारण तोही आपले पीक लेकरासारखे वाढवतो आणि एक वैराचा दिवस येतो मुसळधार पावसाच्या वादळामुळे त्याचे पीक उध्वस्त करुन जातो.

आजची स्त्री ही शिक्षणाच्या प्रभावाने धीट झाली, चार भिंती ओलांडून घराबाहेर पडली, पण ती सुरक्षित आहे का ? आजच्या युगात स्त्री ही पुरुषसमान मानली जाते, पण तिला तोच आदर आणि मान मिळतो का ? आजही काही महिला बऱ्याच अनिष्ट प्रथा, रुढी आणि परंपरांमध्ये गुरफटत आहेत. आज स्त्रीची दशा अशी आहे मग पुढे त्यांची दिशा काय असेल.....

* * *



# महिला स्वातंत्र्य

**निलम सुरेश सावंत**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

भारताला स्वातंत्र्य प्राप्ती होऊन ६६ वर्षे पूर्ण झाली तथापि स्वातंत्र्याच्या लाभापासून भारतीय समाजातील महिला हा मोठा घटक आजही वंचित आहे. लोकसंख्येतील जवळपास निम्न घटक असणाऱ्या स्त्रियांना त्यांचे हक्क नाकारण्यात आले. भारतीय समाजातील स्त्रिला प्राचीन काळापासून दुय्यम स्थान देण्यात आले. वास्तविक स्त्री व पुरुष ही एकाच समाजरथाची दोन चाके आहेत. सुदृढ, निरोगी समाज निर्मितीसाठी स्त्री - पुरुष प्रमाणाचा समतोल नैसर्गिकरित्या राखणे आवश्यक आहे.

आज शासनाने स्त्रियांसाठी विविध धोरणे अस्तित्त्वात आणली असली तरी ती फार मोठ्या प्रमाणात स्त्रियांचे प्रश्न सोडविले गेले नाहीत.उलट पक्षी स्त्रियांवर अत्याचार, विकार यांचे नवनवे अविष्कार समोर येत आहेत. स्त्रियांचे मानवी हक्क जोपासले ही गोष्ट समाजाने मनापासून स्विकारणे आवश्यक आहे. कारण महिलांवरील अत्याचारात देशात महाराष्ट्र राज्याचा क्रमांक ४ था असल्याचे मानवी विकास अहवालात नमूद करण्यात आले आहे. दर दहा लाख लोकसंख्येमागे राजस्थानात २०८, मध्यप्रदेश २०६, दिल्ली मध्ये १९७, व महाराष्ट्रात १७६ गुन्हे नोंद केले आहेत. तसेच देशातील ३७ टक्के महिला घरगुती हिंसाचाराला बळी पडतात. तेव्हा महिलांवरील अत्याचाराचा अभ्यास करणे, त्या मागील कारणे शोधणे तसेच संबंधित घटकाचा अभ्यास करणे, ही प्रस्तुत शोधनिबंधामागील प्रेरणा आहे.

महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्याचा परिणाम म्हणजे हाच प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी आपले स्थान यथोचित निर्माण केले. म्हणजे एकीकडे विकास आणि दुसरीकडे भावनिक, मानसिक महत्त्वाचा म्हणजे शारिरीक अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे. महिलांचे अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी २००५ मध्ये कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण हा कायदा करण्यात आला. महिलांवर होणारे घरगुती जुलूम हे जवळपास प्रत्येक कुटूंबात होतात. यामागील कारण म्हणजे पुरुषप्रधान संस्कृती, बेकारी, दारिद्र्य, सततची वाढती महागाई, आत्मकेंद्रिय प्रवृत्ती यामुळे पुरुषांचा जाच स्त्रियांना सहन करावा लागतो. परिणामी सर्वात सुरक्षित कुटुंब या जागेतच ती असुरक्षित बनली. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारापासून सुटका होण्यासाठी घटस्फोट मागू शकते किंवा फौजदारी कायद्याखाली तिला कारवाई करता येते, परंतु हे सर्व करण्यासाठी तिला याची जाण, कायदेशीर माहिती असणे आवश्यक असते.

१९ व्या शतकामध्ये राजा राममोहन रॉय या थोर समाजसुधारकाने पहिल्यांदा व्यापक प्रमाणात महिलांच्या समस्येकडे व अडचणीकडे सरकारचे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला. प्रामुख्याने सतीप्रथा, बालहत्या, बालविवाह, केशवपन इत्यादी वाईट चालीरिती विरुद्ध सातत्याने समाजप्रबोधन केले. वाईट प्रथा कायद्याने बंद करण्यासाठी ब्रिटिश सरकारकडे वारंवार पाठपुरावा केला.राजा राममोहन रॉय यांच्याच पाठपुराव्यामुळे तत्कालिन ब्रिटीश गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेटिंग यांनी इ.स १८२९ मध्ये ऐतिहासिक सतीप्रथा बंदीचा कायदा केला. त्याचबरोबर बालहत्या व बालविवाह रोखण्यासाठी कठोर अशा प्रकारचे कायदे आणले. १९ व्या शतकामध्येच एक महान समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांनी महाराष्ट्रामध्ये स्त्रियांना सबल बनविण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले. स्त्रियांच्या व दलितांच्या दयनीय परिस्थितीतीबद्दल महात्मा फुल्यांनी अज्ञान, अशिक्षितपणा हे कारण असल्याचे स्पष्ट केले. महात्मा फुल्यांनी स्पष्टपणे सांगितले की, महिलांच्या व दलितांच्या या वाईट परिस्थितीबद्दल त्यांचे अज्ञान आणि

अशिक्षितपणा हेच मुख्य कारण आहे. त्यामुळेच त्यांनी महिलांच्या शिक्षणाची सुरूवात सावित्रीबाई फुले या आपल्या पत्नी पासून केली. सावित्रीबाई फुले या आपल्या पत्नीला पहिल्यांदा त्यांनी सुशिक्षित बनविले व नंतर त्यांच्याकडे मुलींना शिक्षण देण्याची जबाबदारी दिली. इ.स. १८४८ मध्ये पुण्यामध्ये मुलींची पहिली शाळा सुरु करण्यात आली. महाराष्ट्रामध्ये अशाप्रकारे मुलींच्या शिक्षणास सुरुवात झाली. आज जवळ जवळ सर्वच क्षेत्रामध्ये महिला सक्रीयपणे कार्यरत आहे. त्यांचे बऱ्याच अंशी श्रेय फुले दांपत्यांना जाते.

''लेकीचा ग जलम भाड्याचा बईल कधी इसावा
हुईल देवा ठावं',
लेकीचा ग जलम देव देऊनी चुकला बैल घान्याला
जुंपला जलमभरी''

या ओळीतून भारतीय स्त्रीची विशेषतः ग्रामीण स्त्रीची किती दुरावस्था झाली आहे, हे स्पष्ट होते. स्त्रीवर होणाऱ्या या सर्व अत्याचाराचे तिच्या दुःस्थितीचे कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव संपूर्ण मानवजातीच्या विकासासाठी मुलींच्या शिक्षणाइतके परिणामकारक दुसरे साधन नाही. एका मुलीला शिकवणे म्हणजे कुटुंबाला शिकवल्यासारखे आहे. स्त्रियांपुढे गंभीर समस्या आहेत, पण शिक्षण या जादुच्या कांडीने सोडविली जाणार नाही. ''आई, बाबा मला मारु नका. मला जगायचयं. मी तुमचीच मुलगी आहे. असे दूर का लोटता ?'' हे हृदयाला पाझर फोडणारे उद्‌गार आहेत. आपण २१ व्या शतकात पदार्पण केले. विज्ञान तंत्रज्ञानासारख्या उच्च क्षेत्रात प्रगती केली. पण आजही आपले विचार नीच दर्जाचे आहेत. मुलगा न झाल्यास आई वडील शोक करताना दिसतात. ज्याच्या पदरी पाप त्याला मुली आपोआप हिच भावना लोकांच्या मनात आहे. म्हणूनच स्त्रीभ्रूण हत्या मोठ्या प्रमाणात होत आहे. स्त्री ही त्याग, नम्रता, श्रद्धा व सुजाणपणा याची मूर्ती आहे. ती कोणत्याच बाबतीत पुरुषांपेक्षा कमी नाही. पारंपरिकरित्या पुरुषांची समजली जाणारी क्षेत्रे आता महिला काबीज करीत आहेत. झाशीची राणी लक्ष्मीबाई, ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी यांच्या पावलावर पाऊल ठेवून किरण बेदी, मीरा बोरवणकर, अंजू जॉर्ज, सानिया मिर्झा आपापल्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवत आहेत. भारतात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण, प्रतिष्ठा फक्त वीर पत्नी अथवा वीर माता होण्यात नाही. तर वीर स्त्री होण्यास आहे. हे पाहिले तर या जगाची रथाची दोन चाके म्हणजे स्त्री आणि पुरुष. हा रथ व्यवस्थित चालवायचा असेल, तर दोन्ही चाके सारख्याच गतीने चालण्यासाठी स्त्रीरुपी चालक सक्षम बनविणे अत्यावश्यक आहे. स्त्री स्वतःचे रक्षण करण्यास समर्थ असली पाहिजे.

* * *




द्वितीय सत्र प्रशिक्षण प्रमाणपत्र स्विकारताना प्रा. बी. ए. कश्यप.




'स्वच्छता हिच सेवा' या विषयावर मार्गदर्शन करताना कार्यक्रम अधिकारी प्रा. विकास पाटील.



# आजची स्त्री खरचं स्वतंत्र आहे का ?

**राखी विजय लांजेकर**
तृतीय वर्ष, वाणिज्य

आजच्या युगामध्ये स्त्री ही पुरुषाएवढीच आघाडीवर असलेली आपल्याला पहावयास मिळते. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात ती पुरुषांच्या बरोबरीने काम करताना प्रगती पथावर आहे. अर्थार्जनामध्येही ती पुरुषाएवढीच काही ठिकाणी त्यापेक्षाही जास्त करताना दिसते. साहजिकच पूर्वीपेक्षा आताच्या युगात स्त्रीला समाजात मोठे स्थान प्राप्त झाले आहे. ते तिने स्वतःच्या कर्तृत्वाने, कष्टाने, बुद्धिमत्तेने मिळविलेले आहे. यात शंकाच नाही. एकूण सर्व बाबतीत स्त्रिया ह्या पुरुषांच्या बरोबरीने आघाडीवर आहेत हे जरी खरे असले तरी या सर्व गोष्टी काही ठराविक वर्गापुरत्या मर्यादित आहेत. काही ठराविक स्त्रियांच्या बाबतीत खऱ्या आहेत. स्त्री सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहे असे म्हटले तरीही तिच्यावर अन्याय होताना आजही दिसून येतोच आहे. आजही वर्तमानपत्र उघडले की जास्तीत जास्त स्त्रीयांबाबत अन्यायाच्या बातम्या जास्त असतात. नवविवाहितेच्या आत्महत्या, सुनेचा छळ करुन मारले, अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन तिची निर्घूण हत्या अश्या बातम्याच जास्त असतात.

सुरक्षित वर्गातही पहिली पत्नी सुगरण, सुस्वभावी, समजूतदार असली तरीही तिला मुलींच झाल्या तर तो दोष तिचाच समजून पतीचा दुसरा विवाह लावला जातो. मुलगा व मुलगी हे स्त्रीच्या हातात नसते हे न कळण्या इतपत समाज मागासलेला तर आता नाही ना ? तरीपण या ठिकाणी काही गुन्हा नसताना स्त्रीला अन्याय सहन करावा लागतो. साधारणपणे लग्नाला ५-६ वर्षे झाली न झाली घरात पाळणा हलण्याची चिन्ह दिसली नाहीत की योगी बाबा, डॉक्टर तपासण्या चालू होतात. त्यात प्रथम स्त्रीयांच्याच केल्या जातात. मूल जन्माला येण्यासाठी दोघेही तेवढेच जबाबदार असतात. पण स्त्रीला प्रथम दोष लावण्यात येतो का ? तिच्यात काही दोष नाही असे समजल्यास कसातरी तयार होऊन पुरुष डॉक्टरकडे जायला तयार होतो. या चाचण्यात स्त्रीच्यात दोष आढळला तर एक तरी स्त्री त्याच्यापासून घटस्फोट घेऊन दुसरे लग्न केल्याचे आपल्याला आढळते का ?

ऐन तारुण्यात पतीच्या अपघाती निधनाने विधवा झालेल्या मुली आपण पाहतो. मूलबाळ नसेल तर ठीक किमान दुसऱ्या विवाहाचा विचार तरी केला जातो पण जरी पदरी लहान एक दोन मुले असतील तर तिला आपले उभे आयुष्य एकटीने काढावे लागते तरी ती त्या कच्च्या बच्च्यांना सांभाळत त्याचे सगळे करते. मुलांना व्यवस्थित वाढवून त्यांचे शिक्षण वैगरे करुन त्यांना मोठ्या हुद्यावर बसविलेल्या मातांची अनेक उदाहरणे आपण पाहतो पण हेच जर एखाद्या पुरुषाच्याबाबतीत त्याची पत्नी अचानक सोडून गेली तर एका वर्षाच्या आतच त्याच्या दुसऱ्या लग्नाची बोलणी सुरु केली जाते. मुलांना कोण सांभाळणार, घरातले कोण करणार, स्वतःची गरज भागवण्यासाठी दुसरे लग्न करतो, त्यामध्ये त्याचा स्वार्थच असतो सगळा. खरे तर स्त्री आपल्या पतीच्या प्रेमाखातर त्याच्या आठवणींवर सगळे आयुष्य काढण्यास तयार होते.त्यांच्या मुलांना मोठे करते स्वतःचा विचारही ती कधी करत नाही पण पुरुषांचे तसे नसते.

आपला समाजही त्यास तेवढाच जबाबदार आहे. एखाद्याची पहिली पत्नी तरुण वयात गेली की, लगेच त्याला वर्षाच्या आत लग्नासाठी प्रस्ताव येतात. मुलांना सांभाळायला, घरात लक्ष्मी हवी, ऐक्य किती दिवस राहणार, पण असा प्रस्ताव तरुण विधवेकडे क्वचितच अपवादाने पहायला मिळतो. नाहीतर तिलाच तूच पांढऱ्या पायाची

म्हणून नवऱ्याला घालवून बसली असा आरोप तिच्यावरच करण्यात येतो. स्त्री ही लग्न करुन तुमच्या घरी आपले माहेर, बहीण - भाऊ, आई -वडील यांना सोडून येते. तुमच्या घरची जबाबदारी उचलते. तुमच्या मुलांना जन्म देते. त्यांना मोठे करते वेळ प्रसंगी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते. एकटा पुरुष किंवा स्त्री ही फारसा पराक्रम नाही गाजवू शकत दोघांनाही एकमेकांची साथ सारखीच हवी असते. संसाररुपी रथ एका चाकाच्या सहाय्याने चालवता येत नाही. तरी सुद्धा कायम स्त्रीवरच अन्याय का ? आपला समाज किती बदलला तरी स्त्रीवर होणारे अन्याय कधी संपणारच नाहीत का ? पेपरमध्ये रोज नवविवाहितेच्या आत्महत्या, सुनेचा छळ करून मारले, अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन तिची निर्घूण हत्या अशा बातम्या येणे कधी थांबले का ?

या स्त्रीवरील अन्यायाला जबाबदार कोण ? तिला कधी न्याय मिळेल की नाही ? याला उत्तर सापडेल की नाही ? असे अनेक प्रश्न आपल्या आधुनिक समाजातही अनुत्तरीतच राहत आहेत. सर्व क्षेत्रात सतत पुढे जाण्यासाठी धावणारा आपला समाज स्त्रियांच्या बाबतीत मागे का जातो ? हीच आज आपल्या समाजाची मोठी खंत आहे. कोणीतरी येईल, ही परिस्थिती बदलेल या आशेवर कधीपर्यंत राहणार आपण ? यासाठी जास्त काही करण्याची पण गरज नाही. आपण प्रत्येकाने आपल्या आजूबाजूला असणाऱ्या स्त्रियांबद्दल मनात आदर ठेवून त्यांना मानाची वागणूक दिली तरी खूप फरक पडू शकेल. आपली आई, बहीण, बायको, मुलगी यांना माणूस मानून त्यांच्यात भेदभाव न करता वागले तरी खूप काही घडेल. कारण परिवर्तन नेहमी आपल्यापासून सुरु केले तर त्याचा फायदा जास्त होतो.

* * *




**रांगोळी स्पर्धेतील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी काढलेली प्रबोधनात्मक रांगोळी.**

**मुंबई विद्यापीठाची विद्यावाहिनी मोबाईल व्हॅन कॉलेजच्या परिसरात.**





# डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक अष्टपैलू व्यक्तीमत्त्व

**दिनेश गोपाळ घवाळी**
तृतीय वर्ष, कला

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महू मध्य प्रदेश येथे झाला. त्यांचे वडील रामजी हे लष्कराच्या सेवेत होते, त्यांच्या आईचे नाव भीमाबाई. प्राचीन भारतातील व्यापार या विषयात एम.ए.ही पदवी त्यांनी प्राप्त केली. ''भारताच्या राष्ट्रीय नफ्याचा वाटा एक ऐतिहासिक पृथःक्करणात्मक परिशीलन'' या प्रबंधाबद्दल कोलंबिया विद्यापीठाने त्यांना पीएच.डी पदवी बहाल केली. रुपयाचा प्रश्न या विषयावर लंडन विद्यापीठाने डी.एस्सी. ही अर्थशास्त्रातील पदवी त्यांना प्रदान केली. डॉ. आंबेडकर १९२३ मध्ये बॅरिस्टरची परीक्षा पास झाले.



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील गरीब, दलित, पीडित महिला कामगार यांना अधिकार मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले. त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. हे अव्दितीय आणि क्रांतीकारक कार्य करणाऱ्या या महामानवाच्या देशात आपला जन्म झाला, ही सर्वांसाठी अभिमानाची बाब ठरते. बाबासाहेब हे एक लोकोत्तर नेते आणि प्रकाडपंडित होते. या देशाने सर्वांगीण प्रगती करावी, विकास करावा आणि त्याची फळे तळागाळांतील सर्व घटकांना मिळावीत. यासाठी ते अखेरच्या श्वासापर्यंत झटले. या घटकांना आत्मसन्मान आणि आत्मभान त्यांनी मिळवून दिला. नव्या आत्मविश्वासाने हे घटक आज सर्व क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने तळपत आहे. शतकानुशतके झालेल्या अन्याय अत्याचाराचे रडगाणे न गाता हे समाजघटक देशउभारणी आणि देशाच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलत आहेत. या देशाला जगातील शक्तिमान आणि संपन्न राष्ट्र बनवायचे असेल तर त्यासाठी समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळाली तरच ते शक्य होईल ही बाब द्रष्ट्या बाबासाहेबांनी सर्वात आधी ओळखली होती. त्यामुळेच त्यांनी आपली सर्व विद्वत्ता भारतीय घटना तयार करताना पणास लावली आणि जगातील सर्वश्रेष्ठ अशा घटनेचा जन्म झाला. भारतातील घटनेने न्याय, बंधुता, समानता या तत्त्वांना अंगीकारत सर्व घटकांच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा करुन दिला. बाबासाहेबांच्या सर्व समावेशक विचारांचे पावित्र्य राखत. आपल्या सरकारने मागील साडेतीन वर्षात वंचित घटकांसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली आहे. यामध्ये मुलामुलींच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, राहण्यासाठी वसतिगृह देशातील आणि परदेशातील उत्कृष्ठ शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना सहाय्य, रोजगार आणि स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी साहाय्य, रमाई घरकूल योजना, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. व्यसनमुक्तीसाठी अत्यंत प्रभावीरित्या आम्ही काम करत आहोत. व्यसनमुक्तीसाठी साहित्य संमेलनासारखी अभिनव संकल्पना संबंध देशात पहिल्यांदाच राबवली जात आहे. बाबासाहेबांच्या वास्तव्याने पुनीत झालेली लंडन येथील वास्तू आम्ही विकत घेतली असून त्या ठिकाणी बाबासाहेबांचे चिरस्फूर्ती देणारे स्मारक उभारणार आहोत. इंदू मिल येथे बाबासाहेब आंतरराष्ट्रीय

दर्जाच्या भव्य स्मारकाचे काम सुरु झाले आहे. डॉ. आंबेडकर हे काही मूळचे श्रीमंत नव्हते. गरीबीतच वाढले आणि त्यांना या गरिबीची पूर्ण आठवण आहे. पण धन्य त्या त्यांच्या परमपूज्य पित्यांची की ज्यांनी गरिबीतच आपला संसार थाटून भीमरावांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले. लाथ मारीन तिथं पाणी काढीन असा बाणा असल्यावर या जगात अशक्य ते काय आहे ?

डॉ. बाबासाहेब सुद्धा गरिबीच्या श्रमाचं चीज करण्यासाठी मोठ्या जिगरीने व मन लावून अभ्यास करीत असत. त्यांनी अभ्यास करायचा झाला म्हणजे किती गोष्टींशी झुंज द्यावी लागत असे. हे पुढील उदाहरणांवरुन दिसून येईलच. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा पाया हा मूलतः आर्थिक परिवर्तनावर तयार झाला होता. जगद्‌विख्यात लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेतून त्यांनी शिक्षण घेतले. सामाजिक परिवर्तनासोबत आर्थिक परिवर्तनांसाठी अनेक सिद्धांत देशासमोर मांडून त्यांची अंमलबजावणी केली. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार उपेक्षितांवर होत असलेला अन्याय, अत्याचार आणि नशिबी आलेले दारिद्र्य यावर मात करण्याचा त्यांचा दृढनिश्चय होता. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.' या विचारसरणीवर त्यांनी नवी लोकजागृती घडवून आणली. परिवर्तनाची लढाई जिंकण्यासाठी शास्त्रज्ञांची नव्हे तर लेखणी आणि ग्रंथाची आवश्यकता आहे असे ठासून सांगितले.



**मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित हस्ताक्षर म्हणी लेखन स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल यांच्या हस्ते स्विकारताना कु. यशश्री शेट्ये.**

**उद्‌बोधन वर्गात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल.**





# राष्ट्रीय सेवा योजना : एक संस्कारक्षम उपक्रम

**अश्विनी मोतिराम माने**
तृतीय वर्ष, वाणिज्य

युवा शक्तीचा प्रत्येक राष्ट्राच्या जडणघडणीत सिंहाचा वाटा असतो. अशा या युवा शक्तीला समाजकार्यात, समाज विकासात कसे गुंतवता येऊ शकेल अशी विचारधारा भारतीय स्वातंत्र्यानंतर सुरू झाली. या विचारधारेतूनच तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, अर्थमंत्री डॉ. चिंतामणराव देशमुख, शिक्षण सचिव सैयदिन व शिक्षण आयोगाच्या प्रयत्नाने युवा शक्तीच्या समाजकार्य सहभागासाठी आवश्यक असणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेचा जन्म झाला.

'राष्ट्रीय सेवा योजना' हा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सहशैक्षणिक उपक्रम आहे. या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना सर्वप्रथम या योजनेअंतर्गत कार्य कसे करावे याचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणात या योजनेच्या स्वयंसेवकांची भूमिका, त्यांचे कार्य, योजनेची कार्यपद्धती, शिस्त, नियोजन व कार्याच्या नोंदी या गोष्टींवर जास्त भर असतो. या योजनेच्या माध्यमातून त्याला सामाजिक जाणीव कशी होईल, त्याचा स्वतःचा बौद्धिक विकास कसा होईल, त्याच्यामध्ये श्रमसंस्काराची जाणीव कशी निर्माण होईल त्यांच्यामध्ये नेतृत्वगुण कसे विकसित होतील याचा जास्त प्रमाणात विचार केला जातो.

या योजनेचे ब्रीदवाक्य 'Not Me But You' हे आहे. तर या योजनेचा उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्काराची जाणीव निर्माण करणे, निरक्षरतेचे उच्चाटण करणे, अंधश्रद्धा निर्मूलन करणे, लोक शिक्षणावर भर देणे, पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न करणे, आपत्कालीन व्यवस्थापन कार्यात मदत करणे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास करणे व विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे असा विविधांगी आहे.

या योजनेच्या माध्यमातून जे वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम राबविले जातात त्या उपक्रमामध्ये ग्रामीण विकास उपक्रम, आरोग्यविषयक उपक्रम, पर्यावरण संवर्धन विषयक उपक्रम, बंधारे बांधणी उपक्रम, आपत्ती व्यवस्थापन विषयक उपक्रम, दत्तक गाव योजना उपक्रम, राष्ट्रीय सद्भावना उपक्रम या उपक्रमांचा समावेश आहे.

वरील उपक्रम राबविण्यासाठी सर्व प्रथम महाविद्यालय गावाची निवड करतात. निवडलेल्या गावात कार्य करतात. सर्वप्रथम या गावचे सर्वेक्षण केले जाते. या सर्वेक्षणात गावांच्या समस्या, कामाच्या गरजांचा विचार करुन त्या गावांसाठी वर्षभरासाठी कार्य केले जाते. या कार्यासाठी निवडलेले गाव, या गावाचे प्रमुख गावातील सेवाभावी संस्था, महाविद्यालय, स्वयंसेवक विद्यार्थी यांच्यामध्ये नियोजनबद्ध समन्वय असतो. समन्वयातूनच गावासाठी कार्य केले जाते.

या योजनेचा निवासी शिबिर कार्याचा भाग स्वयंसेवक विद्यार्थ्यांसाठी आनंदाची पर्वणी असते ! निवासी शिबिर सात दिवसांचे असते या सात दिवसात त्यांना निवडलेल्या गावात रहावे लागते. त्या गावाच्या कामाचे स्वरूप समजून घ्यावे लागते. अनुरुप श्रमदानाची कामे करावी लागतात. श्रमदानाव्यतिरिक्त या शिबिरात बौद्धिक सत्र असतात. या दोन महत्त्वाच्या कार्यातून स्वयंसेवक

खऱ्या अर्थाने स्वतःला समजू शकतो.

शिबिरासाठी एकूण संख्येतून अनुरुप विद्यार्थ्यांचे गट पाडले जातात. गट प्रमुख निवडले जातात. गटांवर कामाच्या जबाबदाऱ्या सोपविल्या जातात व गट सांघिक भावनेने सात दिवस कार्य करतात. शिस्त, प्रार्थना, श्रमसंस्कार , दैनंदिन कार्य नोंदी, व्यवस्थापन, संभाषण धाडस, आपलेपणा, मित्र परिवार, आदर, सांस्कृतिक जोपासना, मनोरंजन या सर्व व्यक्तिमत्व विकासाच्या जडणघडणी या शिबिरात घडतात व एक आदर्श स्वयंसेवक या शिबिरात घडतात व या शिबिरातून बाहेर पडतात.

ही योजना महाविद्यालयीन युवा वर्गासाठी एक सुवर्णसंधी असून या योजनेचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे.



**वक्तृत्व स्पर्धेत बोलताना स्वयंसेवक.**



**मंदिर परिसरात साफसफाई करताना स्वयंसेवक.**



# मैत्री

**अश्विनी शांताराम पवार**
तृतीय वर्ष, वाणिज्य

हृदयाच्या रम्य मंदिरात प्रीतीच्या कोमल वेलीवर भावनेच्या जलाने सदैव फुलणारे पुष्प म्हणजे मैत्री होय. त्यागाचा, बंधनाचा, स्नेहाचा, कौतुकाचा, कर्तृत्त्वाचा, रक्षणाचा शब्द म्हणजे मैत्री.

तसं पाहिलं तर मैत्री ही सहवासावर अवलंबून नसते. कधी कधी काही क्षणाच्या सहवासात गाढ मैत्री होते तर कधी कधी वर्षानुवर्षे सहवास घडूनही मैत्रीचे धागे गुंफले जात नाहीत. मैत्री ही काही दिखावू गोष्ट नाही. आजच्या घड्याळाच्या काट्यांबरोबर चालणाऱ्या विज्ञान युगात मनामनाची कवाडे बंद झाली आहेत.

मित्रांनो, जेव्हा कोणी आपल्याला दुखावतं,
दुःख देतं, तेव्हा त्या गोष्टी अशा वाळूतच
लिहाव्यात म्हणजे काळाच्या ओघात समतेचं
वारे वाहून त्या पुसून जातील,
पण जेव्हा कोणी आपल्याला मदत करते
आपल्यासाठी चांगलं पुसतं

तेव्हा आपण ते दगडावरच्या रेषेससारखं असं पक्क कोरुन ठेवावं की,

कुठल्याही वाऱ्यान कधीही ते पुसलं जावू नये. खऱ्या मित्रांच्या हृदयाच्या तारा या विणेसारख्या असतात. आपण आपले चांगले कार्य केल्यावर त्यातून गौरवोद्‌ाराचे सूर निघतील पण कुकर्म केल्यावर त्यातून नाराजीचा गंभीर सूर निघाल्याशिवाय राहणार नाही.

कधी कधी वाटतं कुणीतरी असावं
ज्याच्याजवळ बसून सुख दुःख विसरावं

आणि मग आपल्या आयुष्यातील ती रिकामी जागा सच्चा मित्र किंवा मैत्रिणच भरुन काढते. या सगळयाचा अर्थ एकच, जीवनाच्या अव्याहत प्रवासात सतत यशस्वी मार्गदर्शन करणारे दिपस्तंभ म्हणजे मैत्री. यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली म्हणजे मैत्री. मैत्री ही केवळ दोन मुलांची किंवा दोन मुलींचीच असते असे नाही तर मुलगा आणि मुलगी यांच्यातही निर्मळ मैत्री असू शकते. मूठभर माया आणि मूठभर माणुसकी मिळवण्यासाठी जोडलेली मित्रमंडळी आणि नातेवाईक ही खरी सुखाची ठेव. त्या सुखाला दुसऱ्या कोणत्याही व्यवहारात तोलता येत नाही. देणाऱ्याने देत जावे आणि घेणाऱ्याने घेत जावे. अशीच अवस्था होते.

वसंत ऋतूत फूलून येणारे अगणित चांदणे म्हणजे मैत्री. स्वच्छ चांदण्याच्या प्रकाशात रूपेरी वाळूला स्पर्शणाऱ्या समुद्राच्या लाटा म्हणजे मैत्री. हिरव्या वेलीवर फुललेला गुलाबी पुष्पगुच्छ म्हणजे मैत्री ! !

माणसाच्या तीन मुलभूत गरजा - अन्न, वस्त्र, निवारा याचबरोबर मैत्रीचाही ह्यात समावेश व्हावा असं मला वाटतं.

मैत्रीचा गुलाब हवा असेल तर त्यासाठी काट्याने घायाळ होण्याची तयारी हवी. काही गोष्टी तर अशा असतात की मैत्रीशिवाय करणं अशक्यच म्हणूनच मैत्री ज्याला मिळेल, त्याने ती प्राणापलिकडे सांभाळावी कारण -

मैत्रीचा दीप, अखंडपणे सांभाळ
कोण जाणे कधी होईल, आयुष्याची संध्याकाळ
नात्यातले अनेक अर्थ उलगडून सांगते ती मैत्री.
कधी रुसते, कधी हसते तरी,
हृदयात बसते ती मैत्री
सारी संकटं दूर सारुन,
आपलं हित जपते ती मैत्री
आणि आयुष्यातले नाजूक क्षण,
हळूवार जपते ती मैत्री
आणि आयुष्यातले नाजूक क्षण,
हळूवार जपते ती सुद्धा मैत्रीच ! ! !

* * *

# जीवनात यशस्वी होण्याचा मार्ग



**कांचनी विलास चव्हाण**
तृतीय वर्ष, वाणिज्य

वाचेल तो वाचेल ! शिकेल तो शिकेल ! या उक्तीप्रमाणे जीवनामध्ये यशाचे शिखर गाठण्यासाठी कठोर परिश्रमाबाहेर आपण जोपर्यंत जिवंत आहोत तोपर्यंत वाचनातून आणि शिक्षणातून शिक्षण घेऊन ते साध्य करता येते.

नव - नवीन क्षेत्रांचा अभ्यास करण्यामध्ये सहभागी व्हा. नवी क्षेत्रे नवे कौशल्य संपन्न करुन तुम्ही आपल्या देशाचे आपल्या गावाचे आणि वडीलधाऱ्यांचे नाव उज्ज्वल करा. आपल्या शाळा कॉलेजचे नाव अभिमानाने झळकवण्यासाठी प्रयत्न करा.

प्रत्येक विद्यार्थी - विद्यार्थीनिला वर मांडलेल्या इच्छा आकांक्षा असतात परंतु त्या पुरे करण्यासाठी लागणारे परिश्रम, शिक्षण आणि वाचन यांच्यापासून वंचित राहिल्या कारणाने तुम्हाला यश मिळत नाही. मी अनेकदा ऐकले आहे. '' आम्हाला काही येत नाही. कशामध्ये प्राविण्य मिळवावे. कोणते क्षेत्र निवडावे ? आम्हाला काही उमजत नाही ? कसं यशाचं शिखर गाठावं ? कशातून आपल्या शाळा कॉलेजचे आपल्या आई - वडिलांचे, गावाचे, देशाचे नाव उज्ज्वल करावे ?'' असे प्रश्न या विद्यार्थ्यांसमोर उभे राहतात.

मी अशा सर्व विद्यार्थ्यांना, तरुण - तरूणींना सांगू इच्छिते की, जन्माला आलेला प्रत्येक मनुष्यप्राणी हा कोणत्या ना कोणत्या मार्गाने समाजाची सेवा करण्याकरिता आलेला असतो. भगवंताने प्रत्येक मनुष्यामध्ये कोणते गुण दिलेले असतात ते कशामध्ये निपुण व हुशार आहोत. हे ओळखल्यानंतर शांत मनाने आणि जिद्दीने मनामध्ये एखादी ''संकल्पना'' निवडा.

त्या संकल्पनेला तुमचे जीवन बनवा त्यावर विचार करा. तिचेच स्वप्न पहा. ती संकल्पना जगा, त्या संकल्पनेत अंतर्बाह्य भारुन जा आणि इतर सगळया गोष्टी बाजूला ठेवा. हा यशाचा मार्ग या सुंदर व क्रियाशील विचाराने सुरु झालेला वाचनाचा प्रवास वाचकांना अनेक धक्के देत बदलत्या जगाचे वास्तव दर्शन घडवीत निघतो.

मी तरुण विद्यार्थ्यांना म्हणजेच या देशाच्या नवकालीन भावी पिढीला सांगू इच्छिते की, या बदलत्या जगाशी जुळवून घेण्याची तयारी आहे अशांसाठी विपूल संधी ही त्यांच्या प्रयत्नांतूनच निर्माण होते. तेव्हा प्रत्येकाने आपापले ध्येय, शिखर गाठण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करा. नवी 'मनोभूमिका तुम्हीच तुमच्या सामर्थ्याच्या बळाचा वापर करुन तयार करा. तुम्ही सर्जनशील आहात. तुम्ही जे शिकलात त्याचा प्रत्यक्षात वापर करा. या प्रकरणातून क्रियाशील व्यक्तिमत्वात दडून बसलेली अनेक कौशल्ये त्यांचा पुरेपूर उपयोग करून घेण्याच्या चांगल्या टिप्स अकस्मात करुन घ्या. ''स्वतः मधील प्रेरणा शक्तीला जागे करा.'' नक्कीच तुम्हाला तुमच्या जीवनाचे यशाचे शिखर काबीज करता येईल. फक्त मनामध्ये एक जिद्द एक संकल्पना ध्येय ध्यास ठेवावा. आणि आपली वाटचाल करावी असे मला वाटते.

''प्रयत्ने वाळूचे कण रगडता तेलही गळे''

****

**- विचारधन -**

**ध्येयाचा नंदादीप अखंड तेवत ठेवा, म्हणजे कर्तृत्त्वाचा प्रकाश पडेल.**

# वाढती लोकसंख्या



**सिद्धेश दयानंद मोरे**
**द्वितीय वर्ष, वाणिज्य**

आपल्या देशाला एका मोठ्या समस्येने ग्रासले आहे ती म्हणजे सतत वाढत जाणारी लोकसंख्या होय. हे एकविसाव्या शतकातील सगळयात बिकट आव्हान आहे, ते म्हणजे लोकसंख्येच्या विस्फोटाचे. भारताची लोकसंख्या अब्जांची मर्यादा ओलांडून पुढे गेली आहे. लोकसंख्या जर सध्याच्याच गतीने वाढत राहिली तर देशाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल. आज दारिद्र्य, बेकारी, मुलभूत गरजांची अपूर्णता, सुयोग्य जीवनपद्धतीचा अभाव या समस्या केवळ लोकसंख्यावाढीमुळे दिसून येतात.

आज भारताची लोकसंख्या १२५ कोटीच्यावर गेली आहे. भारत स्वतंत्र झाला तेव्हा भारताची लोकसंख्या ३३ कोटी होती. लोकसंख्येच्या मानाने विचार केला, तर जगात आपला क्रमांक दुसरा आहे. लोकसंख्यावाढ ही थांबवली पाहिजे, नाहीतर आपल्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल. बहुसंख्य विकसित देशामध्ये व भारतामध्ये जी समस्या निर्माण झाली आहे. ती म्हणजे अतिरिक्त लोकसंख्येची समस्या होय. जेव्हा एखाद्या देशात लोकांना जिवंत ठेवणारी साधनसामग्री धान्य औषध रोजगार व अन्य सुविधा कमी असतात पण त्या मानाने लोकसंख्या जास्त असते.

देशातील लोकसंख्येची वाढ किंवा घट जन्म मृत्यू या महत्त्वाच्या घटकांवर आधारलेली आहे. गरिबी, अंधश्रद्धा, श्रद्धा, पारंपारिक विचार, लैंगिक अज्ञान या कारणांमुळे भारतात जन्मदर वाढला. परंतु वैद्यकीय क्षेत्रामुळे मानवाच्या आयुर्मानामध्ये वाढ झाली. मृत्यूदर कमी झाला. भारतामध्ये जन्मदर वाढण्याचे प्रमाण जास्त आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या भेडसावत आहेत.

भारतात लोकसंख्या वाढीची कारणे अनेक आहेत. बालविवाह, विवाहप्रधान व्यवस्था, अपत्यनिर्मितीला स्थान, दारिद्र्य, कुटुंब नियोजनाचा अभाव, हवामान इत्यादी कारणे आहेत. भारतातील बहुसंख्य व्यक्तींच्या बाबतीत कुटुंब नियोजन नसते. संतती प्रतिबंधक उपाययोजना जोपर्यंत स्वयंस्फूर्तीने अमलात आणल्या जात नाहीत तोपर्यंत लोकसंख्या वाढत राहणे ही स्वभाविकच बाब आहे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राज्यस्थान या राज्यात बालविवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. परिणामी जन्माला येणाऱ्या बालकांची संख्या वाढण्याची शक्यता असते.

लोकसंख्या कमी करण्यासाठी विवाहाचे वय वाढविले पाहिजे. संतती प्रतिबंधक साधने व शिक्षणाचा प्रसार झाला तरच मानवाची प्रगती होईल. शिक्षणामुळे मानव मुलांच्या भविष्याचा विचार करतात व लोकसंख्या नियंत्रित करता येते. मानवामध्ये मतपरिवर्तन देशाचा विकास होऊ शकतो. मानवाच्या मुलभूत गरजा व अन्य सुविधा सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचू शकतात. सर्वच क्षेत्रामध्ये मानवाची प्रगती होईल.

प्रत्येक कुटुंबाने कुटुंब नियोजन कार्यक्रम राबवला पाहिजे. कुटुंब नियोजनाचे फायदे - तोटे समजून घेतले पाहिजे. आजच्या युगात वाढती लोकसंख्या ही एक मोठी भेडसावणारी समस्या आहे. या समस्येतून मार्ग काढून देशाला विकसित बनवायचे आहे. कुटुंब नियोजन हा कार्यक्रम सक्तीचा केला पाहिजे. 'हम दो, हमारे दो' असे नियोजन असले पाहिजे. आजही भारतामध्ये काही परंपरागत पद्धती चालू आहेत. काही जुनाट विचारांमुळे मानवाची प्रगती खुंटली आहे. प्रत्येक कुटुंबाने शासनाचे धोरण अवलंबले पाहिजे. तरच आपला देश खऱ्या अर्थाने प्रगती करेल. आज आपण विज्ञानाच्या क्षेत्रात, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्राविण्य मिळवले आहे. जेव्हा लोकसंख्या नियंत्रित करण्यात देशाला यश मिळेल तेव्हाच आपल्या देशाची खऱ्या अर्थाने प्रगती होईल व देश विकासाच्या मार्गाने पाऊल उचलेल.

* * *



# वाचन ही काळाची गरज

**सुविधा तुकाराम चव्हाण**
प्रथम वर्ष, वाणिज्य

'वाचाल तर वाचाल' असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे. मनुष्याच्या ठिकाणी असलेले ज्ञान ही त्याची फार मोठी शक्ती आहे. मागच्या पिढीपेक्षा आताच्या पिढीचे वाचन हे अगदी अल्प झाले आहे कारण वाचन ही गोष्ट सोडल्यास बाकीच्या मनोरंजनाच्या गोष्टी इतक्या विद्यार्थ्यांकडे आहेत की त्यांना वाचनासाठी पुरेसा वेळ मिळेनासा झाला आहे.



विद्यार्थ्यांनी केवळ उन्हाळी सुट्टीत खेळून आणि फिरुन वेळ फुकट घालवण्यापेक्षा विविध विषयांचे आवांतर वाचन केले पाहिजे कारण अवांतर वाचनामुळे मतपरिवर्तन होऊ शकते. आज जे मोठे उद्योगपती किंवा आपल्यासारखी सामान्य माणसे ही मोठ्या नोकरी वर आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे वाचन होय. हा बदल फक्त वाचनामुळेच दिसून येतो. त्यामुळे प्रत्येकाने प्रत्येक दिवशी किमान दोन तास वाचन केले पाहिजे. दिशाहीन झालेला समाज एकत्रित येऊ शकतो इतकी क्षमता वाचनामध्ये आहे. हे प्रत्येक विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवलं पाहिजे.

विद्यार्थ्यांना जीव लावणारे शब्द आयुष्य घडवतात तर जिव्हारी लागणारे शब्द विद्यार्थ्यांचे आयुष्य बिघडवतात. शब्द प्रेम देतात, प्रेरणा देतात, यश देतात, शब्द नाते देतात. शब्द आयुष्यात आयुष्यभर आणि आयुष्यानंतर मनामनात जपणारी भावना देतात. म्हणूनच शब्दाचं मोल जपलं की आपलं आयुष्यही अनमोल होतं. हे फक्त वाचनामुळेच शक्य होतं.

सध्या विद्यार्थ्यांचे वाचन आणि दिनक्रमांचा बारकाईने विचार केला तर सकाळी शाळा, कॉलेज आणि दुपारी खाजगी क्लासेस तर संध्याकाळी पुढ्यात पुस्तक उघडे ठेवून TV वरील कार्यक्रम पाहणे आणि त्यानंतर Whatsapp च्या व Facebook, Instagram आणि विविध सोशल साईटवर झोपेपर्यंत त्याच्या मैफलीत रंगणे. हा सध्याच्या विद्यार्थ्यांचा झोपेपर्यंतचा दिनक्रम झाला आहे. अशा चक्रातून विद्यार्थी भ्रमण करित असल्यामुळे विद्यार्थ्यांचे वाचनाकडे दुर्लक्ष होत चालले आहे.

आई-वडिलांनी त्याकडे लक्ष दिले पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या पुस्तकी ज्ञानाबरोबरच आवांतर वाचनाची आवड असणे आवश्यक आहे. विद्यार्थी आवांतर ज्ञानापेक्षा फक्त परीक्षेपुरताच पुस्तकी ज्ञानाकडे अधिक लक्ष देऊ लागला आहे. अभ्यासापुरते वाचन होऊ लागल्यामुळे विद्यार्थी ग्रंथालयाकडे पाठ फिरवू लागला आहे. याचा परिणाम असा होतो की त्यांना पूर्ण गुण मिळाले असले तरी ज्ञानाची पातळी उंचावली जात नाही. अशा अनेक कारणांमुळे 'वाचाल तर वाचाल' या युगात विद्यार्थी वाचतील अशी मोहिम शासनाला हाती घ्यावी लागणार आहे.

वाचनामुळे विद्यार्थ्यांना विद्यार्थी असलेल्या अस्तित्वाचे मोल किती अनमोल आहे. याची जाणीव जागृत होते. पावसाचा एक थेंब हातावर पडला तर त्याने हातही धुता येत नाही, पण तोच थेंब जर चिखलात पडला तर तो क्षणार्धात नाहीसा होतो. तोच थेंब जर कमळात पडला तर मोत्याप्रमाणे चमकतो त्याचप्रमाणे तरूण विद्यार्थ्यांचे आहे. तो विवेकी, ज्ञानी, कर्तृत्ववान तसेच आत्मविश्वासू बणण्यासाठी वाचन ही काळाची गरज आहे.

* * *



# भीमा कोरेगाव विजय स्तंभ : एक प्रेरणास्त्रोत

**प्रितेश हरिश्चंद्र कुळये**
तृतीय वर्ष, कला

पाच हजार वर्षांपूर्वी खैबरखिंडीतून ब्राम्हण भारतात आले. त्यावेळी मूळनिवासी नागवंशी बांधव या देशाचा राजा होता. गौरवशाली विरासन असलेल्या मूळनिवासी नागवंशी बांधवांमध्ये कटुनियतीने फूट पाडून आपसात गैरसमज पसरुन अनेक नागवंशी राजांना एकमेकांत लढाया लावून दोघानांही संपविले काही राजे या मार्गाने संपले नाहीत म्हणून त्या राजांना विषकन्येद्वारे मोहपाशात अडकवून घेरले आणि मारुन टाकले. काही राजे या दोन्ही मार्गाने वश झाले नाहीत म्हणून त्यांना ब्रम्हणांनी विषप्रयोग करुन त्यांची हत्या घडवून आणली. माझ्या मूळनिवासी नागवंशी बांधवांनो आपण पराभूत जरी असलो तरी आपली पराभूत मानसिकता नाही कारण आपण गुलाम आहोत हे आपल्याला माहिती तरी पाहिजे तर आपण स्वतंत्र कसे होणार? आपण गुलामीचे साखळदंड तोडण्यासाठी आपल्याला हातात तेवढेच बळ आहे. तितकी ताकद आहे याचा थांगपत्ता अजूनही आपल्यालाचं माहिती नाही. आपल्याला इतिहास घडविण्यासाठी आपल्या गौरवशाली आणि पराभूत इतिहासाची माहिती असली पाहिजे. ब्राम्हणांनी मूलनिवासी नागवंशी बांधवाना कपट कारस्थाने रचून इतिहासामध्ये शारिरिक आणि मानसिक गुलाम केले होते. त्याच ब्राम्हणाने मूलनिवासी नागवंशी बांधवाना स्वतंत्र भारतात अनेक आधुनिक कपट कारस्थाने रचून मानसिक गुलाम बनविले आहे.मनुस्मृतीने अनेक प्रकारचे हक्क अधिकार मूलनिवासी नागवंशी बांधवाना नाकारले आहे. ज्यामध्ये शिक्षण घेण्याचा अधिकार, शस्त्र धारण करण्याचा अधिकार, संपत्ती मिळविण्याचा अधिकार असे तीन प्रमुख अधिकार होते. याशिवाय अनेक मानवी हक्क अधिकारापासून मूलनिवासी नागवंशी बांधवांना ब्राम्हणांनी वंचित केले होते. शिवरायांचे महाप्रती पुत्र संभाजी महाराजांनी औरंगजेबाच्या माध्यमातून कैद घडवून आणली कातडी सोलली, कानात शिसे ओतले दोन्ही डोळे पात्रातून बाहेर काढले. अत्यंत क्रूरतेने शिरच्छेद केला त्यांचे पार्थिव सातारा जिल्ह्यातील वढू बुद्रुकच्या रानात पालथे पाडून तुकडे -तुकडे करुन टाकले. भाल्याच्या अग्रभागी संभाजी महाराजांचे शीर साऱ्या रानावनातून वाजतगाजत नेऊन घोर विटंबना केली. त्याच दिवशी ब्राम्हणांनी गुढ्या उभारुन साऱ्या महाराष्टात आनंद साजरा केला कारण रयतेच्या स्वराज्याची शिवशाही संपली. आणि ब्राम्हणांची पेशवाई आली हे वढू बुद्रुकच्या नागवंशी महाराजांना माहित झाले, जिथे संभाजी महाराज्यांच्या पार्थिवाचे तुकडे पडले होते ते वढुच्या ६० महारांनी गोळा केले महाप्रतापी संभाजी महाराजांचा अंत्यविधी केला.

या प्रकारचे कपट कारस्थान करुन ब्राम्हणांनी शिवाजी महाराजांची हत्या केली. संभाजी महाराजांची हत्या केली. आणि पेशवाईने दिलेल्या अन्यायकारक किळसवाणी गैरबराबरीच्या व्यवस्थेचा बदला घेण्यासाठी स्मृती जागविल्या. क्रूर इतिहास काळजात घट्ट रोवून ठेवला. बदला घेण्यासाठी नागवंशी सिध्दनाक नावाच्या महाराजाने रात्रंदिवस एक करुन आपल्या दोन्ही बाहुतील ऐक्य एकवटून तलवारीच्या बळावर सरदारापर्यंत मजल मारली. रात्रंदिवसाच्या मेहनतीने लढाईची तयारी जोमाने केली तसेच इकडे इंग्रजांना पेशव्याविरुद्ध यश मिळत नव्हते त्यातच नोव्हेंबर १९३७ रोजी पुण्याजवळील इंग्रज वकालतीवर पेशव्याने हल्ला करुन इंग्रजांविरोधात लढ्याला सुरुवात केली. जनरल स्मिथने नागवंशी महार सैन्याला घेऊन आपल्या परिने हल्ले परतवीत होता पण त्यांची शक्ती कमी होती. ५०० महार सैनिकांचे पायदल ३०० घोडेस्वार आणि तोफा चालवणारे २८ ब्रिटीश सैनिक होते ५ बटालियन ऑफिसर्स होते. तिकडे पेशव्याचे २५

हजार सैनिक होते. ५ हजार घोडेस्वार नदीकाठी त्यांचा समाचार घेण्यासाठी पुण्याकडे जाणारा रस्ता अडवून उभे होते.

काटक चिवट असलेले पेशव्यांकडून अपमानीत झालेले महार सैन्य 'न भुतो न भविष्यती' असे लढले की, सर्व जगाने तोंडात बोटे घातली. इंग्रज राजवटीच्या दृष्टीने लढाईतील या विजयाला अतिशय महत्त्व होते. यापुढे संपूर्ण भारतभर त्यांचा एकछत्री अमंल सुरु झाला. भिमा कोरेगावच्या लढाईत शहिद झालेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ त्यांना विजयस्तंभ उभा करावा लागला. १८२२ मध्ये इंग्रजानी ७५ फुट उंचीचा काळया दगडातील स्तंभ शहीद झालेल्या वीरांच्या स्मरणार्थ उभा केला. त्यावर शहिद सैनिकांची नावे कोरलेली आहेत. त्यासोबत इंग्रजी सैन्याला पूर्वेकडील देशात जे अनेक महत्त्वपूर्ण विजय मिळाले, त्यातील अतिशय अभिमानाने सांगण्यासारखा हा विजय आहे.

## वार्षिक स्नेहसंमेलनातील क्षणचित्रे







# महात्मा ज्योतिबा फुले यांचे समाजासाठी कार्य

**सर्वेश राजाराम धुळप**
तृतीय वर्ष, कला

महात्मा जोतीबा फुले यांचे पूर्ण नाव जोतीराव गोंविदराव फुले. त्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. जोतीबांच्या वडीलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. शेवटच्या पेशव्याच्या काळात महात्मा फुले यांचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत होते. त्यामुळे गोरे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले व तेच नाव पुढे रुढ झाले.



महात्मा फुले हे मराठी लेखक विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली. शेतकरी आणि बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेऊन पुरोगामी विचारांची मांडणी केली आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली. जनतेने त्यांना 'महात्मा' ही उपाधी बहाल केली होती. महात्मा फुलेंवर थॉमस पेन यांच्या 'The Right of Han' या पुस्तकाचा प्रभाव होता.

जोतीराव केवळ नऊ महिन्यांचे होते. तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांचा विवाह वयाच्या बाराव्या वर्षी सावित्रीबाई यांचेशी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. इ.स.१८४२ मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूल मध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बुद्धी अतिशय तल्लख, त्यामुळे पाच-सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला.

ऑगस्ट १८४८ मध्ये पुणे येथे बुधवार पेठेत भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरु केली. १७ सप्टेंबर १८५१ रोजी रास्ता पेठेतील मुलींची दुसरी शाळा सुरु केली. १५ मार्च १८५२ रोजी वेताळपेठेत भिडे यांच्या वाड्यात मुलींची तिसरी शाळा सुरु केली. १८५२ मध्ये दलितांना शिक्षण देण्यासाठी पहिली शाळा सुरु केली. १८५५ मध्ये रात्रीची शाळा सुरु केली. १८६३ मध्ये 'बालहत्या प्रतिबंधक गृहा'ची स्थापना आपल्याच घरी केली. १८६४ मध्ये पुण्यात एक पुनर्विवाह घडवून आणला. १८६८ मध्ये स्वतःच्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद अस्पृश्यांना खुला करुन परंपरागत रुढींना धक्का दिला.

शेतकऱ्यांचा आसूड या आपल्या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांचे विदारक चित्र रेखाटून शिक्षणाअभावी समाजाची स्थिती शब्दबद्ध केली.

विद्येविना मती गेली ;
मतीविना नीती गेली ;
नीतीविना गती गेली ;
गतीविना वित्त गेले ;
वित्ताविना शुद्र खचले ;
इतके अनर्थ एका अविद्येने केले.

यातच त्यांनी शिक्षण, वसतिगृह, सिंचन, धरणे, तलाव, विहीरी यासारखे उपाय सुचवले. सुधारणावादी विचारांचा प्रसार करण्यासाठी कृष्णराव भालेराव यांच्या

मदतीने पुण्यातून 'दीनबंधू' हे वृत्तपत्र १८७७ मध्ये सुरू केले.

महात्मा फुलेंनी आपल्या मित्रांच्या सहकार्याने अस्पृश्य लोकांना विद्या शिकवण्याकरिता मंडळ नावाची संस्था स्थापन केली.

२४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. १८८० मध्ये महात्मा फुले यांनी कामगाराच्या प्रश्नाची वाचा फोडण्यासाठी नारायण लोखंडे यांच्या माध्यमातून 'बॉम्बे मिल असोसिअशन' या संघटनेची स्थापना केली. इ.स. १८८८ मध्ये व्हिक्टोरिया राणीच्या चिरंजीवाच्या 'ड्यूक ऑफ कॅनॉट' कार्यक्रमात त्यांनी शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून पारंपरिक वेशात उपस्थित राहून शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे मांडले.

महात्मा फुले यांनी हंटर कमिशनपुढे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे. अशी आग्रही मागणी केली. यामुळेच जनतेने त्यांना १८८८ साली 'महात्मा' ही पदवी दिली.

मनुष्य हा जातीने श्रेष्ठ ठरतो कोणताही ग्रंथ ईश्वराने लिहिलेला नसून तो मनुष्यनिर्मीत आहे. आपला अंत नजीक आला हे जाणून त्यांनी १८८७ मध्ये आपले मृत्यूपत्र तयार केले. त्यात त्यांनी आपल्या दत्तकपुत्राने सत्यशोधक समाजाचे कार्य पुढे चालवावे असे नमुद केले. मृत्यूपूर्वी त्यांनी आपल्या पत्नीला बोलावून त्यांचा निरोप घेतला. व मुलास प्रार्थना म्हणण्यास सांगितले. स्त्री उद्धाराचे व बहुजन उद्धाराचे सुरु केलेले कार्य व्यापक घेण्यासाठी सत्यशोधक समाज नावाची चळवळ सुरु केली. धार्मीक गुलामगिरी नष्ट करणे हे या समाजाचे ध्येय होते. मानवतेचा महान संदेश देणारा हा झुंजार नेता दि. २८ नोव्हेंबर १८९० रोजी कालवश झाला.



**मुंबई विद्यापीठाची विद्यावाहिनी मोबाईल व्हॅन द्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.**

**प्रथम क्रमांक प्राप्त केलेली प्रबोधनात्मक रांगोळी.**





# राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे विचार आजही प्रेरणादायी

**अपेक्षा मधुकर कदम**
तृतीय वर्ष, वाणिज्य

"झाले बहू । आहेतही बहू ।। होती बहू । परंतु यासम हा ।।" असे वर्णन ज्यांचे करता येईल ते म्हणजे भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी. २ ऑक्टोबर १८६९ ला काठेवाडीमध्ये पोरबंदर येथे त्यांचा जन्म झाला. गांधीजींनी केवळ देशाच्या स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले नाही तर त्यांनी जगाला नैतिकतेचा मार्ग दाखवून दिला. जो आजही सर्वांना प्रेरणादायक आहे. त्यांच्या विचारांची मुळे भारताच्या प्राचीन विद्वत्तेमध्ये खोलवर रूजलेली होती. आणि आज २१ व्या शतकामध्येही आपल्या दैंनंदिन जगण्यातून त्याचा प्रभाव जाणवतो.



**महात्मा गांधीजींचे विचार -**

जगाच्या पाठीवर सर्वत्र, सर्व खंडामध्ये मानवतेचे प्रतीक म्हणून गांधीजींचा सन्मानपूर्वक उल्लेख केला जातो. त्यांच्या स्मृती जतन केल्या जातात. भारताचे मूर्तरूप म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

हिंसेमधील शक्तीपेक्षा अहिंसेतील ताकद ही केव्हाही अधिक असते. हा गांधीजींनी दिलेला सर्वात मोठा मंत्र, अहिंसा हे गांधीजींनी आपल्याला दिलेले सर्वात प्रभावी शस्त्र आहे.

महात्मा गांधीचा लढा गरिबातील गरीब व्यक्तीच्या सक्षमीकरणासाठी, अशिक्षितांना सुशिक्षित बनविण्यासाठीचा होता. राजकारण आणि राजकीय चळवळ किंवा स्वातंत्र्य लढा याच्या मर्यादित व्याख्या त्यांना अमान्य होत्या.

गांधीजी स्वदेशीचा उल्लेख अनोख्या ऊर्मीने करायचे. भारतीय सर्जनशीलता आणि समंजसपणा यांना प्रोत्साहन देण्यासाठीचे ते एक अभिमानास्पद माध्यम आहे असे त्यांचे म्हणणे होते.

बाहेरच्या जगात इतरत्र कोणकोणत्या विचार प्रवाहांचा प्रभाव आहे याचा ते सजगतेने अभ्यास करीत. हे विचार अधिक समृद्ध करण्यासाठी ते अशा विचारधारांचे स्वागतच करत.

आपल्या आर्थिक, आरोग्यविषयक, शैक्षणिक आणि सामाजिक आकांक्षाच्या पूर्ततेसाठी बाहेरच्या जगाशी संबंध प्रस्थापित करताना किंवा धोरणे ठरवताना त्यांचे स्वदेशी विचार आजही लागू ठरतात.

गांधीजींच्या व भारतीय परंपरेच्या विचारसरणीचा अवलंब करीतच आपण आरोग्यासाठी व स्वास्थ्यासाठी योगविद्येचा प्रसार करीत आहोत व विकासासाठी तंत्रज्ञानाचा वापर करीत आहोत.

* * *

## - विचारधन -

**आपल्या दुःखाचे कारण कोणतेही असले, तरी दुसऱ्याला इजा करू नका.**

आपल्याला कोणत्याही कारणाने त्रास झाला, मनाविरुद्ध काही घडल्याने दुःख झाले, तर आपण भयंकर चिडतो, आणि आपला राग दुसऱ्या व्यक्तीवर काढतो. पण अशा रीतीने दुसऱ्या व्यक्तीवर राग काढून आपले दुःख नाहीसे होत नाही किंवा कमीही होत नाही; पण तेवढा विवेक आपल्याजवळ नसतो. म्हणून दुःखाच्या वेळी मनाचा समतोल बिघडू देऊ नये.



# शहरातील समस्या

**रितेश प्रकाश धावडे**
प्रथम वर्ष, वाणिज्य

शहरीकरण म्हणजे सर्वसमावेशक प्रगतीची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक चालकशक्ती असल्याचे मानले जाते. पण शहरीकरण आपल्या बरोबर अनेक नव्या समस्याही घेऊन येते.

या नव्या समस्यांपैकी सर्वात मोठी समस्या म्हणजे ''स्थलांतर'' आहे. शहरीकरण वाढीच्या प्रक्रीयेत स्थलांतर ही महत्त्वाची प्रक्रिया आहे. जगाच्या बहुतेक विकसनशील देशामध्ये शहरी वाढीचा दर तुलनेने उच्च आहे. शहरीकरणात ग्रामीण लोकांनी शहराकडे केलेले स्थलांतर. हा एक महत्त्वाचा घटक बनला आहे. यामुळे ग्रामीण भागातील लोकसंख्या खूप कमी कमी होत चाललेली आहे. आणि त्या लोकसंख्येमध्ये युवकांची संख्या कमी आहे. ग्रामीण भागातील युवक रोजगारासाठी शहरीभागाकडे स्थलांतर करतात. त्यामुळे शहरीभागातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढतच जात आहे.



वाढत्या शहरी लोकसंख्येसाठी गृहनिर्माण हे सर्वात मोठे आव्हान आहे. शहरी मध्यमवर्गीयांच्या उत्पन्नाशी तुलना करता घरांच्या वाढत्या किंमतीमुळे कमी उत्पन्न गटातील लोकांना परवडणारी घरे घेणे खूप कठीण झाले आहे. त्यामुळे ते अशा ठिकाणी राहतात. जेथे योग्य वेंटिलेशन, प्रकाश, पाणीपुरवठा, सांडपाणी. इत्यादींपासून ते वंचित असतात. उदाहरणार्थ दिल्लीमध्ये सध्याच्या अंदाजाप्रमाणे येत्या दशकात ५ लाख घरांचा तुटवडा असेल. युनायटेड नेशन्स सेंटर फॉर ह्युमन सेटलमेंट्स (यु. एन. सी. एच. एस.) ने ''गृह दारिद्र्य'' अशी एक नवी संकल्पना मांडली आहे. ज्यात असे लोक मोडतात की जे ''सुरक्षित आणि निरोगी निवारा, जसे नळाच्या पाण्याचा पुरवठा, किमान स्वच्छता, ड्रेनेज, घरगुती कचरा वाहून नेण्याची तरतूद'' या किमान गोष्टीपासून वंचित असतात. शहरीभागात घरांचे तसेच जागेची ही कमतरता मोठ्या प्रमाणात जाणवते. या समस्या ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर केलेल्या लोकांना मोठ्या प्रमाणात जाणवते.

शहरातील वाढते आजार ही एक मोठी समस्या निर्माण होताना दिसून येत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे असुरक्षित पिण्याचे पाणी हे आहे. शहरातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत हे काही प्रमाणात दुषितही असते. भविष्यात अपेक्षित लोकसंख्या वाढीसाठी पुरेशा पाण्याच्या उपलब्धतेचा प्रश्न तीव्र होऊ शकतो. शहरातील पिण्याच्या पाण्याची सर्वात जास्त समस्या ही झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना जाणवत असते. त्या लोकांना कमी पाण्यात आपली पाण्याची गरज पूर्ण करावी लागते. तसेच शहरी भागात लोकसंख्या जास्त असते. त्यामुळे या भागात पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात जाणवते.

शहरी भागात लोकसंख्या जास्त असल्यामुळे

तेथील स्वच्छतेचे प्रमाण सर्वात कमी असते. अस्वच्छता ही शहरी भागात विशेषतः झोपडपट्टीतील आणि अनाधिकृत वसाहतीमध्ये तर पाचवीला पुजलेली आहे. त्यामुळे अनेक प्रकारच्या अस्वच्छतेमुळे पसरणारी रोगराई, जसे की कचरा विल्हेवाट ही शहरी क्षेत्रातील एक गंभीर समस्या आहे. आणि कचरा व्यवस्थापन तर एक कायम मोठे आणि महत्त्वाचे आव्हान आहे.

शिक्षण आणि आरोग्य हे मानवी विकासाचे महत्त्वाचे संकेतांक मानले गेले आहेत. शिक्षण आणि आरोग्य या दोन्ही बाबतीत ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी गरीबांची आरोग्यस्थिती जास्तच प्रतिकूल असते. सार्वजनिक आरोग्य व्यवस्था दिवसेंदिवस संकुचित होत चालली आहे आणि नागरिकांना अधिकाधिक खाजगी आरोग्य सेवांवर अवलंबून रहावे लागत आहे. शिक्षणाची देखील अशीच स्थिती आहे. सरकारी शिक्षण व्यवस्थेचे देखील असेच संकुचन होत चालले आहे. त्यामुळे लोकांना खाजगी शिक्षण संस्थांवर अवलंबून रहावे लागत आहे. सार्वजनिक शैक्षणिक संस्थांची स्थिती निराशाजनक आहे. मर्यादित जागा आणि उच्च शुल्क आकारणी यांना तोंड द्यावे लागत आहे.

शहरी भागातील मध्यमवर्गीय व श्रीमंत लोकांना भेडसावणारी मोठी समस्या म्हणजे "शहरातील वाहतूक व्यवस्था" उच्च उत्पन्न असणाऱ्या व्यक्ती अधिक खाजगी वाहने खरेदी करत आहेत. सार्वजनिक वाहतुकीची व्यवस्था अपुरी होत चालली आहे. शहरात मोठ्या संख्येने वाहने रहदारी जाम करत आहेत.

मानवनिर्मित आणि नैसर्गिक आपत्ती ओढवून धोकादायक परिस्थिती आणि जोखीम निर्माण होत आहे. 'यूएनडिपी'च्या मते भारतात भूकंपाचे धोके आहेत. घनतेमुळे आणि प्रचंड संख्येने शहरी भागात हा धोका जास्त संभावतो. शहरी भागात उष्णतेचे प्रमाण वाढत आहे. भूजल पुनर्भरण सोपे नसते आणि जलसंपत्ती आपोआप वाढत नाही. त्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम राबवावे लागतात.

थोडक्यात, वाढत्या शहरीकरणाबरोबर दाट लोकवस्त्या, अपुऱ्या पायाभूत व्यवस्था, न परवडणारी घरे, पूर, पर्यावरण, झोपडपट्ट्या, गुन्हेगारी, दाटीवाटी आणि दारिद्र्य, अस्वच्छता इ. अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.




**'मतदान जनजागृती' कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना कार्यक्रम अधिकारी डॉ. सुधीर वाघमारे.**



# स्त्रियांवरील अत्याचार

**सुकन्या अरविंद जाधव**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

आज भारताला स्वातंत्र्य मिळून ७२ वर्षे पूर्ण झाली आहेत. परंतु आज भारतीय स्त्रीच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, आरोग्यविषयक शैक्षणिक स्थितीचा आढावा घेताना धक्कादायक चित्र समोर येते. भारतीय महिला आजही मानवी हक्काच्या समान हक्कांसंदर्भात पिछाडीवर आहेत हे कटू वास्तव डोळयाआड करता येवू शकत नाही आपल्या अधिकाराप्रती महिलांना अधिक संघर्ष करावा लागत आहे. संविधानिक तरतुदी आणि कायदे असून सुद्धा महिलांचे शोषण अत्याचाराच्या प्रकरणात दिवसेंदिवस वाढत होत आहे.



भारतात एकीकडे महिलांच्या समान हक्कांच्या विकासाच्या दृष्टीने कायदे केले जात आहेत, योजना आखल्या जात आहेत. तर दुसरीकडे महिलांवरील होणाऱ्या विविध अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. बलात्कार, अपहरण, लैंगिक शोषण, कौटुंबिक हिंसाचार, शारिरीक, मानसिक अत्याचार अशा विविध अत्याचारांचे प्रमाण वाढत आहे. या अत्याचारांपासून स्त्रियांचे संरक्षण करणारे कायदे आहेत परंतु त्यांच्यातील त्रुटीमुळे अपराध्यांना कठोर शिक्षा होत नाही. त्यामुळे गुन्हेगारांना कायद्याची भीतीच वाटत नाही. त्यामुळे स्त्री अत्याचाराचे प्रमाण वाढतच आहे. या पार्श्वभूमीवर महिलांना माणूस म्हणून जगता यावे, त्यांचा सन्मान व्हावा यासाठी लोकांची मानसिकता तयार होणे आवश्यक आहे. २१ व्या शतकातील महिला वर्गातही आपल्या हक्कांप्रती जागृकता निर्माण होणे आवश्यक आहे. तरच पुरुषप्रधान समाजव्यवस्थेच्या जोखडातून मुक्त होऊन त्यांना आपला सर्वांगीण विकास करणे शक्य होईल.

सरकारने केलेले कायदे हे फार महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत महिलांना दिले जाणारे स्थान आता हल्लीच्या काळात बदलत जात आहे परंतु हा बदल होतो आहे का? कारण आपण प्रत्येकजण म्हणतो की स्त्रियांना त्यांचे सर्व अधिकार दिले गेले पाहिजे. महिलांना दुय्यमच स्थान आजही दिले जात असलेले दिसून येते. हिच स्त्री पुरुषांच्या खांद्यास खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्त्व सिद्ध करत असतानाही तिला आजही पुरुषी अहंपणाचा सामना करावा लागतोय. आजकालच्या लोकांच्या मानसिक विचारात बदल होण्याची गरज आहे.

****

**- विचारधन -**

**उच्चारावरुन विद्वत्ता, आवाजावरून नम्रता आणि वर्तनावरून शील समजते.**



# भारतातील दारिद्र्य

**निर्मला सोमराया नाईक**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

आपल्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी उपलब्ध होणारी साधने ज्यांना अपुरी पडतात अशा माणसांची स्थिती म्हणजे दारिद्र्य असे स्थूलमानाने म्हणता येईल. या संदर्भात मूलभूत गरजा कोणत्या. हे निश्चित करावे लागते. मूलभूत गरजांची व्याख्या मर्यादित किंवा व्यापक अशा दोन्ही दृष्टींनी करता येते. केवळ जिवंत राहण्यासाठी ज्या आवश्यक त्याच मूलभूत गरजा अशी मर्यादित व्याख्या केल्यास उपासमार यास जवळपास टेकलेले लोक दरिद्री समजावे लागतील. मूलभूत गरजांचा व्यापकदृष्ट्या विचार केल्यास ज्यांना अन्न, वस्त्र आणि निवारा या गोष्टी जगण्यासाठी पुरेशा परंतु सर्वसाधारण जनतेच्या राहणीमानाशी तुलना करता कमी दर्जाच्या असतात. त्या सर्वांना दरिद्री समजावे लागेल. अर्थात दारिद्री लोकांची राहणी अन्य राष्ट्रातील दरिद्री लोकांच्या राहणीच्या मानाने कितीतरी उच्च पातळीवरील असू शकेल. उदा. अमेरिकेसारख्या विकसित औद्योगिक राष्ट्रामध्ये दरिद्री या सदरात मोडणाऱ्या लोकांजवळ मोटार, धुलाईयंत्र, दूरचित्रवाणी इ. असू शकतील. अनारोग्य, शिक्षणाचा व कौशल्याचा अभाव, समाजापासून फटकून राहण्याची प्रवृत्ती, विध्वंसक वा बेशिस्त वागणूक, दूरदृष्टीचा अभाव इ. गोष्टींही दारिद्र्याशी निगडीत असलेल्या आढळतात.



परंतु दारिद्र्याच्या व्याख्येत त्या समावेश सहसा करीत नाहीत. मात्र दारिद्र्याचे परिणाम व्यक्तिमात्रास तसेच समाजास नुकसानकारक ठरतात.याबद्दल एक मत आहे. तसेच समाजास नुकसानकारक ठरतात, याबद्दल एक मत आहे. अर्थशास्त्रज्ञांच्या आणि धर्मवेत्त्यांच्या या विचारसरणीमुळे अठराव्या शतकात व एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात दारिद्र्याचा परिघ करण्याचे प्रयत्न अत्यंत कमी प्रमाणात झाले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात डार्विनच्या सिंद्धांताचा प्रभाव पडून अनियंत्रित स्पर्धा हिच समाजाच्या उत्कर्षासाठी आवश्यक आहे. व म्हणून आर्थिक मदत करणे सामाजिक उत्कर्षास बाधक होईल. असा समज दृढ होत गेला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस ही विचारसरणी मागे पडली आणि अकिंचनामध्ये व त्यांच्या स्थितीमध्ये सुधारणा करता येणे शक्य आहे. या मताचा पुरस्कार होऊ लागला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत दरिद्री, आजारी, बालके यांच्यासाठी बऱ्याच वेगवेगळ्या संस्था काढण्यात आल्या. गरिबांना आर्थिक साह्य देणाऱ्या संस्था खाजगी स्वरुपाच्या होत्या. खाजगी देणग्या गोळा करुनच अंकिचनांच्या मूलभूत गरजा त्या जेमतेम भागवू शकत.'टॉयन्बी व्हॉल' सारख्या पुनर्वसन गृहांमधून अंकिचनांसाठी शिक्षणाचे व सामाजिक सहजीवनाचे काही सामाजिक कार्यक्रम ते चालवीत असत.१८९० ते १९१० या कालखंडात पुनर्वसनगृह कार्यकर्ते, पत्रकार, सामाजिक सर्वेक्षक आदींचा प्रभाव सामाजिक धोरणांवर पडू लागला

व दारिद्र्य ही केवळ व्यक्तिगत आपत्ती नसून ती एक सामाजिक समस्या आहे. याची जाणीव तीव्रतेने होऊ लागली. पहिल्या महायुद्धापूर्वीच्या काळात पाश्चिमात्य राष्ट्रांत झपाट्याने आर्थिक विकास होऊन सुद्धा बऱ्याच लोकांना त्याचा लाभ मिळाला नव्हता. त्यामुळे शेतकरी, कामगार व बेकार यांच्यामध्ये असंतोष व अशांतता असे. अशा परिस्थितीत त्यांच्या हिंसक प्रवृत्तीही बळावत चालल्याने त्यावर इलाज म्हणून शासनातर्फे दारिद्र्याच्या परिघाचे कार्यक्रम हाती घेण्यात येऊ लागले. सुरुवातीला शासकीय कार्यक्रमांनी अंकिचनांच्या हातात प्रत्यक्ष आर्थिक मदत देऊ केली नाही. सक्तीचे शिक्षण, गृहनिवास, सार्वजनिक आरोग्य सुधारणा, स्त्रिया व मुले यांच्या कामाच्या तासावर व वेतनांवर नियंत्रण इ. उपायांनी दारिद्र्याचे दृष्टचक्र तोडण्याचे प्रयत्न झाले. त्यानंतर बेकारी - विमा, कामगारांना नुकसान भरपाई, आरोग्यविमा यासारखे कार्यक्रम सुरु करण्यात आले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाच्या सुरुवातीस कामगारांतर्फे प्रत्यक्ष आर्थिक मदतीच्या मागण्यांना जोर आला व त्यातूनच जर्मनी व ग्रेट ब्रिटनमध्ये सक्तीचा अंशदानात्मक विमा व अमेरिकेत बेकारी - विमा असे कार्यक्रम सुरु केले. म्हणूनच स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक नियोजनाद्वारे लोकशाही तत्त्वानुसार गरिबी हटविण्याचे प्रयत्न विविध आघाड्यावर चालू आहेत. भारतातील दारिद्र्यपीडीत लोकांच्या संख्येविषयी अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी अंदाज केले आहेत. ओझा यांच्या अंदाजाप्रमाणे १९६० - ६१ मध्ये ग्रामीण लोकसंख्येच्या ५१.८ टक्के व शहरी लोकसंख्येच्या ७.६ टक्के मिळून एकूण लोकसंख्येच्या ४४ टक्के लोक दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत होते. वर्धन यांच्या अंदाजानुसार दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण ग्रामीण भागात १९६०-६१ मध्ये एकूण ग्रमीण लोकसंख्येच्या ३८ टक्के होते. व ते १९६७ - ६८ मध्ये ५३ टक्क्यांपर्यंत वाढले. दांडेकर व रथ यांच्या अंदाजाप्रमाणे १९६० - ६१मध्ये ते ग्रामीण लोकसंख्येपैकी ४० व शहरी लोकसंख्येपैकी ५० टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली होते व १९६७ -६८ मध्ये ३७.१ टक्क्यांपर्यंत कमी झाले. नियोजन आयोगाच्या अंदाजाप्रमाणे पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीला एकूण लोकसंख्येपैकी ४० टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत व त्यांचा दरडोई उपभोगखर्च दरमहा ४० रु. पेक्षाही कमी आहे. दारिद्र्याचा परिघर करण्यासाठी अर्धबेकारांना आणि बेकारांना किफायतशीर रोजगार मिळवून देणे हाच खात्रीलायक मार्ग आहे. केवळ राजकोषीय धोरणात काही औपचारिक फेरबदल करुन उत्पन्नाच्या वाटपामधील विषमता काही प्रमाणात कमी केल्याने दारिद्र्याचा प्रश्न सुटणार नाही. म्हणून आर्थिक विकासासाठी नियोजित विनियोग करताना श्रमप्रधान प्रकल्पांना अग्रक्रम देणे आवश्यक आहे.




**पालक सभेप्रसंगी पालकाचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल.**




**पालक सभेप्रसंगी संस्थेचे चिटणीस मा. चंद्रकांत लिंगायत मनोगत व्यक्त करताना.**



# पर्यावरण व आजची स्त्री

**आस्मा गुलजार मापारी**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

'पर्यावरण' हा शब्द गेल्या गेल्या तीन - चार दशकांमध्ये विशेषत्वाने रद्द झाला असला तरी निसर्ग पर्यावरण विषयक जाणीव भारतीय भूमीवर वेदकाळापासून रुजलेली आहे. माणूस आणि निसर्ग हे परस्परांचे अविभाज्य भाग असल्याचे अनेक उल्लेख केवळ वेदांतच नव्हे, तर प्राचीन जैन आणि बौद्ध ग्रंथामध्ये ही वारंवार आढळतात. निसर्गाच्या एका घटकाला झालेली जखम माणसासह इतर सर्व घटकांवर प्रतिकूल परिणाम घडवते असे सांगून माणूस आणि निसर्ग यांच्यातला एकजीवपणा कबीर, चिस्ती, तुकाराम, रामदास अशा सगळया संत महात्म्यांनी पुनःपुन्हा गायला आहे. निसर्गातली अगदी क्षुल्लक वाटणारी वस्तुही माणसासाठी उपयुक्त आहे आणि म्हणूनच माणसाने निसर्गाशी सुसंवादी जीवन जगायला शिकले पाहिजे. हा दृष्टिकोन जीवकाच्या कथेत अधोरेखित झाला आहे. माणसाला निरुपयोगी अशी एकही वनस्पती जीवक शोधू शकला नव्हता.

स्वार्थापलीकडे जाऊन निसर्गाचे संरक्षण करणे प्रत्येक व्यक्तीची फक्त जबाबदारीच नव्हे तर धर्म, असल्याची जाणीव, वेदकालीन साहित्यापासून आजपर्यंतच्या अनेक ग्रंथांमध्ये वारंवार प्रकट झाली आहे. संपूर्ण मानवजात आणि इतर सजीवांच्या बाबतीत माणसाच्या ज्या जबाबदाऱ्या आहेत. त्यांना 'मानव धर्म' असे संबोधून भारतीय परंपरेने हा धर्म पृथ्वीवरच्या प्रत्येक व्यक्तीला लागू असल्याचा दृष्टिकोन बाळगला आणि म्हणूनच प्रत्येक माणसाने इतर सर्व सजीवांविषयी मनःपूर्वक आदर बाळगण्याचा आग्रहही धरला.

ह्या विषयावर काही लिहायला घेतले की, द्विधा मनस्थिती होते. पुरुषांच्या जोडीने पुढे जाणारी की, हे जग बघण्याआधीच अंधारात जाणारी ह्यापैकी कोणाचे नक्की उदाहरण घ्यायचे ह्याचा विचार करावा लागतो. स्त्रियांची बुद्धिमत्ता ही निसर्गताच असते. असं खुद्द महाकवी कालिदासानं म्हटलं आहे. असे असूनही बायकांना काय कळतं ? बोलून मोकळे होणारे असंख्य लोक समाजात वावरताना दिसतात. एकेकाळी पुरुषांच्या बरोबरीने समाजात स्थान घेणारी म्हणून उदाहरण देण्यात येणारी स्त्री हल्ली मात्र जन्मासाठीच लढताना दिसते. मुळात गर्भाशयात असल्यापासून ते जन्म घेईपर्यंत एवढेच काय ते तिचं आयुष्य आहे असे वाटू लागलयं. बाळाला जन्म दिल्यानंतर आईमार्फत त्याला अन्नपुरवठा करणारी नाळ कापली जाते. परंतु स्त्री जेव्हा जन्म घेते तेव्हाच तिची नाळ ही समाजाशी बांधली गेलेली असते. पण हे मान्य करण्यास मात्र समाज तयार होत नाही. पुरातन काळापासून आई अथवा माता ह्या शब्दाला एक विशेष महत्त्व आहे. अनेक शिलालेखांमध्ये मातृदेवतेचे वर्णन दिसते. मुळात एखाद्या जन्माच्या उत्पत्तीचे मूळच असते. प्राचीन काळात स्त्रीला अनन्यसाधारण महत्त्व होते. पण आज परिस्थिती पूर्णपणे वेगळी झाली आहे.

आज २१ व्या शतकात नोकरी अथवा शिक्षणाच्या निमित्ताने स्त्रियांनी उंबरठा ओलांडला असला तरी अजूनही अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते. पण ह्या परिस्थितीस स्त्री स्वतः जबाबदार आहे. " या देवी सर्वभूतेषू शक्तीरूपेण संस्थिता ! नमस्तस्यै नमस्तस्यै नमोनमः " हे वचन सिद्ध करुन दाखवले आहे प्रत्येक स्त्रीकडे मग ती ग्रामीण असो, किंवा शहरी असो, तिच्यात एक अशी सुप्त शक्ती असते. ती शक्ती कोणत्याही येणाऱ्या संकटांशी दोन हात करु शकेल.निसर्गानेच तिला ही शक्ती दिली आहे. आज स्त्रिला असेच स्वातंत्र्य हवे आहे.

" अबला नाही सबला हेतू, नारी नही चिंगारी हेतू' हे आजच्या स्त्रियांनी लक्षात घेतले पाहिजे आज पुरुषांच्या बरोबरीने पुढे जाणारी स्त्री अनेक संकटांना सुद्धा सामोरे जात आहे. समाजानेसुद्धा या सर्वात त्यांना साथ दिली पाहिजे. कारण जेव्हा स्त्री जन्माला येईल तेव्हाच तिच्या गर्भातून समाज जन्म घेईल !



# लोकसंख्येची समस्या

**दिप्ती दशरथ माळी**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

भारताची लोकसंख्या वाढत आहे आणि ती कमी कशी करता येईल यावर बराच काथ्याकूट केला जात आहे. भारताची लोकसंख्या वाढत असतानाच जगातल्या काही देशांना लोकसंख्या कशी वाढवता येईल. यावर विचार करावा लागत आहे. साऱ्या जगातच लोकसंख्येच्या बाबतीत दोन प्रकारची स्थिती आहे. भारतासारख्या अविकसित देशात लोकसंख्या कमी करण्यासाठी अनेक मोहिमा राबवल्या जात आहेत. परंतु इतर देशामध्ये लोकसंख्या वाढवण्याच्या मोहिमा हाती घेतल्या जात आहेत. त्या देशातल्या औद्योगिक प्रगतीने त्यांची संख्या आपोआपच घटली आहे. जगात आजवर तसेच आढळले आहे. तेव्हा कुटुंब नियोजन म्हणजे मुले कमी असावीत याचा प्रचार ही कल्पना आता मागे पडली असून मुले अधिक असावीत यासाठी प्रयत्न करणे हाही कुटुंब नियोजनाचाच एक भाग झाला आहे. जगात आता वैद्यकीय क्षेत्रात एक मोठाच गंभीर विषय चर्चिला जात आहे तो म्हणजे जगातल्या सगळयाच देशातल्या पुरुषांची प्रजनन क्षमतेत कमतरता आली आहे आणि ती कशी वाढवावी हा डॉक्टरांना पडलेला प्रश्न आहे. ही स्थिती मोठीच चिंताजनक आहे कारण अनेकांना मुलेच झाली नाहीत. तर त्यांच्याही



आयुष्यात अनेक समस्या निर्माण होणार आहेत आणि त्याचा समाजावरही परिणाम होणार आहे.

कुटुंब नियोजन म्हणजे समाजाची गरज लक्षात घेऊन मुलांची संख्या कमी किंवा जास्त करणे यातला जास्त करणे हा भाग कोणी लक्षातच घेतला नाही. आता काही देशांना तो लक्षात घ्यावा लागत आहे. शिवाय लोकसंख्या कमी जास्त होण्याबरोबरच लोकसंख्येत विविध वयोगटाचा समतोल राखला जाणे हेही आवश्यक असते. स्त्री आणि पुरुष यांच्या संख्येत समतोल आहे का ? वृद्धांची संख्या किती, तरुण किती आहेत याला महत्त्व असते. आपला देश २०२० साली महाशक्ती / महासत्ता होईल, असे डॉ. अब्दुल कलाम यांनी म्हटले तेव्हा लोकसंख्येत म्हणजेच १९९१ साली भारताच्या लोकसंख्येत तरुणांची संख्या मोठी होती आणि तीच भारतीय जमेची बाजू होती.

आता ह्या गोष्टीला २० वर्षे होऊन गेली. १९९१ साली तरुण असलेली लोकसंख्या आता २० वर्षांनी म्हातारी झाली. आता लोकसंख्येचे वर्गीकरण सादर व्हायला लागले असून देशातल्या लोकसंख्येतले वृद्धांचे प्रमाण वाढत चालले असल्याचे दिसायला लागले आहे. कोणत्याही देशाचे सरासरी वय असते त्या देशात ज्या वयोगटातले लोक जास्त असतील तो त्या देशाचा वयोगट. जपान आणि चीन या देशांचे सरासरी वय भारतापेक्षा जास्त आहे. काळाच्या ओघात तसे होत असते. उदाहरणार्थ १९५० साली जपानची लोकसंख्या १२ कोटी होती.ती

आताही १२ कोटीच आहे. तिथल्या लोकांनी देशाच्या भल्यासाठी कुटुंब नियोजनाचा कडक अंमल करुन लोकसंख्या वाढू दिली नाही. राहणीमान चांगले असल्याने लोक जास्त जगायला लागले आणि त्यांनी कुटुंब नियोजनाची अंमलबजावणी कसोशीने केल्यामुळे त्यांना फार मुले झाली नाहीत. पहिली पिढी या वृद्धांची, दुसरी पिढी त्यांच्या मुला - मुलींची या दुसऱ्या पिढीत पहिल्या पिढीपेक्षा कमी लोक आहेत. कारण पहिल्या पिढीने मुलेच होऊ दिली नाहीत. मुले कमी म्हणून तिसऱ्या पिढीत नातवंडे कमी. अशा प्रकारे पहिल्या पिढीतल्या म्हणजे साठी उलटलेल्या लोकांची संख्या मोठी आणि तरुण बालकांची संख्या कमी एकंदरीत ३४ टक्के वृद्ध, १४ टक्के बालके आणि जेमतेम ५० टक्के लोक १६ ते ५९ या वयोगटातले अशा रितीने लोकसंख्येत म्हातारे जास्त आहेत.

भारतासारख्या म्हणजेच आपल्या देशात कुटुंब नियोजनाचा प्रसार झालेला आहे आणि आता मुलांची संख्या कमी असावी असा लोकांचा दृष्टिकोन आहे. त्यामुळे आपल्या देशातही आगामी १२ वर्षात वृद्धांची संख्या जपानप्रमाणे मोठी होणार आहे. ही स्थिती चिंताजनक आहे. १९९० साली देशातल्या लोकसंख्येमध्ये केवळ ११ टक्के एवढी लोकसंख्या वृद्धांची होती. २०११ साली भारत देशाची लोकसंख्या १२१ कोटी होती. त्यामध्ये तरुणांची संख्या जास्त आढळली. १९९० साली जगाच्या पाठीवर भारत हा वृद्धांचे प्रमाण सर्वात कमी असलेला देश होता. २०२५ साली भारतातल्या वृद्धांची संख्या वाढलेली असेल. कारण आज जे लोक तरुण आहेत. ते २५ साली वृद्ध झालेले असतील. २०२५ साली वृद्धांचे प्रमाण वाढेल तेव्हा त्याचे परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर आणि सामाजिक स्थितीवर होणार आहेत. वृद्धांचे प्रमाण मोजताना वृद्ध म्हणजे ६० वर्षे उलटलेली व्यक्ती असे गृहीत धरलेले असते. देशाच्या लोकसंख्येपैकी २५ टक्के लोक जर या वयोगटातले असतील तर त्या लोकांच्यामुळे अनेक प्रकारच्या नव्या समस्या निर्माण झालेल्या दिसणार आहेत.

* * *



**विद्यापीठामार्फत जिल्हास्तरावर घेतलेल्या अभंग स्पर्धेमध्ये अभंग गाताना कु. कांचनी चव्हाण.**



# सुशिक्षितांची बेकारी

**शीतल रविंद्र दबडे**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

भारतात दारिद्र्याची समस्या ही प्रामुख्याने बेरोजगारीतूनच उद्‌भवलेली आहे. हे विधान सर्वसामान्य होण्यास हरकत नसावी. भारतातील चाळीसहून अधिक टक्के लोकसंख्या दारिद्र्यग्रस्त जीवन कंठीत आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली, तर भारतात बऱ्याच मोठ्या प्रमाणावर बेकारी वा बेरोजगारी असली पाहिजे हे उघड आहे. तथापि भारतातील बेकारी ही वर वर्णन केल्याप्रमाणे संरचनात्मक हंगामी व घर्षणात्मक आहे. तसेच अविकसित देशातून अनुभवाला येणारी अर्ध-बेकारी आणि छुपी बेकारी भारतामध्येही अनुभवाला येत आहे. अविकसित देशामध्ये शिक्षणावर होणारा खर्च अंशतः कामगारांची कुशलता पातळी वाढविण्यासाठी होतो असे मानले तर सुशिक्षितांची बेकारी ही समस्या देशामध्ये एका अर्थाने मर्यादित प्रमाणावर उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीच्या विनियोगातील त्रुटी दर्शविते असे म्हणता येईल.




ज्या व्यक्तीने शिक्षण घेतले आहे आणि त्याची काम करण्याची इच्छा व पात्रता असूनही काम मिळत नसेल अशा स्थितीला सुशिक्षित बेकारी असे म्हणतात. ही बेकारी दहावी, बारावी पास झालेले पदवीपूर्व, पदवीधर, पदव्युत्तर शिक्षण घेतलेले या लोकांमध्ये आढळून येते. नोकरी योग्य शिक्षणासाठी जास्त पैसे मोजावे लागतात. अनेकांच्या आर्थिक परिस्थितीमुळे व उच्च शिक्षणासाठी आकारण्यात येणाऱ्या भरमसाठ शुल्कामुळे योग्य शिक्षण घेणे शक्य होत नाही. म्हणूनही बेकारी वाढते. शिक्षण घेणारे दिवसेंदिवस वाढत असले तरी त्यांच्या शिक्षणासारखे त्यांना काम मिळत नाही. उच्च पदवी घेऊन देखील आज लाखो सुशिक्षित बेकारांचे प्रमाण वाढले आहे. सरकार कोणतेही असो पण त्या सुशिक्षितांना त्यांच्या पदवीनुसार काम मिळाले पाहिजे. नाहीतर ही बेकारी भविष्यात खूप वाढेल व त्यांना पाहून येणारी पुढली पिढी ही शिक्षणापासून वंचित राहिल.

## - विचारधन -

**अनुभव हा महान शिक्षक आहे, पण तो मोबदला मात्र फार घेतो.**

आपण आपल्या जीवनात बऱ्यावाईट अनुभवांनी बऱ्याचशा गोष्टी शिकत असतो. म्हणजे अनुभव हा एक शिक्षक आहे; पण काही वेळेला हा अनुभव घेत असताना आपले शारीरिक अगर आर्थिक नुकसान होत असते. त्यावरून आपण काहीतरी शिकतो; परंतु त्यासाठी फार किंमत मोजावी लागते.



# बँकांचे बदलते स्वरुप

**स्मिता सुभाष कानडे**
तृतीय वर्ष, वाणिज्य

भारतात माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली आहे हे दिसून येते. हे सर्व संगणक व अंतरजाल (Internet) यांच्या वेगाने वाढत जाणाऱ्या वापरामुळे होत आहे. यामुळे जगात इ-कॉमर्स, इ-मेल, इ-माहिती अंतरबदल (E - data interchange) इ. प्रचंड जाळे तयार झाले आहे. यांचा वापर उद्योग, व्यापार, वाहतूक, सरकारी कचेऱ्या इ. सर्व ठिकाणी होतो आहे अर्थातच यातून बँकिंग क्षेत्र कसे अलिप्त राहिल. आधुनिक काळात बँक क्षेत्रात अनेक बदल करण्यात आले आहेत. यात इतर क्षेत्रांप्रमाणेच नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब केला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ग्राहकांना नवनवीन सेवा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. या स्पर्धात्मक जगात आपली बँक कशी सरस आहे. यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर केला जातो. आपले क्षेत्र वाढविताना हा विकासही होत आहे.



याचाच भाग म्हणून बँकानी ग्रहकांना मूलभूत आणि आनुषंगिक सेवा पुरविण्यासाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर सुरु केला. त्यामुळे आजच्या काळात बँका माहितीधिष्ठित (Information based) बनल्या आहेत. यात इलेक्ट्रॉनिक बँकिंग, ए.टी.एम. सेवा, क्रेडिट, डेबिट कार्ड सेवा यांसारख्या अत्याधुनिक सेवा येतात. या अत्याधुनिक सेवांमुळे लोकांना बँकामध्ये जावून जे काम करावं लागत होते ते काम ते आता कुठेही राहून करु शकतात. त्यामुळे लोकांचा वेळ वाचतो. प्रत्येकाच्या घरात किंवा खिशात बँका आहेत असे म्हटले तर गैर ठरणार नाही.

इ-बँकिंगमधील 'इ' हे अक्षर इलेक्ट्रॉनिकसाठी वापरले आहे. इ-बँकिंगचे पूर्ण रुप म्हणजे इलेक्ट्रॉनिक बँकिंग होय. इलेक्टॉनिक माध्यमाचा वापर करुन केल्या जाणाऱ्या बँक व्यवसायाला इ.बँकिंग म्हणतात. वेगळ्या शब्दात सांगायचे तर माहिती तंत्रज्ञानाची आधुनिक साधने वापरुन बँकसेवा पुरविण्याच्या व्यवसायाला इ-बँकिंग म्हणतात. जनतेशी इतर बँकांशी आणि मध्यवर्ती बँकेशी व्यवहार करताना या बँका इ-बँकिंगचा वापर करतात.

ATM म्हणजे Automated Teller Machine मराठीत 'स्वयंचलित गणक यंत्र' असा शब्द वापरला जातो काही लोक याला All Time Money सुध्दा म्हणतात. कारण ATM हे २४तास x ७दिवस चालू असते. ही सेवा सर्वत्र ATM या इंग्रजी आद्याक्षरानेच अधिक ओळखली जाते. ग्राहकांशी आर्थिक व्यवहार करण्यासाठी बँकेने निर्माण केलेली स्वयंचलित यंत्रणा खूप सोयीची ठरत आहे. प्रवासात तर त्याचे महत्त्व जास्त असते.

पतपत्र व नावेपत्र यांच्यात मुख्य फरक असा की, Credit Card द्वारे कर्ज स्वरुपात रक्कम अदा केली जाते. तर Debit Card द्वारे खातेदारांना त्यांच्या खात्यावरील शिल्लक रक्कम अदा केली जाते. पतपत्र धारकांना वापरलेल्या रकमेवर व्याज भरावे लागते तर डेबिट कार्ड धारकाला असे व्याज भरावे लागत नाही. डेबिट कार्डचा उपयोग सुध्दा पतपत्राप्रमाणेच दोन मुख्य कारणांसाठी होतो. एक म्हणजे पैसे काढण्यासाठी. एकाच ठिकाणी त्या सोयी मिळतात म्हणजे श्रम, वेळ वाचत आहे. व्यक्ती जेथे असेल तेथून काम करु शकते.त्याला बँकेत जावं लागत नाही. इ-बँकिंग हे सर्व ग्राहकांना भेटलेलं वरदान आहे. बँकांचे हे नवं रुप ग्राहकांनाही स्मार्ट बनवणारं असचं आहे. आर्थिकतेशी संबंधित हा स्मार्टपणा तसा सुखदच आहे.



# करिअर

**यशश्री रघुनाथ शेटे**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

आयुष्याच्या वाटचालीत आपल्याला अनेक गोष्टी मार्गदर्शक ठरतात. आपला संपन्न इतिहास ही त्यातलीच एक गोष्ट आहे. इतिहासाच्या पानापानांवर आपल्या दैनंदिन आयुष्यात प्रेरणादायी ठरतील अशा अनेक गोष्टी घडलेल्या आहेत. फक्त डोळसपणे आपण त्यांचा विचार करायला हवा.

शिवचरित्रातून कोणी काय शिकावं हा ज्याचा त्याचा प्रश्न. पण आजच्या करिअररिस्ट तरुणाईनं काय घ्यावं. असा प्रश्न मला कोणी केला तर, मी सांगेन, एक उत्तम करिअरिस्ट होणं' हे आपण शिवरायाकडून शिकलं पाहिजे. आधुनिक कॉर्पोरेट जगामध्ये करियरच्या दृष्टीने ज्या विविध गोष्टींना महत्त्व दिलं जातं, त्या गोष्टी शिवचरित्रामध्ये जागोजागी पहायला मिळतात. शिवाजी महाराजांच्या अंगी असे असंख्य गुण होते ज्यांचा आजच्या कार्पोरेट जगाला सुद्धा हेवा वाटावा.

शिवाजी महाराजांसारखे व्यक्तिमत्व एका रात्रीत घडत नसतात. त्यामागे शिस्तबद्ध संस्कारांचा मोलाचा सहभाग असतो. मातोश्री जिजाबाईंनी रामायण, महाभारत, चाणक्य नीतीपासून तलवारबाजी, दांडपट्टा, अश्वारोहण तर शिकवलंच, पण त्याचबरोबर 'अखंड' स्थितीचा निर्धार अशी दुर्दम्य इच्छाशक्ती त्यांच्यात निर्माण केली.

माणूस घरच्या संस्काराबरोबरच घराबाहेर कोणाच्या सहवासात रमतो, यावरसुद्धा त्यांचं यशापयश अवलंबून असतं. शिवराय घडले ते मावळ खोऱ्यातील काटक आणि स्वामीनिष्ठ असणाऱ्या मावळ्यांमध्ये. त्यामुळे संघटन कौशल्य, ध्येयाला चिकटून राहण्याची वृत्ती शिवरायांच्या अंगी आपोआप बाणवली गेली. त्यांचे युद्धतंत्र शक्तीच्या नव्हे, तर युक्तीच्या तंत्रावर अधारलेले होते. शिवरायांनी अफजलखानाचा केलेला पाडाव किंवा औरंगजेबाच्या तावडीतून सुटलेले राजे हे त्यांच्या अंगी असलेल्या प्रखर बुद्धीमत्तेचे यश होय. बुद्धीबळाच्या पटावर जशा सगळया चाली सरळ खेळायला नसतात काही चाली तिरक्यासुद्धा खेळाव्या लागतात. शिवरायांनी हे प्रत्यक्ष जीवनात कसं करावं लागतं हे जगाला दाखवून दिलं. कधी आपल्यावर झालेल्या संस्कारांच्या, कधी सवंगड्यांचा तर कधी युक्तीचा वापर ते करत असतं. कोणत्याही प्रसंगी त्यांनी आपल्या ध्येयाचं विस्मरण होऊ दिलं नाही. हीच गोष्ट कार्पोरेट जगाला लागू पडते. करिअरची वाटचाल करणाऱ्या आजच्या सैनिकांना ' शिवाजी महाराज' एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतात. त्यांनी अफजलखानाचा केलेला पाडाव आपण फक्त एका आदिलशाही सरदाराचा केलेला पराभव या दृष्टीनेच पाहतो. पण यामागे शिवरायांचे कोणकोणते गुण दडलेले आहेत ते पहा.

आजच्या कॉर्पोरेट जगामध्ये सुद्धा हे गुण उपयोगी पडू शकतात. शिवरायांच्या आयुष्यातली प्रत्येक घटना ही आपल्याला दृष्टिकोणाने सुद्धा काही ना काही शिकवते. ध्येयपूर्तीसाठी ध्येयाची निश्चिती, ध्येयाची पूर्वतयारी, स्वयंशिस्त, नेतृत्व, जिद्द आणि सकारात्मक वृत्ती या सर्व गुणांची आवश्यकता असते.

करिअर करताना सुद्धा आपण हेच ध्यानात घेतलं पाहिजे. अडी - अडचणी, संकटे आली, कितीही कालापव्यय झाला. तरीही उराशी बाळगलेलं स्वप्न पुरे करण्यासाठी आपण शिवरायांसारखी अहोरात्र मेहनत घेतली पाहिजे. नवनवीन आव्हानं अंगावर घेतली पाहिजेत आणि त्याचबरोबर आपण आपल्या ध्येयांवर अढळ विश्वास ठेवला पाहिजे. तुम्ही तुमच्या अंतर्मनावर आणि क्षमतांवर पूर्ण विश्वास ठेवला तर तुम्ही सुद्धा तुमचं स्वराज्य नक्कीच स्थापन करु शकाल.

* * *

# जन्मदाती आई



**सायली संजय शेटचे**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

मी आईची व्यथा व्यक्त करण्याचा प्रयत्न करत आहे. जी आई ती बाळाला जन्म तर देतेच पण, जेव्हा तो मोठा होतो तो स्वकष्टावर व स्वतःच्या पायावर उभे राहतो तेव्हा तिच आई त्याला पोरकी होते व तो सरळ तिला वृद्धाश्रम दाखवतो हे असं का होतं? तिने ह्याच मुलाला जन्म दिला म्हणून हे तिला दिवस दाखवत आहे का? हे असे का होतं ? हे तर; खूप चुकीचे आहे. हे कुठेतरी थांबलचं पाहिजे.

मी आई आहे, जी आपल्या पोटात वाढवणाऱ्या जीवाची चाहूल जेव्हा तिला लागते. तेव्हा सर्वात आनंद पहिला जिला होतो ती आहे आई. मनुष्यांची या धरतीवर संख्या वाढावी म्हणून देवाने वरदानात स्त्रीला आई होण्याचे पवित्र असं वरदान जेव्हा तिला दिलं जातं. ती स्त्री कधी मुलगी, बहिण, बायको तर होतेच पण; ती जेव्हा तिला आईचे रुप दिले जाते ना ते कोणालाही मिळत नाही. असे म्हणतात ना, ''स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी!''

याचं कारण म्हणजे काय कोणाकडे कितीही पैसा असू देत पण जर त्याच्याकडे आई नसेल ना तर त्या श्रीमंतीचा काही उपयोग नाही. पण ज्याच्याकडे आई आहे ती जगातली सर्वात श्रीमंत व्यक्ती असेल, पण आता हे सगळं बदललय. काही मोजक्याच ठिकाणी तुम्हांला आई दिसेल.बाकीच्या ठिकाणी तुम्हांला दिसणार नाही. दिसेल पण त्या वृद्धाश्रमात. बरोबर आहे ना ! अरे ज्या आईने पोटात नऊ महिने वाढवलं. स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी तिचे तुम्ही बोट पकडता. पहिल्यांदा तुम्ही बोलायला लागताना पहिली हाक तुम्ही तुमच्या आईला देता ना तिच आई तुम्हांला पोरकी झाली. तिने जे संस्कार दिले ते तिच्या विरोधात उभे राहण्यासाठी वापरता जेव्हा तुझी बायको आई होईल आणि मूल झाल्यावर तो ही तुम्हांला वृद्धाश्रमात टाकेल तेव्हा तुम्हाला तुमच्या चुकीचे अनुभव येतील, पण एक लक्षात ठेवा की, जेव्हा आपण आपल्या आई बरोबर वागतो ना तेव्हा मूल बघत असते. तुमच्या वागण्यावरुनच बोलण्यावरुनच त्या मुलांमध्ये संस्कार होतात. कारण ते मूल त्याच्या आई - वडिलांकडून शिकते. म्हणून आधी स्वतः आईसारख्या पवित्र शब्दाला व मातेला जपण्याचा प्रयत्न केला तर, ती जन्म देणारी एक जीवंत मशिन होईल.

शिवाजी सारखा जरी पुत्र या जगात पुन्हा आला नाही, तरी शिवाजींनी जसा मातेचा आदर राखला तो आदर जरी तुम्ही केलात तरी खूप आहे. तेव्हा आम्ही म्हणू हे शिवाजी महाराजांचे मावळे आहेत. कारण जी आई तुम्हाला रक्ताचं दूध करुन पाजते ना त्या आईचे कर्ज जर तुम्ही चुकवलं नाही तर ते सर्वात मोठे पाप असेल हे लक्षात ठेवा. दुधाचे कर्ज तरी भरण्याचा प्रयत्न करा. आईला सन्मानाने वागवण्याचा प्रयत्न करा. बघा हळू हळू वृद्धाश्रमांची संख्या कमी होईल. आणि आई हे पावित्र्य जपले जाईल हे लक्षात ठेवा.

श्रावण बाळासारखे जरी तुम्ही आई-बापाचे ओझे वाहून गेला नाही तरी चालेल, पण तिच्या दुःखात सामील होण्याचा प्रयत्न करा, कारण जी तुम्ही जन्माला येण्याच्या अगोदरच तुम्ही मोठे झाल्यावर काय करणार हे जी ठरवते तुम्ही जर कुठे मागे आलात तर, तुम्हाला नाराज होता न देता ती तुम्हाला सांगते की, तू हे करु शकतोस हे त्याला प्रोत्साहन देण्याचे काम करते ती आई. त्या आईला कधी विसरु नका. कारण तिच्या सावलीत रहा. तुमच्या वाटेला आलेलं दुःख ती स्वतःकडे मागून घेते ती आई असते.

अशा आईसारख्या मातेला कोटी - कोटी प्रणाम.

* * *



# तरुणपिढीची नेटवारी

**अस्मिता अनंत पाटेकर**
तृतीय वर्ष, वाणिज्य

भारताचे माजी राष्ट्रपती स्वर्गीय मा.श्री.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे स्वप्न किंवा ध्येय होतं की, २०२०साली भारत महासत्ता होईल. विकसित राष्ट्र म्हणून नावारुपाला येईल. यासाठी भारताची तरुणपिढी कर्तृत्ववान, सक्षम असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भारत हा विकसनशील देश आहे. भारताची लोकसंख्या प्रचंड आहे. लोकसंख्येमध्ये भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. त्यामध्ये भारताची तरुण पिढी सर्वात जास्त आहे. भारतामध्ये तरुणपिढी ही संपूर्ण जगातल्या इतर देशांपेक्षा सर्वात जास्त आहे. म्हणून आज भारताला तरुणपिढीचा देश मानतात.




जसे आपण म्हणतो की, सध्याची तरुणपिढी ही भारताचे उज्ज्वल भविष्य घडविणारी पिढी आहे. ती भारताला महासत्ता बनवणारी आहे. परंतु एकीकडे ही पिढी वाईट मार्गाने मोठ्या प्रमाणावर वाटचाल करत आहे. सध्याची तरुणपिढी ही व्यसनी होत आहे. दारु, सिगारेट, मटका, गुटखा अशा पारंपरिक व्यसनाच्या विळख्यात सापडली आहे. त्याच बरोबर या इंटरनेट सारख्या भयानक गोष्टीचे व्यसन सध्याचे तरुणपिढी करते.

इंटरनेटशिवाय तरुणपिढींचे पान हालत नाही असे म्हणता येईल. प्रत्येक तरुण-तरुणीच्या हातात मोबाईल असतोच. मोबाईलमध्ये पाहावे तर इंटरनेटवरुन गप्पा मारणे, म्हणजेच फेसबुक, व्हॉटसअप, हाईक अशा सोशल नेटवर्कवरुन चॅटींग करणे हेच चालते. यामध्ये ही तरुणपिढी आपला अत्यंत मोलाचा वेळ वाया घालवते. जर एखाद्या ठिकाणी मोबाईलला रेंज नसेल, काहीवेळा इंटरनेट चालू होत नसेल तर त्यांची चलबिचल होते. काय करु नी काय नको अशी अवस्था होते. यालाच 'फोबिया' असे म्हणतात. म्हणजेच मानसिक आजार होय. यामुळे तरुण पिढी आपले मानसिक संतुलन बिघडवून बसते.

तरुणपिढीने इंटरनेटचा वापर हा केला पाहिजे, करु नये असं माझं मत नाही. परंतु, त्याचा वापर कमी प्रमाणात म्हणजेच काही वेळाच्या मर्यादेपर्यंत केला पाहिले. चॅटींग करणे वाईट आहे असे म्हणता येणार नाही, त्यामुळे आपली मैत्री होते व ओळखी वाढतात. इंटरनेटचा वापर केल्यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यात घडणाऱ्या घटना काही क्षणात आपल्याला कळतात किंवा पाहता येतात. तसेच इतर गोष्टींचीही माहिती मिळते. इंटरनेटचा वापर अशा चांगल्या कामासाठी करावा.

जर आपण इंटरनेटचा वापर मर्यादित केला तर आपला वेळ असा वाया घालवत असेल तर आपला देश विकसित कसा होणार ? महासत्ता कसा बनणार ? जर दिवसातील समजा चार तास इंटरनेटसाठी वापरत असू तर लाखो तरुण किती वेळ वाया घालवत आहेत. याचा आपण आवर्जून विचार केला पाहिजे. त्यामुळे तरुणपिढीचा विकास होत नाही. इंटरनेटचा वापर सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत होतो. स्वतःच स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारत आहेत. ज्यामुळे ही तरुणपिढी प्रगतीच्या शिखरावर न राहता खाली अधोगतीकडे जात आहे.

* * *



# स्वातंत्र्याची ७० वर्षे

**प्रिया प्रकाश भुर्के**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

स्वातंत्र्याची ७५ वर्षे म्हणजे भारताच्या इतिहासाचे जणू सुवर्णपानच होय. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली. या ७५ वर्षाच्या कालावधीत भारताने प्रत्येक क्षेत्रात प्रगती केली आहे. भारताच्या विकासाची यशोगाथा म्हणजेच बदललेल्या भारताचे स्वरुप अभ्यासणे होय. प्राचीन ग्रंथांमध्ये प्रशासनाचे निकष सांगण्यात आले आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षाच्या कालावधीत विविध क्षेत्रात भारताने प्रगती केली आहे. यात पायाभूत सुविधा कृषि क्षेत्र, आर्थिक समावेशकता आणि वित्तीय सशक्तीकरण या विविध क्षेत्रात सरकारने अतिशय प्रभावी कामगिरी करुन भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. संपूर्ण कालावधीचा विचार करता भारताने प्रत्येक क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केली आहे. यांत कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय इ. क्षेत्रातही विलक्षण प्रगती केली आहे. स्वातंत्र्यानंतर भारताच्या विकासाची ध्येय धोरणे ही लोकशाही स्वरुपात संपूर्ण जनतेच्या हाती आली. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. या मतदानाच्या अधिकारामुळे जनतेला आपला प्रतिनिधी निवडता आला. त्यामुळे विकासाला चालना मिळाली.

भारताचा बदलता चेहरा हा स्थायी न बदलणाऱ्या पूर्वापार चालत आलेल्या रुपास आव्हान देत आहे. देशाचे पंतप्रधान प्रत्यक्ष आघाडीवर येवून नेतृत्व करीत आहेत. सरकारने ज्या नवीन कल्पना मांडल्या त्यात लोकांचा मनोपट बदलला. व्यावहारिक वर्तणूक बदलली. सध्याचा म्हणजेच अलिकडच्या काळाचा विचार केला तर सरकारने काळापैसा, बनावट चलन व भ्रष्टाचार यांना आळा घालण्यासाठी नोटाबंदीचा निर्णय घेतला. याचा सर्वात अधिक फायदा देशालाच झाला. भ्रष्टाचाराला आळा घातल्यामुळे रिझर्व्ह बँकेला व सरकारला कर दर व व्याज दर कमी करण्याची संधी मिळाली. गुंतवणूकीचे प्रमाण वाढले. या नोटाबंदीच्या निर्णयानंतर कॅशलेस व्यवहार करुन रोकड कमी वापरणारा समाज निर्माण होतोय. सध्याच्या काळात ऑनलाइन पेमेंटमुळे निर्माण होतोय. सध्याच्या काळात ऑनलाइन पेमेंटमुळे रोखीची गरज कमी होऊन व्यवहारांत पारदर्शकता येवू लागली. डिजिटल माध्यमांच्या वापरामुळेच राहणीमानात सुधारणा होऊ लागली आहे. प्रधानमंत्री जनधन योजनेमुळे गॅसचे अनुदान लोकांच्या खात्यात जमा होऊ लागलेय. हा संपूर्ण बदल स्वातंत्र्यानंतरच्या भारताचा आहे. म्हणजेच विविध योजना भारतात राबवून भारताचा कायापालट करण्याचे काम सरकार करते.

सरकारची प्रमुख 'मेक इन इंडिया' ही मोहिम भारताला उत्पादनाचे केंद्र बनविण्याचा विचार करतेय. यातून चांगले रोजगार व संधी, थेट परदेशी गुंतवणूक ही उद्दिष्टे साध्य करता येतात. 'मेक इन इंडिया' ही योजना सुरु केल्यापासून परकीय गुंतवणुकीत ४६टक्केंनी वाढ झाली आहे. ही गुंतवणूक म्हणजे स्नेही भारताची कहाणी आहे. सध्या भारताच्या करप्रणालीत सुद्धा बदल करण्यात आला आहे. म्हणजेच वस्तू व सेवा कर यामुळे वस्तू व सेवांना देशव्यापी बाजारपेठ मिळणार आहे. यामुळे करात वाढ होत असून आर्थिक वाढीला हातभार लागणार आहे. यामुळे सरकारी महसूल वाढणार असून रसद पुरवठाखर्च इनव्हेनटरी खर्च, करचुकवेगिरी कमी होणार आहे. यामुळे वस्तुंचे उत्पादन स्वस्त होणार असून एक देश, एक कर व एक बाजारपेठ हे स्वप्न साकार होणार आहे. हाच बदल देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करतो.

संपूर्ण भारताचा विचार केला तर या ७५ वर्षाच्या कालावधीत देशातील प्रत्येक क्षेत्रात अमूलाग्र असे बदल

घडून आलेत. विशेष म्हणजे जातीय भेदभाव कमी झालेत अस्पृश्यतेचे निवारण झाले. तसेच हुंडा पद्धती, बालविवाह, सती जाणे या प्रथा बंद करण्यात आल्या. यामुळे देशात आर्थिक प्रगती होऊ लागली. भारताचे कार्यक्षम अर्थव्यवस्थेचे स्वप्न साकार करण्यासाठी डिजिटल इंडिया मोहीम सुरु करण्यात आली. तसेच स्वच्छभारत अभियान ही मोहीमसुद्‌धा राबवण्यात आली. तसेच कृषि क्षेत्रात अनेक योजना राबवण्यात येत आहेत. यात प्रामुख्याने प्रधानमंत्री सफल योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इ.योजना राबवण्यात येत आहेत.

स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांच्या कालावधीत सध्याचे देशाचे नेतृत्त्व हे व्यावसायिक कार्यशैलीवर विश्वास ठेवणारे आहे. तसेच देशाच्या व्यवहारातही पारदर्शकता आली आहे. अनेक वेळा भारताच्या घटनापत्रकातही बदल करण्यात आला. तसेच भारताचे परराष्ट्र धोरणातही अनेक वेळा बदल करण्यात आला. आपल्या भारताची पूर्ववत कहाणी सांगण्यास जर सुरुवात केली तर त्यावर एक ग्रंथ तयार होईल. भारतातील काही घटना या नवीन ऊर्जाशक्ती निर्माण करणाऱ्या आहेत. या घटनांचा सविस्तर अभ्यास करणे म्हणजे भारताच्या इतिहासाला उजाळा देण्यासारखेच आहे. या स्वतंत्र भारताचा थोडासा इतिहास लिहिण्याचे भाग्य मला मिळाले. भारतात जन्म घेऊन भारताच्या इतिहासाचा सखोल अभ्यास करण्याचे भाग्य मला लाभले. याचा मला अभिमान आहे.




**पालक सभेप्रसंगी मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल**

**पालक सभेप्रसंगी मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक श्री.नरेश पाचलकर**





# स्त्रीभ्रूण हत्या : एक सामाजिक समस्या

**रिचा सुभाष शिंदे**
प्रथम वर्ष, वाणिज्य

मुलगा वंशाचा दिवा असतो आणि मुलगी परक्याचे धन या विचार प्रक्रियेत चालणाऱ्या समाजामुळे स्त्रीभ्रूण हत्येचे प्रमाण वाढीस लागले असे म्हणण्यास हरकत नाही. एकीकडे मुलगाच हवा या हट्टापुढे मुलगी नकोशी वाटत आहे आणि या नकोशीला जन्म घेण्यापूर्वीच गर्भातच ठार करण्याच्या क्रियेला खूपच गती मिळाली. याचा परिणाम असा झाला की, वैद्यकीय क्षेत्रातील लोक या बाबीतून लाखो -करोडो रुपये जमवू लागले आणि बंगल्यावर बंगले बांधू लागले. पण दुष्कर्म शेवटी दुष्कर्मच असते. त्या केलेल्या दुष्कृत्याचे फळ भोगावेच लागते. याचे उत्तम उदाहरण म्हणून डॉ. सुदाम मुंडे यांच्या प्रकरणाकडे पाहिल्यावर लक्षात येते.

स्त्रीभ्रूण हत्या का केली जाते  या प्रश्नाची उकल शोधून काढणे आणि त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. भारत देशात फार पूर्वीपासून ज्या रुढी, परंपरा आणि चालिरिती आहेत. त्यानुसार लोक आजही आपल्या प्रथेनुसार चालतात. विवाह नावाची परंपरा आजही अगदी त्याच पद्धतीने संपन्न केली जाते. मुलगी उपवर झाली की आई बाबांना तिच्या लग्नाची काळजी लागते. कधी एकदा तिचे हात पिवळे करु आणि कधी एकदा त्या ऋणातून मुक्त होऊ याची काळजी पालकांना लागते. यांत त्यांची काहीच चूक नाही. कारण मुलींची जात फारच नाजूक असते. पावलोपावली तिची जपणूक करण्याची जबाबदारी पालकांची असते. मुलींच्या पालकांना जेवढी काळजी असते तेवढी काळजी मुलांच्या पालकांना नसते. जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे, या म्हणीनुसार ज्यांना मुलगी आहे त्यांनाच या दुःखाची जाणीव होते. उपवर झाल्यापासून वडिलांची धावपळ चालू होते. चांगला मुलगा शोधणे आणि लग्न जमविणे, लग्न जमविताना होणारा त्रास सर्वांना माहितच आहे. वरपक्षाला वरदक्षिणा म्हणून हुंडा देणे, रुखवतामध्ये घरगुती वस्तू देणे, लग्नात सर्वांची योग्य ती काळजी घेऊन धुमधडाक्यात लग्न लावणे या सर्व कार्यक्रमात वधूपित्याची कंबरच मोडली जाते. अशा या प्रक्रियेमुळे कोणालाही मुलगी नकोशी वाटत असेलही कदाचित याचा विचार करुन समाजातून हुंडा पद्धत हद्दपार होणे अत्यावश्यक आहे.

शिक्षणाने सर्वांचा विकास होतो. शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलींच्या शिक्षणावर विशेष लक्ष द्यावे. मुलगी स्वतःच्या पायावर उभी राहीपर्यंत तिच्या लग्नाचा विचार न करता तिला शिकू द्यावे. तिला सुद्धा रोजगार मिळवून काम करण्याची संधी द्यावी आणि तिच्या हातात चार पैसे खेळतील याकडे पालकवर्गाने लक्ष द्यावे. मुलगी ही डोक्यावरील ओझे नसून ती आपल्या घराची, समाजाची, गावाची, देशाची ज्योत आहे. जिच्यामुळे अनेक ज्योती पेटवल्या जातात आणि सर्वत्र लख्ख प्रकाश पसरतो. समाजात स्त्रियांना सन्मान देत राहिल्यास आणि पदोपदी त्यांना हिम्मत देत राहिल्यास त्यांचे महत्त्व वाढत राहील. याची सुरुवात मात्र आपल्यापासून, आपल्या घरापासून करणे आवश्यक आहे .

सर्व गोष्टीचा विचार केला तर मुलीचे महत्त्व स्त्रियांची जिद्द आपल्याला समजते, तर मग मुलीला जन्म द्यायचा की नाही हे आता आपण ठरवलं पाहिजे.

* * *

**- विचारधन -**

सज्जन माणूस म्हणून जन्माला येणे, हा योगायोग आहे; परंतु सज्जन म्हणून मरणे, ही आयुष्यभराची कमाई आहे.



**ग्रंथालय विभागामार्फत आयोजित**
**निबंध स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्राप्त निबंध**

# वाचन संस्कृती आणि आजचा विद्यार्थी

**सलोनी संजय नांदलस्कर**
प्रथम वर्ष, वाणिज्य

वाचनाचे महत्त्व आपण आपल्या शालेय जीवनापासून ऐकत आलोय. प्रत्येकजण आपल्याला वाचन किती महत्वाचं आहे हे सांगत असतो. परंतु आपण खरचं वाचन करतो का ? वाचायला आवडते का ? वाचून काही फायदा होतो का ? लोक वाचनाला एवढे महत्व का देतात ? यासारखे अनेक प्रश्न आपल्या मनात येतात. पण आपल्याला हे माहित आहे का ? वाचनामुळे आपल्या मेंदूला चालना मिळते. नवीन शब्दांमुळे त्याची प्रगती होत असते. वाचनामुळे आपल्याला नवनवीन माहिती मिळते. मानवाला लाभलेली सर्वांत मोठी देणगी म्हणजे ज्ञान होय. ज्ञानाचे महत्व सांगताना महात्मा फुले म्हणतात.

''विद्येविना मति गेली । मतीविना नीति गेली ।
नीतीविना गति गेली । गतीविना वित्त गेले ।।
इतके अनर्थ एका अविद्येने केले.''

मानवी जीवनात विद्येचे महत्व अनन्यसाधारण आहे हे यावरुन आजच्या विद्यार्थ्यांना समजते. परंतु या विद्येसाठी वाचनाची गरज आहे हे समजते. वाचन ही एकमेव गोष्ट आहे की, जी माणसाला सज्ञानी, विवेकी बनवते.

' वाचाल तर वाचाल' ही म्हण आजच्या घडीला किती समर्पक आहे. हे आपण सर्वच जाणतो. आजच्या विद्यार्थ्यांमध्ये असलेले ज्ञान ही त्याची फार मोठी शक्ती आहे. या शक्तीच्या सहाय्याने ते सुबुद्ध आणि प्रगल्भ तर होतातच. परंतु त्यांच्या कार्यसंस्कृतीवर सुद्धा त्याचा प्रभाव पडतो. मागच्या पिढीपेक्षा आताच्या पिढीच्या विद्यार्थ्यांचे वाचन अगदी अल्प झाले आहे. असे आपण सगळीकडेच पाहतो. आणि हे सत्य ही आहे. कारण वाचनाव्यतिरिक्त रेडिओ, टेलिव्हिजन, कम्प्युटर, चित्रपट, नाटके इतर मनोरंजनाची साधने खूप वाढली आहेत की, या सर्व गलबत्यात विद्यार्थ्यांना वाचनासाठी निवांतपणा मिळेनासा झाला आहे.

भूतकाळाशी वर्तमानाची सांगड घालण्याचे सामर्थ्य ग्रंथामध्ये असते. पण त्यासाठी हे ग्रंथ वाचणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या विद्यार्थ्यांना ग्रंथ, कादंबऱ्या, काव्य इ. पुस्तके वाचण्यामध्ये काही रुची नसते. याचे मूळ कारण म्हणजे आजचे शिक्षण पुस्तकी बनले आहे.विद्यार्थी हे परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळवण्यासाठी धडपडत असतात. त्यांच्या समोर एकच ध्येय ठेवले जाते. जास्तीत जास्त अभ्यास करुन चांगल्या गुणांनी पास होणे व चांगल्या जॉबला लागणे एवढेच ध्येय त्यांच्यासमोर असते. पण जगाच्या विविध भागांतील संशोधकांची चरित्रे आपण वाचली तर आपल्याला त्यांचे जीवन समजेल. त्यांच्यातील एक सवय समान होती आणि ती म्हणजे वाचनाची ! वाचनामुळे माणूस आपले ज्ञान अद्ययावत ठेवू शकतो.

वाचनाच्या सवयीमुळे व्यक्तिमत्व संपन्न होते. सतत वाचन करणारी व्यक्ती आपली मते मुद्देसुदपणे मांडू शकते. ज्या वक्तयांचे वाचन भरपूर असते त्यांचे भाषण श्रवणीय असते. कथा, कादंबऱ्या, नाटके, काव्य यांच्या

वाचनाने मनोरंजन होतेच. शिवाय नाटके आजही जगभर मोठ्या आवडीने वाचली जातात. थोरांची चरित्रे आत्मचरित्रे ही आजच्या विद्यार्थ्यांनी वाचली पाहिजेत. आपल्या जीवनातील अडचणींवर मात करण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांना अशा वाचनातून मिळते.

वाचनाने माणूस चिंतनशील बनतो. आजकाल दूरदर्शनचा प्रसार विलक्षण झपाट्याने झाला आहे. त्यामुळे माणसाची वाचनाची सवय खूपच कमी झाली आहे. दूरदर्शनवरचे कार्यक्रम माणूस एकापाठोपाठ एक पाहतो आणि विसरुन जातो. याउलट एखादे चांगले पुस्तक वाचले तर ते आपल्याला विचार प्रवृत्त करते. आपण त्यावर चिंतन करीत राहतो. असा आहे हा वाचनाचा महिमा. आजच्या विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त वाचन केले पाहिजे वाचनामुळे त्यांच्या ज्ञानात सतत भर पडत असते.

पुस्तके अथवा ग्रंथ यासारखा दुसरा गुरू नाही. असे म्हटले जाते की मनोरंजक आणि वैचारिक असे साधारणपणे पुस्तकाचे दोन प्रकार करता येऊ शकतात. मनोरंजनातून संदेश देणारी, वाचकांच्या भावनेला हात घालणारी पुस्तके ही लोकप्रिय असतात. या उलट बुद्धीला आव्हान देणारी, वाचकांच्या तर्कशक्तीला जोखणारी पुस्तके चोखंदळ वाचकांमध्ये लोकप्रिय ठरू शकतात. प्रत्येक पिढीची आवड - निवड ही वेगळी असते. त्यामुळे काळाच्या कसोटीवर आणि वाचकांच्या अभिरूचीनुसार टिकणारी पुस्तके ही चिरकाल आनंद देणारी असतात.

वाचनाची आवड असणारे वाचक सर्व प्रकारची पुस्तके विकत घेऊन वाचू शकत नाहीत. अशावेळी त्यांच्या मदतीला येते ते ग्रंथालय. या ग्रंथालयातील ग्रंथपाल हा मनमिळावू, सहकारी वृत्तीचा असेल तर वाचकाला हवे ते पुस्तक सहजतेने उपलब्ध होऊ शकते. यशस्वी झालेल्या अनेक व्यक्तींच्या जीवनात ग्रंथालयांनी, पुस्तकांनी मोलाची भूमिका बजावली आहे.

पूर्वीचा काळ असा होता की, पुस्तकाचे वाचन करणे. संग्रह करणे हे वैचारिक श्रीमंतीचे एक लक्षण समजले जाई. पुस्तकाचे आदान प्रदान केले जाई. कोणी कोणती पुस्तके वाचली त्यांतून काय मिळाले. याविषयी आपापसात चर्चा-वादविवाद व्हायचे. चांगल्या कथा -कांदबऱ्या वाचताना वाचक एका भावनिक स्थितीत हरवला जायचा. काव्य, कथा, नाट्य, प्रवासवर्णन, ललित, वैचारिक ग्रंथ यांच्या वाचनाने रसिक वाचक आणखी समृद्ध होत जायचा. विविध ग्रंथप्रकाशने, नियतकालिके, मासिके, वृत्तपत्रांवर अक्षरशः उड्या पडायच्या.

वाचन संस्कृती लोप होत आहे. असे म्हणताना लेखक प्रकाशकांचीही काही नैतिक जबाबदारी असतेच. काळ बदलत चालला आहे. काळाच्या बदलत्या प्रवाहाबरोबर लेखक - प्रकाशकांनीही बदलायला हवे. सध्या इंटरनेट सारख्या माध्यमांचा चांगल्या प्रकारे वापर करुन वाचन करुन वाचन संस्कृती वाढवता येईल. इंटरनेट आदी गोष्टी हे वाचन संस्कृतीवर आक्रमण न मानता ती वाचन व्यवहाराला लाभलेली देणगी आहे या भावनेने तिचा वापर करुन घेता येऊ शकेल. कारण या आधुनिक प्रसार माध्यमांद्वारे गद्य - पद्य स्वरुपातील साहित्य उपलब्ध झाले आहे. आजचा विद्यार्थी हा अधिक प्रगल्भ आहे, कर्तबगार आहे, विचारवंत आहे. महत्त्वाकांक्षी आहे. आपल्या हक्कांविषयी तो फार जागरुक आहे. आजचा विद्यार्थी हा आपल्या स्वतंत्र लोकशाही राष्ट्राचा आदी नागरिक आहे. वयाच्या अठराव्या वर्षीच त्याला मतदानाचा अधिकार मिळाला आहे. म्हणून विद्यार्थीदशेतच त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा योग्य विकास होणे आवश्यक आहे. त्याला स्वतंत्रणे निर्णय घेता आला पाहिजे. यासाठी त्याला योग्य शिक्षण व नियमित वाचन हे गरजेचे आहे.

अलिकडच्या काळात आपल्या मोबाईल फोनवरसुद्धा विशिष्ट नंबर फिरवल्याबरोबर आजच्या घडीला जगातील कानाकोपऱ्यात घडणाऱ्या घटकांची अद्ययावत माहिती प्राप्त होते. जुन्या पिढीपाशी ही अद्ययावत साधने नसल्यामुळे जास्तीत जास्त वाचनातून ते आपली ज्ञानलालसा भागवित असतात. परंतु जुन्या पिढीमध्ये शिक्षणाचा फार प्रसार झालेला नव्हता. जवळ जवळ ८० टक्के च्या वर जनता निरक्षरच होती. त्यामुळे वाचनाचा मक्ता काही

सुधारलेला सुशिक्षित समाजापुरताच सिमीत होता. आता शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पाहोचले आहे. परंतु इतर प्रसारमाध्यमांच्या बाहुल्यामुळे प्रत्यक्ष वाचन आणि तेही कसदार वाचन निश्चितच कमी झालेले आहे.

भारतीय परंपरेत आपल्या प्राचीन संस्कृतीत ज्ञानाचा अमर्याद खजिना, निरनिराळ्या पोथ्या, पुराणे, धार्मिक ग्रंथ यात साठवलेला आहे. पूर्वीच्या पिढीत मूठभर शास्त्री पंडितांच्या हाती हे ज्ञानभांडार होते. ब्रिटिश काळात इंग्रजी शिक्षणाच्या संस्कारातून प्रबोधन काळाची मुहूर्तमेढ रोवली गेली. नवशिक्षणातून ज्ञानाची नविन खिडकी उघडली गेली आणि पाश्चात्य तत्वज्ञान, विज्ञान, संस्कृती, इतिहास आणि परंपरा यांची ओळख आम्हाला प्राप्त झाली. त्याचा आपल्या जीवनशैलीवर प्रभाव पडू लागला. पाश्चात्यांचे अनुकरण करण्याची वृत्ती आम्ही घेतली. संस्कारांची मातब्बदारी आम्हाला वाटेनाशी झाली. अर्ध्या हळकुंडाने पिवळे होवून आम्ही त्यांच्या जीवनशैलीची भ्रष्ट नक्कल करु लागलो. त्यातून आपल्या संस्कृतीमधील काय मूल्यवान आहे याचे भान आम्ही हरवून बसलो व त्यांच्या संस्कृतीतील मूल्यवान गोष्टी स्विकारण्याचे आम्ही टाळू लागलो. चित्रे, ब्लॉग प्रसिद्ध करता येईल. या दृष्टीने ही माध्यमे उपयुक्त ठरतील. मराठीत ई साहित्य प्रतिष्ठान च्या संस्थेने पीडीएफ स्वरुपात मराठी पुस्तके विनामूल्य त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिली आहेत. ती पुस्तके आपण डाऊनलोड करुन आपल्या मोबाईलवर वाचू शकतो. पुस्तकांचा संग्रहही करु शकतो. इंटरनेट हे माध्यम पुस्तक प्रकाशनापेक्षा स्वस्त जलद आणि प्रभावी माध्यम आहे इंटरनेटवर प्रसिद्ध केलेले साहित्य काही मिनिटात जगभरच्या वाचकांना उपलब्ध होऊ शकते.

अलिकडे हा वाचन संस्कारच घराघरातून हरवला आहे. अगदी बालवर्गापासून परीक्षा आणि त्यात मिळणारी टक्केवारी यालाच अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त अन्य वाचन करण्याची विद्यार्थ्यांची प्रवृत्तीच नष्ट झाली आहे. पालकच याबाबतीत उदासिन झाले आहेत. शाळा, परीक्षा, शिकवणी वर्ग आणि डॉक्टर किंवा इंजिनीअर बनण्याची दुर्दम्य आकांक्षा त्यातून निर्माण होणारी जीवघेणी स्पर्धा, त्या स्पर्धेच्या दृष्टचक्रात आताचा पाल्य आणि पालक दोघेही अडकले आहेत. त्यातून वेळ काढून परीक्षा निरपेक्ष निखळ आनंद देणारे वाचन करण्यास त्यांना हरकत नाही.

वाचन समृद्ध असेल म्हणजे लेखनाचीही प्रवृत्ती प्रबल होते. कल्पनाशक्तीला वाट सापडते. थोडक्यात माणसाला माणूस म्हणून बनण्यासाठी ज्यांनी, विवेकी, कर्तृत्ववान तसेच आत्मविश्वास बनण्यासाठी वाचन ही काळाची गरज आहे.

' वाचाल तर वाचाल' असा मंत्र सांगितला जातो, ते उगीच नाही. बौद्धिक आणि सामाजिक विकासासाठी ग्रंथ आणि ग्रंथालयांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसूत्रीचा केवळ उक्तीतून उद्बोधन होते ती कृतीतून प्रत्ययास आणण्याचे कार्य पुस्तकांच्या रुपाने होऊ शकते. आजच्या पिढीवर असे संस्कार करण्यासाठी पुस्तकांशिवाय दुसरे प्रभावी माध्यम नाही.

* * *

## - विचारधन -

आपल्या व्यक्तिमत्त्वातील गुणदोष अंतर्मनाला विचारा म्हणजे कळेल. यामध्ये खऱ्या अर्थाने जीवनाचा विकास आपण साधू शकाल. व्यक्तिमत्त्वाची जडणघडण स्वतःला ओळखण्यात आहे हे विसरुन चालणार नाही.

– स्वामी विवेकानंद

कै. हरी तुकाराम खापणे आंतरमहाविद्यालयीन
राज्यस्तरीय निबंध स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्राप्त निबंध

# भारतीय संविधान आणि आरक्षण

**प्राजक्ता प्रकाश बाणे**
तृतीय वर्ष, वाणिज्य
आबासाहेब मराठे महाविद्यालय, राजापूर

ध्येयाचे एकच वेड लागलेली कर्तृत्त्ववान माणसे कोणत्याही सिद्धतेची वाट पाहत नाही. आपल्या स्वप्नांचा, आपल्या अंतस्थ स्फूर्तीचा तो सारखा पाठलाग करतात. जगाकडून दुजोरा मिळो न मिळो त्यांना आपली स्वप्ने डोळयासमोर दिसतात. कसल्याही प्रतिकाराला न जुमानता वेळ पडल्यास अन्न पाण्यासाठी न थांबता ते परिस्थितीच्या महासागरात मजल मारीत असतात. आपली स्वप्ने, आपली ध्येय आपल्या कल्पना प्रत्यक्ष जगात वावरताना दिसेपर्यंत त्यांच्या सर्व शक्ति केंद्रिभूत झालेल्या असतात. शेवटी त्यांचे ध्येय त्यांना कार्यरुपाने दिसू लागते. ज्यांनी आपले ध्येय कर्तृत्त्वाने व परिश्रमाने सिद्ध करुन दाखविले असे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

भारताच्या घटना समितीचे सभासद, मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार मानले जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपन्न आणि बहुआयामी व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरही ज्ञानसाधनेसाठी अखंड परिश्रम करीत आणि काटकसरीने राहत. लंडनला असताना त्यांचा मासिक खर्च आठ पौंड एवढाच होता, तरी प्रकृती व मन दोन्हीही उल्हासित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ग्रंथ, विनय व शील या तीन दैवतांची पूजा केली. गौतम बुद्ध, संत कबीर, महात्मा फुले, यांना पूज्य मानले. या महामानवाने जगातील अनेक देशाच्या संविधानाचा अभ्यास करुन चांगल्या गोष्टींचा स्विकार केला. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वाच्या आधारे सौंदर्यशाली, वैभवसंपन्न देशाची एकता व अखंडता कायम ठेवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ३० ऑगस्ट १९४७ ला मसुदा समितीचे अध्यक्ष बनविले. अध्यक्ष बनविण्यासाठी त्यांची विद्वत्ताच कारणीभूत होती. प्रतिकृतीची पुरेशी काळजी न करता जगातील अनेक देशांच्या घटनेचा तुलनात्मक अभ्यास करुन भारतीय राज्यघटनेत ३९५ कलमे आणि ०८ परिशिष्टे समाविष्ट केली . दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना स्वीकृत केली आणि २६ जानेवारी १९५० पासून अंमलात आली. घटना पूर्ण होण्यासाठी २ वर्षे ११ महिने आणि १७ दिवस लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या 'घटने' ला शोषितांचा मुक्तीचा जाहिरनामा म्हणाले, कारण अनेक वर्षापासून माणसाला माणूस म्हणून जगता आले नव्हते, पण आज घटनेने माणूस म्हणून जगण्याचे अधिकार दिले आहेत. आपला माजी विद्यार्थी स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचा हा शिल्पकार झाला म्हणून कोलंबिया विद्यापीठाने डॉ. आंबेडकरांचा संस्मरणीय सन्मान केला.

आपला भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे. ह्या विविधतेतील एकता टिकविली आहे. ती आपल्या संविधानाने म्हणूनच २६ नोव्हेंबर हा दिवस 'घटना दिवस' अथवा 'संविधान दिवस म्हणून साजरा केला जातो. २६ नोव्हेंबर संविधान दिनाच्या निमित्ताने आपल्याला पुन्हा एकदा आठवण होते, की हा आपला भारत देश कोटी - कोटी लोकांनी, श्रमिकांनी, शेतकऱ्यांनी बनविला आहे. महान कायदेपंडिताने अहोरात्र मेहनत करुन

योग्य ते फेरबदल करुन भारताचे संविधान म्हणजे राज्यघटना तयार केली. भारतीय संविधानाच्या निर्मितीमधील या योगदानामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणतात. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' याप्रमाणेच अनेक बैठकानंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारला.

संविधानामुळे शासनाचे अधिकार व त्यावरील मर्यादा स्पष्ट होतात. जनतेचे स्वातंत्र्य सुरक्षित राहते. जनतेचा राज्यकारभारातील सहभाग वाढतो. म्हणून संविधानानुसार राज्यकारभार केल्यास लोकशाही बळकट होते. भारताच्या संविधान सभेत २९९ सदस्य होते. या सभासदांमध्ये सर्व जातीधर्मांचे, विविध भाषा बोलणारे व विविध व्यवसाय करणारे लोक होते. संविधान सभेत डॉ. राजेंद्रप्रसाद, पं. जवहरलाल नेहरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद, सरोजिनी नायडू, जे.बी.कृपलानी, राजकुमारी अमृत कौर, दुर्गाबाई देशमुख, हंसाबेन मेहता असे अनेक मान्यवर सदस्य होते. बी.एन. राव. या कायदेतज्ज्ञांची संविधान सभेचे कायदेविषयक सल्लागार म्हणून नेमणूक झाली होती.

संविधान सभेचे कामकाज - संविधान सभेची पहिली बैठक ९ डिसेंबर, १९४६ रोजी झाली. डॉ. राजेंद्र प्रसाद हे संविधान सभेचे अध्यक्ष होते. संविधान सभेचे कामकाज त्यांच्या देखरेखेखाली पार पडले. संविधान सभेच्या कामात सुसूत्रता यावी, यासाठी वेगवेगळ्या समित्या तयार करण्यात आल्या होत्या. उदा. राष्ट्रध्वजाविषयीची समिती, मूलभूत हक्काविषयक समिती इत्यादी. या समित्यांनी त्यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या विषयांचा सखोल अभ्यास करुन अहवाल तयार केले. या अहवालांतील शिफारशी ध्यानात घेऊन संविधानाचा मसुदा तयार करण्यात आला. संविधानाचा मसुदा तयार करण्याचे काम मसुदा समितीकडे सोपवण्यात आले. संविधान सभेच्या सूचनांनुसार मूळ मसुद्यात फेरबदल करण्याचे महत्वाचे कामसुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच केले

प्रत्येक व्यक्तीला आपली प्रगती व्हावी आणि आपल्या गुणांचा विकास व्हावा असे वाटत असते, त्यासाठी आपले मत व्यक्त करण्याचे , मुक्तपणे संचार करण्याचे, व्यवसाय निवडीचे आणि या प्रकारची अन्य स्वातंत्र्ये तिला असणे आवश्यक आहे.

संविधानाने अस्पृश्यता प्रतिबंधित केली आहे आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या सुधारणांसाठी विशेष तरतूद करण्यासाठी राज्यसरकारला वचनबद्ध केले आहे. गेल्या काही वर्षांत, सकारात्मक कार्यवाहीसाठी श्रेण्या, ज्यांना सकारात्मक भेदभाव देखील म्हटले जाते, ते ओबीसींपेक्षा जास्त वाढविले गेले आहेत. आरक्षण संविधान, कायदेशीर कायदे आणि स्थानिक नियम आणि नियमांद्वारे नियंत्रित केले जाते. एससी एसटीएस आणि ओबीसी आणि काही राज्यांमध्ये बीसी (एम) नामक श्रेणी अंतर्गत मुस्लिमांमध्ये मागासवर्गीय वर्ग आरक्षणाच्या धोरणांचे प्राथमिक लाभार्थी आहेत.

भारतातील आरक्षण प्रणालीचा प्राथमिक उद्देश वंचित समुदायांचा सामाजिक आणि शैक्षणिक दर्जा वाढविणे आणि त्यांच्या जीवनात सुधारणा करणे आहे. भारत सरकारला विश्वास होता की ज्यांना सामाजिक व आर्थिक स्त्रोतांकडून ऐतिहासिकरित्या प्रवेश नाकारला गेला आहे त्यांच्यासाठी फायदे देणे महत्वाचे आहे. जेणेकरुन त्यांना आजीविका स्थापन करण्याची संधी मिळते.

काही विशिष्ट जाती आणि इतर समुदायांना अनुकूल असलेल्या कोटा प्रणाली स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटीश भारताच्या अनेक भागात आढळून आल्या. उदाहरणार्थ, १८८२ आणि १८९१ मध्ये अनेक प्रकारचे सकारात्मक भेदभाव केले गेले. कोल्हापूरच्या रियासत असलेल्या महाराजांनी ब्राह्मण आणि मागासवर्गीय वर्गाच्या बाजूने आरक्षण सुरु केले, ज्यापैकी बरेच १९०२ मध्ये सक्ती केली. त्यांनी प्रत्येकास मोफत शिक्षण दिले आणि त्यांच्यासाठी हे सुलभ व्हावे यासाठी अनेक वसतिगृहे उघडली. अशाप्रकारे शिक्षित लोक योग्यरित्या नियोजित होते याची त्यांनी खात्री केली आणि त्यांनी वर्ग-मुक्त भारत आणि अस्पृश्यता निर्मूलनासाठी आवाहन केले.

१९०२ च्या त्याच्या मागण्यांनी मागास समुदायांसाठी ५० टक्के आरक्षण तयार केले.

ब्रिटीश राज्याने १९०९ च्या भारत सरकारच्या कायद्यातील आरक्षणाचे घटक सादर केले आणि स्वातंत्र्यापूर्वी इतर अनेक उपाययोजना करण्यात आल्या. जून १९३२ च्या राऊंड टेबल कॉन्फरन्समधून उद्‌भवलेले महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे जेव्हा ब्रिटनचे पंतप्रधान रामचे मॅकडॉनल्डस यांनी सांप्रदायिक पुरस्कार प्रस्तावित केला. त्यानुसार मुसलमान, सिख, भारतीय ख्रिश्चन, अँग्लो-इंडियन, आणि युरोपियन. बहुसंख्य एस.सी./एस.टी. जमातींशी संबंधित उदासीन वर्गांना मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी जागा देण्यात आल्या होत्या, ज्यामध्ये ते फक्त मतदान करु शकले होते, तरीही ते इतर जागांवरही मतदान करु शकले.

सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीय वर्गाच्या परिस्थितीचे आकलन करण्यासाठी मंडळ आयोगाची स्थापना १९७८ मध्ये करण्यात आली. आयोगाकडे ओबीसींसाठी अचूक लोकसंख्या नव्हती आणि म्हणूनच १९३१ च्या जनगणनेनुसार डेटाचा वापर केला जात असे. त्यामुळे समूहांची लोकसंख्या ५२ टक्के होती. सन १९८० मध्ये आयोगाच्या अहवालात अशी शिफारस केली गेली की, २७ टक्के ओबीसींसाठी राखीव कोटा केंद्र सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या सेवा आणि सार्वजनिक क्षेत्रातील संस्था यांच्या बाबतीत लागू होईल. उच्च शिक्षणाच्या संस्थांमध्ये प्रवेशासाठी समान बदल करण्याची मागणी केली गेली आहे. त्याशिवाय जेथे राज्यांपेक्षा आधीच अधिक उदार आवश्यकता होती. १९९० च्या दशकापर्यंत केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये शिफारसी लागू करण्यात आल्या होत्या.

भारतात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, बीसी, ओबीसी, महिला, मुसलमान आणि इतर अल्पसंख्यकांसाठी शिष्यवृत्ती किंवा विद्यार्थी मदत उपलब्ध आहे. भारतात केवळ ०.६ टक्के शिष्यवृत्ती किंवा विद्यार्थी मदत योग्य सेवा त्यांच्या योग्यतेवर आधारित आहे, त्यामध्ये ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कारणांमुळे रोजगाराच्या आणि शिक्षणामध्ये उपरोक्त श्रेणींमध्ये अपुरे प्रतिनिधीत्व दर्शविले गेले आहे.

२९ नोव्हेंबरपर्यंत महाराष्ट्रामध्ये आरक्षण -

| | |
|---|---|
| अनुसूचित जाती (एससी) - १३ टक्के | अनुसूचित जमाती (एसटी) - ७ टक्के |
| इतर मागासवर्गीय (ओबीसी) - १९ टक्के | विशेष मागासवर्गीय (एसबीसी) - २ टक्के |
| विमुक्त जाती - ए - ३ टक्के | नाममात्र जनजातीय - बी - २.५ टक्के |
| नाममात्र जनजातीय - सी - ३.५ टक्के | नाममात्र जनजातीय - डी- २ टक्के |
| सामान्य - ३२ टक्के | सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय (एसईबीसी) - १६ टक्के |

आज सगळीकडे अंधार पसरलेला आहे. अंधाराच्या भिंती, अंधाराचच छप्पर, रस्ता काळोखाने माखलेला, नेत्रात आणि गोत्रात अंधारच मुरलेला. दिस काळे, रात्र काळी, साऱ्या राष्ट्राला काळोखाचाच विळखा. परंतु मित्रहो, सगळीकडून अंधारुन आले असले तरी स्वतःलाच पेटवून प्रकाश निर्माण करणारी आण्णा हजारे, बाबा आमटे, मेधा पाटकर, सिंधूताई सपकाळ यांसारखी माणसं या राष्ट्रात उभी आहेत आणि हीच खरी आमची या साठी वर्षांतील कमाई आहे. या कमाईच्या आधारावरच आजच्या तरुणाईने जगासमोर आपल्या राष्ट्राची नवलाई उभी करावी ! एवढीच अपेक्षा करते.

भारत हा तरुणांचा देश आहे. फार मोठी मानवी शक्ती या देशाला लाभली आहे. ती शक्ती फालतू कामात वाया दवडू नये. त्यांची शक्ती चांगल्या कामासाठी खर्च झाली पाहिजे तरच देशाचे भवितव्य उज्ज्वल होईल. देशाची लोकसंख्या किती आहे, यावर देशाचे भवितव्य अवलंबून नाही, तर देशातील किती लोक चारित्र्यसंपन्न, कर्तबगार आहेत यावर देशाचे भवितव्य अवलंबून आहे, हे सिद्ध करण्यासाठी तरुणांनी डॉ. आंबेडकरांची प्रेरणा घ्यावी.

* * *



" बाधाएँ आती हैं आएँ
घिरें प्रलय की घोर घटाएँ
पाँवों के नीचे अंगारे
सिर पर बरसें यदि ज्वालाएँ
निज हाथों में हँसते-हँसते
आग लगाकर जलना होगा
क़दम मिलाकर चलना होगा "

- अटल बिहारी वाजपेयी

# हिंदी विभाग

**विभागीय संपादक - प्रा. एस. एस. धोंगडे**

# हिंदी विभाग


| सूची | लेखक / कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| **लेख** | | |
| १) विज्ञान के चमत्कार | सायली महोदव गांगण | ८९ |
| २) भारतीय किसान | पंकज प्रभाकर बांबरकर | ९१ |
| ३) समय का सदुपयोग | सलोनी संजय नांदलस्कर | ९३ |
| **कविता** | | |
| १) फूलवाली | सायली महादेव गांगण | ९५ |
| २) हमारा अपना बन | नम्रता प्रमोद गांगण | ९५ |
| ३) माँ | प्रथमेश प्रकाश आंबेरकर | ९६ |
| ४) माँ की ममता | मयुरी उदय कोलते | ९६ |
| ५) मै जीना चाहती हूँ | प्राजक्ता प्रकाश हरळकर | ९७ |
| ६) बेटी | मिसबा मुस्ताक फकीर | ९७ |
| ७) दोस्त | अंकिता नारकर | ९८ |
| ८) बेटी युग | कांचन सुधाकर गुरव | ९८ |
| ९) बेटी | रतन रमेश गुरव | ९९ |
| १०) तेरी यादे | हर्षद भरत खावडकर | ९९ |
| ११) चुनाव | नेहा ठाकूर | १०० |
| १२) पहले दोस्ती फिर प्यार | रिचा सुभाष शिंदे | १०१ |
| १३) सोच | देविका प्रमोद पाटील | १०२ |



# विज्ञान के चमत्कार

**सायली महादेव गांगण**
प्रथम वर्ष, वाणिज्य

**विज्ञान क्या है ?**

विज्ञान के चमत्कार को हम अपने आसपास हर रोज हर वक्त देखते है हम अपनी मॉडर्न लाइफ की कल्पना बिना विज्ञान के सोच भी नहीं कर सकते । विज्ञान ने दुनिया के हर क्षेत्र में काम किया है ।विज्ञान के गिफ्ट को हर समय अपने साथ लिए घूमते है । चिकित्सा के क्षेत्र में विज्ञान ने मानव कष्ट को कम कर दिया है । विज्ञान ने अंधे को आँखे दी, बहरे को कान, लूले को हाथ - पैर दिए विज्ञान ने स्वास्थ व जीवन को नयी दिशा दी है । हार्ट ट्रान्सप्लांट किडनी बदलाव, एक्सरे, व्हेंटिलेटर विज्ञान के चिकित्सा को जीवनदान जैसे है ।



**यातायात -** विज्ञान ने अद्‌भूत मशीने बनाई है, जिससे हम इन्सान एक रॉयल लाइफ का अनुभव करते है । ऑटोमोबाईल के क्षेत्र में विज्ञान कहाँ से कहाँ पहुँच गया है । विज्ञान ने दूरियों को कम कर दिया है । विज्ञान ने एक से बढकर एक उपकरणे बनाये है । इंटरनेट के द्वारा हम कहीं भी बैठकर किसी से भी उसे देखकर बात कर सकते है ।

**मनोरंजन -** विज्ञान ने टीव्ही, विडियो गेम, प्ले स्टेशन निर्माण किया टीवी के बिना अब किसी घर को घर नहीं कहा जाता, जैसे ये हमारे परिवार का हिस्सा बन गया है । टिवी हमारे मनोरंजन का सबसे बडा साधन है । शिक्षा के क्षेत्र में - विज्ञान ने शिक्षा को भी नयी दिशा दी है ।प्रिंटिंग मीडिया अब इतनी आसान हो गई है, इसमे एक बार में हजार पन्ने छपने लगे, जिससे पुस्तक किताब हमें आसानी से कम कीमत में मिल जाती है ।स्मार्ट क्लास कम्प्यूटर की ज्ञान विज्ञान की ही देन है ।

**व्यापार व कृषि -** विज्ञान ने कृषि एवं व्यापार को आज कहाँ से कहाँ लाकर खडा कर दिया है । विज्ञान ने तरह तरह की मशीने बनाई. जिससे बडे बडे उद्योग का निर्माण हो पाया विज्ञान ने आधुनिक कृषि का निर्माण किया हायटेक के जमाने में किसान को बहुत सी सुविधा उपलब्ध कराई जा रही है ।

**विज्ञान एक अभिषाप ।**

**हानियाँ -**

जहाँ लाभ वहाँ हानि तो होती है ।विज्ञान कुछ क्षेत्र में एक अभिशाप साबित हुआ है ।इसने इंन्सान को आलसी बना दिया है । अब हमे बिना हाथ पैर हिलाए मशीन से काम कर लेना पसंद करते है। विज्ञान ने रोबोट तक का निर्माण कर लिया है, तो अपनी हर कमांड पर जो चाहो वो करेंगे इन्सान की तरह दिखने वाली मशीन है ।इन्सान विज्ञान पर इतना ज्यादा निर्भर हो गया है कि वो इसके बिना चलना ही पसंद नही करता है ।

वरील सर्व स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. के.एम. कोतवाल यांचे कुशल मार्गदर्शन लाभले. या सर्व स्पर्धांचे नियोजन विभाग प्रमुख डॉ. बी. टी. दाभाडे व सहाय्यक प्रा. बी. ए. कश्यप यांनी केले होते.

**डॉ. बी. टी. दाभाडे** — विभाग प्रमुख

**प्रा. बी. ए. कश्यप** — सहाय्यक

# जिमखाना विभाग

सन २०१८ - १९ या शैक्षणिक वर्षामध्ये जिमखाना विभागा अंतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात आले. ते पुढील प्रमाणे -

१) विद्यापीठस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या सात विद्यार्थ्यांचा धावणे, गोळा फेक, लांब उडी या क्रीडा प्रकारात सहभाग.

२) पित्तांबरी उदयोग समूह तळवडे यांनी दि. १४ ऑगस्ट २०१८ रोजी घेतलेल्या 'अखंड भारत दौड' या स्पर्धेत महाविद्यालयाचा श्री. योगेश मांजरे (टी. वाय. बी. कॉम) याने तृतीय क्रमांक तर एस. वाय. बी. कॉम च्या श्री. शैलेश पाष्टे व श्री. अक्षय मोरे या विद्यार्थ्यांनी उत्तेजनार्थ पारितोषिके प्राप्त केली.

३) दि. ०५ ऑक्टोबर २०१८ रोजी दापोली येथे झालेल्या विभागीय कबड्डी स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलांचा संघ सहभागी झाला. तसेच दि. ०९ ऑक्टोबर २०१८ रोजी लांजा येथे झालेल्या विभागीय खो - खो स्पर्धेत महाविद्यालयाचा मुलांचा संघ सहभागी झाला. या संघाने प्रथम फेरीत विजय संपादन केला.

४) महाविद्यालयात दि. १६/०१/२०१९ ते १८/०१/२०१९ या कालावधीत वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सांघिक स्पर्धा अंतर्गत खो-खो, कबड्डी, क्रिकेट, रस्सीखेच आणि वैयक्तिक स्पर्धेत १००, २००, ४०० मीटर धावणे, गोळा फेक, थाळी फेक, लांब उडी या क्रीडा प्रकारात महाविद्यालयीन

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

वरील सर्व उपक्रमांसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल, या विभागाचे सदस्य प्रा. बी. ए. कश्यप व प्रा. एस.व्ही. चव्हाण तसेच पाचल येथील क्रीडा शिक्षक श्री. महादेव गुरव सर यांचे खेळाडूंना मार्गदर्शन लाभले.

**प्रा. एस. व्ही. निंबाळकर**
विभाग प्रमुख

# राष्ट्रीय सेवा योजना
# - विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर -

श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे शैक्षणिक वर्ष २०१८ - १९ मधील विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर मु. करक ता. राजापूर येथे दि. १५/१२/२०१८ ते २१/१२/२०२८ या सात दिवसाच्या कालावधीत संपन्न झाले. यावर्षी 'स्वच्छ भारत समृद्ध भारत निर्मितीसाठी युवक' ही मुख्य थीम डोळयासमोर ठेऊन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरासाठी विद्यापीठाने १०० स्वयंसेवकांना मान्यता दिली होती.

**उद्घाटन समारंभ -** दि. १५/१२/२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता या शिबिराचे उद्घाटन करक गावच्या सरपंच सौ. विजया कोटकर, उपसरपंच श्री. सुरेश ऐनारकर संस्थेचे सरचिटणिस श्री. चंद्रकांत लिंगायत, संस्था सदस्य श्री. सिद्धार्थ जाधव व इतर संस्था पदाधिकारी आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व ग्रामस्थ देखील उपस्थित होते. त्यानंतर दुपारच्या सत्रात एन. एस. एस. स्वयंसेवकांना एकत्र घेऊन त्यांचे ग्रुप पाडण्यात आले व प्रत्येक ग्रुपवर सात दिवसाच्या कालावधीतील कामाच्या जबाबदारीचे वाटप करण्यात आले.

**योगा प्रशिक्षण -** कॅम्प मधील सात दिवसाच्या कालावधीत विद्यार्थ्यांमध्ये योगाची माहिती व्हावी यासाठी सकाळी ६ ते ७ या कालावधीत प्रा. वाघमारे, प्रा. पाटील व कु. प्रज्ञा मांजरे यांच्या मार्गदर्शनाखाली योगाचे प्रात्यक्षिक करुन योगा करण्यात आला.

**श्रमदान -** कॅम्प कालावधीत दररोज ८ ते १२ या कालावधीत श्रमदानाचे नियोजन करण्यात आले होते. या मध्ये दत्तक गाव करक येथे पहिल्या दिवसापासून परिसर स्वच्छतेद्वारे श्रमदानाला सुरुवात झाली. त्यानंतर करक ते कारवली तीठ्यापर्यंतचे रस्त्यावरील खड्डे बुजवणे, अर्जुना नदीवर वनराई बंधारा, मांडवकर वाडीत दोन वनराई बंधारे व करक ते मांडवकर वाडीपर्यंत खड्डे भरणे, शोषखड्डे खुदाई, महालक्ष्मी परिसर स्वच्छता असे विविध उपक्रम श्रमदानाद्वारे स्वयंसेवकांनी पूर्ण केले.

**बौद्धिक सत्र -** कॅम्प मधील सात दिवसाच्या कालावधीत बौद्धिक सत्राचे दुपारी ३.३० ते सायं. ५.३० या वेळेत विविध व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये डॉ. पद्मावती डवरी यांनी 'आरोग्याबाबत घ्यावयाची काळजी', डॉ. के. आर. चव्हाण यांनी 'संत गाडगेबाबा एक स्वच्छता दूत', श्री. मोहन नारकर यांनी 'बांबू शेती आणि पर्यावरण समतोल राखणे' व डॉ. राहूल मराठे यांनी 'माझीया मना' व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल यांनी 'जलसाक्षरतेबाबत स्वयंसेवकांची भूमिका' या विविध विषयांवर व्याख्याने दिली. या सर्व व्याख्यानांचे नियोजन स्वयंसेवकांनी केले होते.

**समारोप -** एन. एस. एस. शिबिराचा सांगता समारंभ दि. २१/१२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता

करक येथील ज्येष्ठ नागरिक श्री. शांताराम बांबरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी पितांबरी उद्योगसमुहाचे एम.डी.श्री.रविंद्र प्रभुदेसाई, करक गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, संस्थेचे सरचिटणीस श्री. चंद्रकांत लिंगायत, संस्था सदस्य श्री. संजय जोशी व इतर पदाधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल व इतर प्राध्यापक वर्ग यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी प्रत्येक ग्रुपमधून दोन स्वयंसेवकांनी आपली मनोगते व्यक्त केली. प्रा. पाटील यांनी शिबिराचा आढावा घेतला तर पितांबरी उद्योगसमुहाचे एम. डी. श्री. रविंद्रप्रभूदेसाई यांनी आपला जीवन प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला. त्यामुळे स्वयंसेवकांना त्यांचे मार्गदर्शन एक पर्वणी ठरली. यावेळी काही ग्रामस्थांनी देखील विशेषतः डॉ. भारती वरेकरताई, श्री. रविंद्र वरेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शिबिरातील उपक्रमाविषयी समाधान व्यक्त केले.

अशा रितीने विद्यापीठ नियमानुसार आमच्या महाविद्यालयाचे एन.एस.एस. विभागाचे हिवाळी शिबिर प्रा. पाटील व्ही. एस. व प्रा. डॉ. वाघमारे एस. एस. या कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संस्थाध्यक्ष श्री. मनोहर खापणेसाहेब इतर सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व एन.एस.एस. स्वयंसेवक यांच्या सहकार्याने यशस्वीपणे संपन्न झाले.

**प्रा. व्ही. एस. पाटील** **डॉ. एस. एस. वाघमारे**

कार्यक्रम अधिकारी

# राष्ट्रीय सेवा योजना - नियमित कार्यक्रम

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाची दोन युनिट कार्यरत असून २०० विद्यार्थ्यांनी सन २०१८ - २०१९ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतला आहे. महाविद्यालयात २१ जून २०१८ रोजी योगदिन साजरा करण्यात आला. प्रा. एन जी. देवन यांनी 'यांनी प्रात्यक्षिक व फायदे' याविषयी माहिती दिली. २६ जून २०१८ रोजी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली.प्रा.विकास पाटील यांनी शाहू महाराजांचे जीवन व कार्य' या विषयांवर व्याख्यान दिले. दि. ०७/०७/२०१८ रोजी संगमेश्वर येथील नवनिर्माण महाविद्यालयात वार्षिक नियोजन बैठक संपन्न झाली. त्यात दोन कार्यक्रमाधिकारी सहभागी झाले. प्राचार्य डॉ. के एम.कोतवाल यांनी उद्‌बोधन वर्गात दि. ०३/०८/२०१८ रोजी मार्गदर्शन केले. दि. १९/०७/२०१८ रोजी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण झाले. दि. १५/०८/२०१८ रोजी कुलगुरु श्री. सुहास पेडणेकर यांच्या हस्ते महाविद्यालयाला जिल्हास्तरीय उत्कृष्ट एन. एस. एस. युनिट व उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. दि.१९/०८/२०१८ रोजी दापोली येथे एस. आर. डी. उत्कर्ष निवड शिबिरात तीन विद्यार्थी सहभागी झाले. त्यातील कु. प्रज्ञा मांजरे व योगेश मांजरे यांची पुणे विद्यापीठात होणाऱ्या प्री एस. आर. डी. / एन. आर. डी. शिबिरासाठी निवड झाली. दि. २८/०८/२०१८ रोजी संस्था अध्यक्ष मनोहरजी खापणेसाहेब, रायपाटण सरपंच राजेश नलावडे यांच्या हस्ते २०० बांबू व साग रोपांची लागवड करण्यात आली. दि. २९/०८/२०१८ रोजी केरळ पूरग्रस्तांसाठी १२०००/- ची मदत जमा करण्यात आली. दि. ०९/०९/२०१८ रोजी लांजा महाविद्यालय आयोजित एल. टी. पी. कॅम्पमध्ये २ मुले सहभागी झाली. दि. ८, ९, १० सप्टेंबर २०१८ रोजी पुणे विद्यापीठातून नागपूर विद्यापीठात होणाऱ्या प्री. एन. आर. डी. निवड शिबिरासाठी कु. प्रज्ञा मांजरे हिची निवड झाली. तर योगेश मांजरे याची राखीव साठी निवड झाली. दि. ०९/०९/२०१८ रोजी ११३ कापडी व ५५६ कागदी पिशव्यांचे वाटप पाचल बाजारपेठेत करण्यात आले. दि. १०/०९/२०१८ रोजी रस्ता

सुरक्षा अभियान अंतर्गत सह्याद्रि दर्शन ते महाविद्यालयापर्यंत रस्त्यावरील झाडी तोडण्यात आली. दि. २४/०९/२०१८ रोजी एन्. एस्. एस्. दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. २५/०९/२०१८ रोजी पोस्टर स्पर्धा, २६ रोजी हेल्मेट रॅली, २७ रोजी स्वच्छता रॅली, २८ रोजी ' अवयवदान' या विषयावर व्याख्यान, २९ रोजी रांगोळी स्पर्धा, ३० रोजी मतदार नावनोंदणी करण्यात आली. ०१ ऑक्टोबर रोजी निबंध स्पर्धा ०२ ऑक्टोबर २०१८ रोजी गांधी जयंती व स्वच्छता करण्यात आली. दि. ०३/१०/२०१८ रोजी पाचल बाजारपेठेत 'स्वच्छ भारत सुंदर भारत' या विषयावर पथनाट्य सादर करण्यात आले. दि.११/१०/२०१८ रोजी राजापूर तहसिलदार सौ. प्रतिभा वराळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'मतदार नावनोंदणी अभियान' संपन्न झाले. यावेळी ६० नवमतदारांचे अर्ज मतदान ओळखपत्रासाठी भरण्यात आले. दि.२२/ १०/२०१८ रोजी परुळे खापणेवाडी येथे ' विजय बंधारा' बांधण्यात आला. दि. ०१/१२/२०१८ रोजी 'एड्स दिन' साजरा करण्यात आला. एड्स सप्ताह अंतर्गत आरोग्य तपासणी, एच. बी. व रक्तवाढ करण्याच्या गोळयावाटप, एड्स विषयक जनजागृतीपर पथनाट्य असे उपक्रम घेण्यात आले. दि. ०१/१२/२०१८ रोजी लांजा येथे मीड टर्म मीट मिटींग संपन्न झाली. दि. २५/११/ २०१८ ते ०४/१२/२०१८ या कालावधीत नागपूर येथे प्रज्ञा मांजरे प्री. एन. आर डी. निवड शिबिरात सहभागी झाली. दि. ०२/१२/२०१८ रोजी प्राजक्ता सुतार ही विद्यार्थीनी राज्यस्तरीय कॅम्पमध्ये सहभागासाठी तर प्रज्ञा मांजरे व योगेश मांजरे हे २६ जानेवारी २०१९ रोजी शिवाजीपार्कवरील परेड संचलनामध्ये सहभागी झाले. दिनांक २५ जानेवारी २०१९ रोजी 'मतदार दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. दि. २५ जानेवारी २०१९ ते १० फेब्रुवारी २०१९ या कालावधीत लोकशाही पंधरवड्यानिमित्त मतदान या विषयावर घोषवाक्य स्पर्धा 'आजचा मतदार जागृत की निद्रिस्त' या विषयावर गटचर्चा, 'मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो', या विषयावर काव्यवाचन, 'मतदान सर्व श्रेष्ठदान' या विषयावर निबंधस्पर्धा, नवमतदार शोध मोहिम असे विविध उपक्रम घेण्यात आले.

दत्तक गाव करक, महाविद्यालय परिसर, पाचल बाजारपेठ येथे वेळोवेळी स्वच्छतेचे कार्य केले व स्वच्छते विषयी जनजागृती केली. तसेच वर्षभरात प्रबोधनपर रॅलीज, पथनाट्य, पोस्टरस्पर्धा, निबंधस्पर्धा, काव्यवाचन, आरोग्य तपासणी शिबिर, प्रबोधनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. वर्षभरातील विविध उपक्रम राबविण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे एन.एस.एस. कार्यक्रम समन्वयक प्रा. बी. एस. बिडवे, कार्यालयीन समन्वयक श्री. रमेश देवकर, प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल, मुख्य लिपिक श्री. नरेश पाचलकर, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी, स्वयंसेवक इ. सर्वांचे सहकार्य लाभले. धन्यवाद !

**प्रा. व्ही. एस. पाटील** **डॉ. एस. एस. वाघमारे**

कार्यक्रम अधिकारी

* * *

# नियोजन मंडळ

महाविद्यालयीन युवकांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण व्हावी. या उद्देशाने महाविद्यालयात कार्यरत असणारा एक विभाग म्हणजे नियोजन मंडळ होय. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या विभागाची सहविचार सभा प्रा. डॉ. वाघमारे एस.एस. यांच्या अध्यक्षतेखाली दि. २/७/२०१८ रोजी संपन्न झाली. दि. ११ जुलै २०१८ रोजी ''जागतिक लोकसंख्या दिन'' साजरा करण्यात आला. त्यामध्ये प्रा. डॉ. वाघमारे एस. एस. यांनी ''भारतातील लोकसंख्या वाढ आर्थिक विकासास पूरक की मारक'' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दि. १५/०९/२०१८ रोजी '' वस्तू व सेवा कर'' (GST) प्रणाली याविषयी गटचर्चेचे आयोजन करण्यात आले. दि १/०३/२०१९ रोजी ग्राहक

मार्गदर्शन सोसायटी मुंबई यांच्यामार्फत ''गुंतवणूक साक्षरता'' या विषयांवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ''केंद्रिय अंदाजपत्रक - २०१९ - २०'' या विषयांवर रोख - ठोक चर्चा दि. ३/०२/२०१९ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी अंदाजपत्रकाविषयी आपली मते मांडली.

सदर सर्व कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल यांच्या मार्गदर्शनाखाली व महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या सहकार्याने पार पडले.

**प्रा. डॉ. वाघमारे एस.एस.**
विभाग प्रमुख

# आजीवन अध्ययन व विस्तार कक्ष

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना समाजातील वंचित घटकापर्यंत पोहचण्यासाठी मुंबई विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार कक्ष विभाग (DLLE) कार्यरत आहे. या शैक्षणिक वर्षात या विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबविले गेले. मुंबई विद्यापीठ DLLE विभाग आयोजित प्रथम सत्र प्रशिक्षण डी.जे. सामंत महाविद्यालय पाली येथे संपन्न झाले. या प्रशिक्षण सत्रामध्ये प्रा. बी. ए. कश्यप व डॉ. ए.डी.पाटील हे दि. २४ जुलै २०१८ रोजी उपस्थित राहिले. दि. ०५ ऑगस्ट २०१८ रोजी महाविद्यालयामध्ये प्रथम सत्र प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये डॉ. ए.डी.पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. DLLE विभागांतर्गत 'पर्यावरण पूरक गणपती उत्सव' साजरा केला. यामध्ये निबंध लेखन, फोटोग्राफ्स व समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात आले. दि. ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी विभागाच्यावतीने 'राष्ट्रीय एकता दिन' साजरा केला. यामध्ये प्रा. व्ही. एस. पाटील यांचे 'राष्ट्रीय एकता' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावर्षीची दिवाळी विभागातील विद्यार्थ्यांनी फटाकामुक्त दिवाळी म्हणून साजरी केली. या निमित्ताने दि. ०३ नोव्हें. २०१८ रोजी फटाकामुक्त दिवाळीची शपथ घेणेत आली. तसेच समाज प्रबोधन करणेत आले. दि. ०५ डिसें. २०१८ रोजी मुंबई विद्यापीठ DLLE विभाग आयोजित द्वितीय सत्र प्रशिक्षण संगमेश्वर कॉलेज लवेल येथे संपन्न झाले. यामध्ये प्रा. बी. ए. कश्यप हे सहभागी झाले होते. दि. ०७ जाने. २०१९ रोजी महाविद्यालयामध्ये द्वितीय सत्र प्रशिक्षण विभागांकडील क्षेत्र समन्वयक प्रा. आर. एन्. कांबळे, लांजा महाविद्यालय यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. दि. २५ ते ३० डिसेंबर २०१८ या कालावधीत विभागातील SWS प्रोजेक्ट अंतर्गत महिला सर्वेक्षण करण्यात आले. दि. २५ जाने. २०१९ रोजी विभागातील विद्यार्थ्यांना 'मतदान जागृती शपथ' देण्यात आली. जानेवारी २०१९ मध्ये महाविद्यालयामध्ये स्नेहसंम्मेलनानिमित्त समाज प्रबोधनपर जागृती फेरीमध्ये सहभाग घेतला तसेच खाना - खजाना, रांगोळी स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. मुंबई विद्यापीठ DLLE विभागाच्या वतीने लांजा महाविद्यालय येथे आयोजित 'उडान' फेस्टीवलमध्ये दि. ०७ फेब्रु. २०१९ रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाट्य व पोस्टर मेकिंग स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. दि. १६ जानेवारी २०१९ रोजी तहसिलदार कार्यालय राजापूर यांच्या सहकार्याने VVPAT मतदान प्रात्यक्षिक दाखविणेत आले. दि. ०८ एप्रिल २०१९ रोजी मुंबई विद्यापीठ उपकेंद्र रत्नागिरी येथे प्रकल्प मूल्यमापन प्रक्रियेमध्ये प्रा. बी. ए. कश्यप व डॉ. ए. डी. पाटील यांनी सहभाग घेतला.

**प्रा. बी. ए. कश्यप**
सहाय्यक

**डॉ. ए. डी. पाटील**
विभाग प्रमुख

# ग्रंथालय विभाग

आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये देशाच्या प्रगतीसाठी सुसंस्कृत पिढी तयार करण्याचे काम ग्रंथालये करीत असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात पुस्तकांव्यतिरिक्त इ- बुक, जर्नल, व इंटरनेटद्वारे माहिती मिळत असली तरी ग्रंथबद्ध ज्ञानसाहित्याला पर्याय नाही. ग्रंथामधून ग्रंथबद्ध झालेली माहिती निरंतर असते. अभ्यासकांना आपले ज्ञान वृद्धिंगत करताना त्याचा उपयोग तर होतोच आणि त्यातील वाङ मयातून व्यक्तीची करमणूक व ज्ञान - लालसा भागविण्याचे काम ग्रंथालये करतात. ग्रंथ हेच गुरु, मित्र व मार्गदर्शक असतात. सांस्कृतिक, ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमि जशी ग्रंथालयातून मिळते तसेच ग्रंथ हे भविष्याकडे जाणारे मार्गही दाखवितात.

आपल्या महाविद्यालयातील ग्रंथालयात क्रमिक पुस्तकांशिवाय मोठ्या प्रमाणात संदर्भ ग्रंथ आहेत. त्यात विश्वकोश, ज्ञानकोश, शब्दकोश अशा अनेक दुर्मिळ संदर्भ ग्रंथांचा समावेश आहे. या वर्षी आपल्या ग्रंथालयाने ६४ पुस्तके खरेदी केली आहेत. तर बी.सी.बुक बँक स्कीम मधून ३८ पुस्तके खरेदी केली आहेत. त्यामुळे आतापर्यंत ग्रंथालयातील एकूण ग्रंथसंख्या ७२५५ इतकी झाली आहे.

पश्चिम विभागीय केंद्र व भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद मुंबई यांचेकडून पुस्तक पेढी योजनेअंतर्गत संदर्भ ग्रंथ खरेदी करण्यासाठी सन २०१८-१९ करिता २५०००/- रुपये मंजूर करण्यात आले. तसेच सिताराम जिंदाल फाऊंडेशन बेंगलोर यांच्याकडे पुस्तक पेढी योजनेअंतर्गत देणगी दाखल ग्रंथाची मागणी करण्यात आली.

ग्रंथ, ग्रंथपाल व वाचक ही ग्रंथालयाची त्रिसूत्री असल्याने विद्यार्थी हा घटक मानून त्यांच्या शैक्षणिक कार्यात व भावी जीवनात यशस्वी होण्यासाठी अभ्यासक्रमाशिवाय स्पर्धा परीक्षा, सामान्य बुद्धिमत्ता चाचणी, बँक, रेल्वे, पोलीस निरीक्षकांसाठी उपयोगी पडणारी पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध आहेत. या पुस्तकांचा उपयोग विद्यार्थी, माजी विद्यार्थी व संशोधक करीत आहेत. वर्तमान काळासाठी जगातील ज्ञान मिळावे यासाठी सात मराठी व एक इंग्रजी अशी आठ वर्तमान पत्र व विषयांची वीस जर्नल्स ग्रंथालयात उपलब्ध आहेत. त्याचबरोबर प्रा. डॉ.ए. डी पाटील यांनी 'संशोधक' हे मासिक प्रा. डॉ. बी.टी. दाभाडे यांनी 'शिक्षक वाटचाल' प्रा. व्ही. एस. पाटील यांनी 'मुराळी' आणि प्रा. पी. एस्.मेश्राम यांनी 'लोकराज्य' नियतकालीकाची एकेक वर्षाची वर्गणी देऊन ग्रंथालयासाठी मासिके उपलब्ध करून दिली आहेत.

ग्रंथालयातील प्रवेश रजिस्टरनुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील वाचनसाहित्याचा लाभ घेतला. त्याचबरोबर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही वाचन साहित्याचा लाभ घेतला.

**ग्रंथालयातील सुविधा -**

**१. बी. सी. बुक बँक योजना :**

मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागामार्फत बी. सी. बुक बँक योजनेअंतर्गत मिळालेल्या अनुदानातून मागासवर्गीय विदयार्थ्यांसाठी पुस्तके खरेदी करण्यात आली आहेत. बी. सी. बुक बँक योजनेअंतर्गत एकूण ५७५ पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध असून १०१२०/- रुपये अनुदान सन २०१८-१९ या वर्षासाठी मंजूर झाले आहे.

**२. वाचन कक्ष :**

महाविद्यालयातील ग्रंथालयात विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी वाचन कक्षाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**३. ग्रंथप्रदर्शन :**

दि. १२/०८/२०१८ रोजी डॉ. एस्. आर. रंगनाथन यांच्या जयंती दिनानिमित्त आणि हिंदी पखवडा दिनानिमित्त १४/१२/२०१८ रोजी ग्रंथप्रदर्शन आयोजित

करण्यात आले. या दोन्ही ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल यांच्या हस्ते सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

**४. ग्रंथपाल दिन :**

दि. १२/०८/२०१८ रोजी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथपाल दिनाचे आयोजन करण्यात आले. त्या दिवशी ग्रंथप्रदर्शन, गोल्डकार्ड स्कीम, निबंध स्पर्धा आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ग्रंथालय सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. ए. डी. पाटील व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल उपस्थित होते.

**५. गोल्डकार्ड स्कीम :**

विद्यार्थ्यांच्या वाचनसंस्कृतीत वाढ करण्यासाठी या योजनेअंतर्गत प्रत्येक वर्गातून मागील वर्षी प्रथम, द्वितीय आणि तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता गोल्डकार्ड देण्यात आले. व त्या अंतर्गत वाचनासाठी वर्षभर एक जादा पुस्तक देण्यात आले.

**६.निबंध स्पर्धा :**

ग्रंथालय विभागामार्फत ''वाचन संस्कृती आणि आजचा विद्यार्थी'' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये कु. सलोनी संजय नांदलस्कर (एफ. वाय. बी. कॉम) प्रथम क्रमांक, कु. प्राजक्ता प्रकाश हरळकर (एस. वाय. बी.ए) द्वितीय क्रमांक, आणि कु. अपेक्षा मधुकर कदम (टी. वाय. बी.कॉम.) व प्रसाद राजेंद्र गुरव (एफ. वाय. बी. कॉम) यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केले आहे.

**७.वाचक प्रेरणा दिन :**

दि. १५/१०/२०१८ रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती दिनी ''वाचक प्रेरणा दिन'' साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने एक तास वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते.

**८.सर्वोत्कृष्ठ वाचक स्पर्धा :**

महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी या हेतूने दि. २१/०१/२०१९ रोजी सर्वोत्कृष्ठ वाचक स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये जून २०१८ ते १४/०१/२०१९ पर्यंत वाचलेल्या पुस्तकांवर आधारित स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये कु. प्राजक्ता प्रकाश हरळकर (एस. वाय. बी.ए) प्रथम क्रमांक, कु. अपेक्षा मनोहर चांदे (टी. वाय. बी.कॉम.) द्वितीय क्रमांक आणि कु. मयुरी राजाराम रावनक (एस. वाय. बी. कॉम) हिने तृतीय क्रमांक प्राप्त करून यश मिळविले. या आयोजित उत्कृष्ट वाचक स्पर्धेसाठी प्रा. डॉ. ए. डी. पाटील, प्रा. व्ही. एस. पाटील, प्रा. बी. ए. कश्यप आणि प्रा. एन.जी. देवन यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

**९.बुक रिव्हयू स्पर्धा :**

विद्यार्थ्यांच्या आकलन व वक्तृत्व कौशल्याचा विकास व्हावा यासाठी बुक रिव्हयू स्पर्धेचे आयोजन दिनांक २४/०१/२०१९ रोजी करण्यात आले. विद्यार्थ्यांना स्वतःच्या आवडीचे एक पुस्तक वाचन करून त्यावर सात मिनिटे बोलण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. त्यामध्ये कु.प्राजक्ता प्रकाश हरळकर (एस. वाय. बी.ए) प्रथम क्रमांक, हर्षद भरत खावडकर (एफ. वाय. बी. ए) द्वितीय क्रमांक, कु. अंकिता चंद्रकांत नारकर (एफ. वाय. बी. कॉम) तृतीय क्रमांक व कु. गौरी विजय ठाकूरदेसाई (एफ. वाय. बी. कॉम) उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त करून यश मिळविले. या आयोजित बुक रिव्हयू स्पर्धेसाठी प्रा. एस. व्ही. निंबाळकर आणि प्रा. एन. जी. देवन यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

**१०.दैनिक वर्तमानपत्रांची कात्रणे काढणे :**

विद्यार्थ्यांना दैंनंदिन वर्तमान घडामोडींचे ज्ञान प्राप्त करून देण्यासाठी दररोजच्या वर्तमानपत्रांमधून वेगवेगळया विषयांवर प्रकाशित होणाऱ्या माहितीचे कात्रण काढून फलकावर लावले जाते व नंतर ते फाईलला ठेवली जातात.

**११.ग्रंथालय मार्गदर्शन :**

शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वर्गानुसार मार्गदर्शनाचे कार्यक्रम आयोजित केले जाते. त्यामध्ये ग्रंथालयाचे नियम, अटी व उपलब्ध साहित्याबाबत माहिती दिली जाते.

**१२.लोकराज्य अंकाचे वितरण :**

दि. २७/०२/२०१९ रोजी महाराष्ट्र शासनाद्वारे मिळालेल्या ''लोकराज्य'' या अंकाचे वितरण विद्यार्थ्यांना करण्यात आले. या आयोजित विशेष कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्रा. डॉ. ए. डी. पाटील आणि अध्यक्ष प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल यांनी 'लोकराज्य ' या अंकाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

यावर्षी सन्माननीय ग्रंथदात्यांनी आपल्या ग्रंथसाहित्याचे दान देऊन आमचे ग्रंथालय समृद्ध केले आहे.

**सहकार्य -** प्राचार्य डॉ. के. एम्. कोतवाल

ग्रंथालय सल्लागार समितीचे प्रमुख व सदस्य, विद्यार्थी, कार्यालयीन कर्मचारी, पुस्तकांचे दान-दाते इ. सर्वांच्या सहकार्याने ग्रंथालयाचे दैनंदिन कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यास मदत झाली आहे. या सर्वांचे आभार, धन्यवाद !

**प्रा. डॉ. ए. डी. पाटील** — प्रमुख, ग्रंथालय सल्लागार समिति

**प्रा. मनोहर रामुलु कोंडागुर्ले** — ग्रंथपाल

# हिन्दी अभ्यास मंडळ

सन २०१८-१९ में हिन्दी अभ्यास मंडल की ओर से विभिन्न कार्यक्रमों का आयोजन किया गया ।

विभाग की ओर से शुक्रवार दि. १४ दिसम्बर २०१८ को छात्रों में हिन्दी किताबों को पढने की रुची उत्पन्न हो इस उद्देश्य से 'पुस्तक प्रदर्शनी' का आयोजन किया था । उस समय महाविद्यालय के ग्रंथालय में सिति सभी विभाग की हिंदी पुस्तके प्रदर्शनी में रखी गयी थी । इस प्रदर्शनी का उद्घाटन महाविद्यालय के प्रधानाचार्य डॉ. के. एम. कोतवालजी के हाथों से हुआ । इसी अवसर पर विभाग की ओर से ''हिन्दी साहित्य विश्व की ओर'' इस विषय पर महाविद्यालय में निबन्ध स्पर्धा का आयोजन किया गया । इस प्रतियोगिता में दस छात्र एवं छात्राओंने सहयोग दिया । जिसमें प्रथम क्रमांक के विजेता है - कु. सलोनी संजय नांदलस्कर (एफ.वाय.बी.कॉम.), द्वितीय क्रमांक विजेता है - कु. मिजबा मुस्ताक फकिर (एस.वाय.बी.ए.) तथा तृतीय क्रमांक के विजेता - कु. गौरी संजय ठाकूरदेसाई (एफ.वाय.बी.कॉम.) एवं कु. प्राजक्ता प्रकाश हरळकर (एस.वाय.बी.कॉम.) रहे । विभाग की ओर से ३१ जनवरी २०१९ को अपने महाविद्यालय के नवोदित लेखकों को प्रोत्साहित करने के लिए छात्रोंद्वारा रचित साहित्य से युक्त 'दर्पण' नामक भित्तिपत्रिका का विमोचन हमारे महाविद्यालय के प्रधानाचार्य डॉ. के. एम. कोतवाल के हाथों से किया । जिससे हमारे बहुत छात्र-छात्राएँ लाभान्वित हुए ।

**प्रा. एस्. एस्. धोंगडे**
विभाग प्रमुख

# बी. सी स्कॉलरशिप / बी. सी बुक बँक / मैत्री संघ/ बी सी ॲडव्हायझरी विभाग

महाविद्यालयाच्या बी. सी स्कॉलरशिप / बी. सी. बुक बँक / मैत्री संघ / बी. सी ॲडव्हायझरी विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१८/१९ ची पहिली सभा शनिवार दि. २८/०५/२०१८ रोजी प्राचार्यांच्या कक्षामध्ये घेऊन विभागाच्या कार्याचे वार्षिक नियोजन करण्यात आले. त्यानुसार भारत सरकारचा व विविध सेवा संस्थांकडून

दिल्या जाणाऱ्या स्कॉलरशिप संबंधी वारंवार बैठका घेऊन सूचना फलकावर सूचना लावून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्याचे निश्चित केले. त्यानुसार कार्यवाही सुरु केली. बी.सी. बुक बँक विभागाच्या वतीने महाविद्यालयातील एस्. सी./ एस्.टी / एन्. टी. / ओबीसी विद्यार्थ्यांची नोंदणी घेऊन, विभागाकडे उपलब्ध असलेली ५३७ पुस्तके त्यांना अतिरिक्त एक याप्रमाणे देण्यास सुरु केली. मुंबई विद्यापीठाकडून प्राप्त सन २०१७-१८ चे अनुदान रु. १०,१२०/- मधून विद्यापीठाच्या नियम निकषाप्रमाणे खर्च केले. त्यानुसार रु.७,३३०/- ची ३८ पुस्तके खरेदी करण्यात आली. यावर्षी फर्निचर खरेदी अंतर्गत दोन प्लॅस्टिक खुर्च्या खरेदी करण्यात आल्या. विभागाचे या वर्षाचे लेखा अहवाल ऑडीटरकडे तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे.

शैक्षणिक वर्षात ज्या - ज्या विभागाकडे व स्वयंसेवी संस्थांच्याकडे विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिपसाठी अर्ज केले आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे :

| अ.क्र. | स्कॉलरशिपचे नांव व लाभ देणाऱ्या संस्थेचे नाव | एकूण पाठविलेले अर्ज | प्रत्यक्ष मंजूर अर्ज (लाभार्थी) | प्रत्यक्ष मिळालेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १) | भारत सरकार शिष्यवृत्ती | एस्. सी - २६<br>एन्.टी - ११<br>ओ.बी.सी - ८५ | - | - |
| २) | राजर्षी शाहू शिष्यवृत्ती (E.B.C) | ३९ | | |
| ३) | सुभद्राबाई निधी संस्था, मुंबई | ५८ | ३३ | ९९,०००/- |
| ४) | हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. मुंबई (ही स्कॉलरशिप फक्त एस्. सी./ एस्.टी./ ओ. बी. सी. प्रवर्गासाठी) | २९ | २१ | १,१४,०००/- |
| ५) | ए. एन. जी. सी स्कॉलरशिप | ११ | | |
| **एकूण** | | २५९ | ५४ | २,१३,०००/- |

अशाप्रकारे विभागाच्यावतीने चालू शैक्षणिक वर्षात एकूण २५९ प्रस्ताव स्कॉलरशिपसाठी दाखल करण्यात आहे त्यापैकी स्वयंसेवी संस्थेकडील एकूण ५४ प्रस्ताव मंजूर झाले व त्याच्याद्वारे रु. २, १३,०००/- चा लाभ विद्यार्थ्यांना प्राप्त झाला. सहा. आयुक्त, जिल्हा समाजकल्याण रत्नागिरी यांचेकडून सन २०१५-१६ या वर्षाचा निर्वाह भत्ता, परीक्षा फी व इतर शुल्क परतावा प्रवर्ग ओबीसी लाभार्थी विद्यार्थी १३३ रक्कम रु. ३,३५,४५४, व सन २०१६-१७ प्रवर्ग ओबीसी लाभार्थी विद्यार्थी १२२ रक्कम रु. ३,६२,०००/- ही प्रलंबीत रक्कम प्राप्त करण्यासाठी प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल यांनी सातत्याने पाठपुरावा केला. सदर रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा झाली आहे. कार्यालयीन कनिष्ठ लिपिक श्री. आर. ए. चव्हाण यांचे या विभागाला सहकार्य लाभले.

**प्रा. एस्. एस्. धोंगडे**
विभाग प्रमुख

# स्टाफ ॲकॅडमी विभाग

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाविद्यालयाच्या स्टाफ ॲकॅडमी विभागांतर्गत वैचारिक व बौद्धिक देवाण-घेवाण व्हावी म्हणून महाविद्यालयातील प्राध्यापकांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

शुक्रवार दि. ३१ जुलै २०१८ रोजी प्रा. पी. एस्. मेश्राम यांचे ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व अस्पृश्यांची चळवळ'' या विषयावर व्याख्यान झाले व त्यानंतर त्या विषयावर प्रश्नोत्तरे अशा स्वरुपात शंका समाधान करण्यात आले. शुक्रवार दि. ०१ जानेवारी २०१९ रोजी प्रा. डॉ. एस्. एस्. वाघमारे यांचे ''शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे व उपाय या विषयावर सखोल व्याख्यान झाले. त्यानंतर ह्या विषयावरही उत्स्फूर्त चर्चा करण्यात आली या दोन्हीही कार्यक्रमांचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल यांनी भूषविले. त्यांनी या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**प्रा. एस्. एस्. धोंगडे**
विभाग प्रमुख



**सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करताना प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल, प्रमुख वक्त्या प्र. प्राचार्या कांता कांबळे व इतर मान्यवर.**

**राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल.**



# वैयक्तिक अहवाल

## प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल

१) दि. ९-६-२०१८ रोजी कणकवली कॉलेज कणकवली येथे परीक्षक म्हणून एम. कॉम. भाग २ या वर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रकल्प अहवालावर आधारित तोंडी परीक्षा (Viva-Voce) घेतली.

२) दि. ७-९-२०१८ रोजी गोगटे वाळके महाविद्यालय, बांदा, ता. सावंतवाडी येथे एन.एस.एस. जिल्हास्तरीय निवासी नेतृत्त्व विकास शिबिरामध्ये 'स्वयंसेवकांच्या नेतृत्त्व गुणांचा विकास' या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. दि. ८-९-२०१८ रोजी स्वयंसेवकांना 'योगासने व प्राणायाम' या विषयावर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले.

३) दि. ८-९-२०१८ रोजी गोगटे वाळके महाविद्यालय, बांदा, ता. सावंतवाडी येथील तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गाच्या विद्यार्थ्यांना 'कॉमर्स पदवीधरांसाठी नोकरीच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन केले.

४) दि. २६-९-२०१८ रोजी नवनिर्माण शिक्षण संस्थेचे एस. पी. हेगशेट्ये महाविद्यालय, रत्नागिरी येथे सहाय्यक प्राध्यापक या पदाच्या मुलाखतीसाठी 'विषयतज्ज्ञ' म्हणून कामगिरी पार पाडली.

५) दि. ३-१२-२०१८ रोजी कला व वाणिज्य महाविद्यालय, खारेपाटण आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर चिंचवली येथे 'जलसाक्षरता काळाची गरज' या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

६) दि. २०-१२-२०१९ रोजी श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालय पाचल-रायपाटण आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर करक येथे 'जलसाक्षरतेबाबत स्वयंसेवकांची भूमिका' या विषयावर स्वयंसेवकांना उद्‌बोधन केले.

७) दि. २१-१२-२०१८ आनंदीबाई रावराणे महाविद्यालय, वैभववाडी यथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील परिषदेमध्ये "Growing Steps of BPO & KPO New Horizons for Future Growth" या विषयावर शोध निबंधाचे वाचन केले. सदर निबंध 'Review of Research' या जर्नलमध्ये प्रकाशित झाला.

८) दि. १२-२-२०१९ रोजी छ. शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नेर्ले-तिरवडे येथे स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती व 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

९) दि. २५-२-२०१९ रोजी कला व वाणिज्य महाविद्यालय, खारेपाटण राष्ट्रीय सेवा योजना जिल्हास्तरीय विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर, चिंचवलीयेथे स्वयंसेवकांना 'स्वयंसेवक समाजाशी नाळ जोडणारा दुवा' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच 'योगा व प्राणायाम' या विषयावर प्रात्यक्षिकांसह स्वयंसेवकांना उद्‌बोधन केले.

१०) डिसेंबर २०१८ मध्ये मुंबई विद्यापीठाला "A Critical Study of Performance Evaluation of Jan Shikshan Sansthan in Sindhudurg District" या विषयावर मायनर रिसर्च प्रोजेक्ट सादर केला.

## प्रा. डॉ. ए. डी. पाटील

१) दि. २४ जुलै २०१८ रोजी आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, मुंबई विद्यापीठ यांनी आयोजित केलेल्या प्रथमसत्र प्रशिक्षणामध्ये डी. जे. सामंत महाविद्यालय, पाली येथे सहभाग.

२) दि. ५ ऑगस्ट २०१८ रोजी श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल येथे आजीवन अध्ययन व विस्तार कार्य

विभागाच्या प्रथम सत्र प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.

३) डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीच्या निमित्ताने ग्रंथालय विभाग आयोजित कार्यक्रमामध्ये 'डॉ. रंगनाथन यांचे कार्य' या विषयावर १३ ऑगस्ट २०१८ रोजी व्याख्यान.

४) दि. १५ ऑक्टोबर २०१८ रोजी वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने 'वाचन संस्कृतीचे जतन' या विषयावर श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये व्याख्यान.

५) मुंबई विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाकडून रत्नागिरी जिल्हा क्षेत्र समन्वयक म्हणून निवड.

६) मुंबई विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या नियोजन बैठकीमध्ये २३ ऑक्टोबर २०१८ रोजी सहभाग.

७) दि. २१ डिसेंबर २०१८ रोजी आनंदीबाई रावराणे महाविद्यालय, वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग येथे एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये 'कीर्तन : मध्ययुगीन महाराष्ट्रातील अध्यात्मिक मनोरंजनाचा लोकप्रिय प्रकार' या शोधनिबंधाचे वाचन.

८) रिसर्च जर्नी या आंतरराष्ट्रीय 'ई रिसर्च जर्नलमध्ये 'कीर्तन : मध्ययुगीन महाराष्ट्रातील अध्यात्मिक मनोरंजनाचा लोकप्रिय प्रकार' हा शोधनिबंध प्रकाशित.

९) दि. ७ जानेवारी २०१९ रोजी श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालय पाचल येथे आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या द्वितीय सत्र प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन.

१०) दि. ७ फेब्रुवारी २०१९ रोजी कला व वाणिज्य महाविद्यालय, लांजा येथे आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या 'उडाण' महोत्सवामध्ये सहभाग.

११) दि. ८ मार्च २०१९ रोजी महिला विकास कक्ष, खापणे महाविद्यालय येथे महिला दिनाच्या निमित्ताने 'महाराष्ट्रातील कर्तबगार स्त्रियांचे कार्य' या विषयावर मार्गदर्शन.

१२) दि. ५ मार्च २०१९ रोजी पू. साने गुरुजी महाविद्यालय पालगड, ता. दापोली येथे क्षेत्र भेट आणि आजीवन अध्ययन व विस्तार कार्य विभागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.

१३) मुंबई विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आयोजित प्रकल्प मूल्यमापन प्रक्रियेमध्ये दि. ८ एप्रिल २०१९ रोजी मुंबई विद्यापीठ, रत्नागिरी उपकेंद्र येथे सहभाग.

## प्रा. पी. एस. मेश्राम

१) दि. २१-१२-२०१८ रोजी 'उच्च शिक्षणातील उणिवा' गोगटे जोगळेकर कॉलेज, रत्नागिरी व फिनोलेक्स कॉलेज रत्नागिरी येथे झालेल्या मा. शिक्षणमंत्री, विनोद तावडे यांच्या मिटींगमध्ये विद्यार्थ्यांसमवेत सहभाग.

२) पाचल - श्रावस्तीनगर येथे दि. ६ डिसेंबर २०१८ रोजी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेले सत्याग्रह व चळवळ' या विषयावर व्याख्यान दिले.

३) दि. २१ फेब्रुवारी २०१९ रोजी ग्रामपंचायत पाचल येथे आयोजित केलेल्या निवृत्त जिल्हा न्यायाधिश मा. डी. एस. जामखेडकर यांच्या कायदेविषयक शिबिरास उपस्थिती.

४) महाविद्यालयातील 'स्टाफ ॲकॅडमी' मार्फत दि. ३१-७-२०१८ रोजी आयोजित व्याख्यानमालेत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व अस्पृश्यांची चळवळ' या विषयावर मार्गदर्शन केले.

## प्रा. एस. व्ही. निंबाळकर

१) दि. २१ डिसेंबर २०१९ रोजी ग्रंथालय, विज्ञान आणि तंत्रज्ञान, मानव्यशास्त्रे, वाणिज्य आणि

व्यवस्थापन यातील नवीन बदल' या संकल्पनेवर आधारित आनंदीबाई रावराणे महाविद्यालय, वैभववाडी येथे आयोजित एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभाग व शोधनिबंध वाचन. विषय - ''प्राध्यापकीय हिंदी''

२) ई-जर्नल ''Research Journey'' (रिसर्च जर्नी) डिसेंबर २०१८ च्या अंकात 'प्राध्यापकीय हिंदी' या विषयावर शोध निबंध प्रकाशित. (ISSN No. 23487143)

# प्रा. व्ही. एस. पाटील

१) दि. ७ मे ते १६ मे २०१८ पर्यंत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आयोजित ब्रीजकोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला.

२) दि. २४ जून २०१८ रोजी महावीर महाविद्यालय कोल्हापूर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात 'कोकणी भाषा व संस्कृती' या विषयावर शोधनिबंध वाचन केले.

३) दि. ७ जुलै २०१८ रोजी कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय संगमेश्वर येथे एन.एस.एस. विभागाच्या वार्षिक नियोजन बैठकीत सहभाग.

४) दि. १७ जुलै २०१८ रोजी तृतीय वर्ष कला - मराठी पेपर क्र.VI व VII च्या बदललेल्या अभ्यासक्रमावर महाविद्यालयात घेण्यात आलेल्या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम पाहिले.

५) दि. ३० जुलै २०१८ रोजी सुगंधी व समृद्ध कोकण विकास मंच, तळवडे आयोजित निबंध स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले.

६) दि. १५ ऑगस्ट २०१८ रोजी रत्नागिरी जिल्हा उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार मा. कुलगुरु डॉ. सुहास पेडणेकर यांच्याहस्ते विद्यापीठात मिळाला.

७) दि. २३ ऑगस्ट २०१८ रोजी 'आई आधार केंद्र', ओणी यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत परीक्षक म्हणून काम पाहिले.

८) दि. ०४ सप्टेंबर २०१८ रोजी कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, लांजा आयोजित नेतृत्व प्रशिक्षण शिबिरात 'शिबिरांचे आयोजन' या विषयावर व्याख्यान दिले.

९) दि. २२ सप्टेंबर २०१८ रोजी श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय कोल्हापूर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत 'मराठी भाषेपुढील समस्या व आव्हाने' या विषयावर शोधनिबंध वाचन केले.

१०) दि. ४ ऑक्टोबर २०१८ रोजी महाराष्ट्र शासन (रत्नागिरी जिल्हा) व नवनिर्माण महाविद्यालय रत्नागिरी आयोजित 'युवा माहिती दूत' कार्यक्रमात सहभाग.

११) दि. १ डिसेंबर २०१८ रोजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लांजा येथे एन. एस. एस. विभाग आयोजित अर्धवार्षिक आढावा बैठकीत सहभाग.

१२) दि. १३ मार्च २०१८ रोजी चांगुकाना ठाकूर महाविद्यालय पनवेल येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मूल्यमापन सत्रात सहभाग.

# प्रा. डॉ. बी. टी. दाभाडे

१) विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ व गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ जुलै २०१८ रोजी युवा महोत्सव सांस्कृतिक कार्यशाळेत सहभाग.

२) मुंबई विद्यापीठ व राजेंद्र माने इंजिनिअरिंग कॉलेज, आंबव-देवरुख, जि. रत्नागिरी येथे दिनांक ६ ऑगस्ट २०१८ रोजी आयोजित केलेल्या युवा महोत्सव कार्यक्रमात सहभाग.

३) ग्रंथालय, विज्ञान आणि तंत्रज्ञान, मानव्यशास्त्र, वाणिज्य आणि व्यवस्थापन यातील नवीन बदल या संकल्पनेवरील आधारित आयोजित केलेल्या दिनांक २१ डिसेंबर २०१८ रोजी आनंदीबाई रावराणे महाविद्यालय, वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग येथे आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये 'व्यवहार भाषा व वाङमयाची भाषा यांचे तौलनिक अध्ययन' या विषयावर शोध निबंध सादर.

४) मराठी अभ्यास मंडळ, मुंबई विद्यापीठ आणि मराठी विभाग, श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य

महाविद्यालय, पाचल-रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ जुलै २०१८ रोजी तृतीय वर्ष, कला मराठी विषयाच्या अभ्यासपत्रिका क्रमांक ०६ व ०८ च्या पुनर्रचित अभ्यासक्रमावर एक दिवसीय कार्यशाळेचे सहसमन्वयक म्हणून काम पाहिले.

५) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठ, नाशिक यांच्या मार्फत घेण्यात आलेली एम. ए. विषय संप्रेषण ही पदवी संपादन केली.

६) दि. २१ फेब्रुवारी २०१९ रोजी ग्रामपंचायत पाचल येथे आयोजित केलेल्या निवृत्त जिल्हा न्यायाधीश मा. डी. एस. जामखडेकर यांच्या कायदेविषयक शिबिरास उपस्थिती.

७) दि. १ मार्च २०१९ रोजी महाविद्यालयामध्ये आयोजित केलेल्या ग्राहक मार्गदर्शन सोसायटी, मुंबई व बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आयोजित 'ग्राहक जागृती व गुंतवणूक साक्षरता' या कार्यशाळेमध्ये सहभाग.

## प्रा. एस. एस. धोंगडे

१) दि. २१ फेब्रुवारी २०१९ रोजी ग्रामपंचायत पाचल येथे निवृत्त जिल्हा न्यायाधीश मा. डी. एस. जामखेडकर यांच्या कायदेविषयक शिबिरास उपस्थिती.

२) दि. १ मार्च २०१९ रोजी महाविद्यालयामध्ये आयोजित ग्राहक मार्गदर्शन सोसायटी मुंबई व बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आयोजित 'ग्राहक जागृती व गुंतवणूक साक्षरता' या सेमिनारमध्ये सहभाग.

## M. R. Kondagurle

**- Librarian -**

1. Article title 'Application of Data Mining in Library and Information Science Field' Published in One Day International Multidisciplinary Conference held by Anandibai Raorane Arts, Commerce, Science College Vaibhavwadi and UGC approved journal 'Research Journey' International Multidisciplinary E-research Journal, December 2018. ISSN : 2348-7143.
2. Article title 'Conceptual Study of Data Warehouse : Perspective of Library and Information Center's published in UGC Approved Journal 'Review of Research' December 2018. ISSN : 2249-894X.
3. Attended Workshop of Exam Department on OSM System Organized by University of Mumbai held in Gogate-Jogalekar College, Ratnagiri on 29-09-2018.
4. Minor Research Project Title : 'A Study of Profesional Attitudes of Librarians Towards ICT : A Survey of Degree College Libraries from Arts Faculty in Ratnagiri District' Sanctioned by University of Mumbai. Letter Ref. No. APD/2367/601 of 2019 Dated : 27th March, 2019 of Rs. 30000/-, Project No. 300.

## प्रा. डॉ. एस. एस. वाघमारे

१) दि. ७-७-२०१८ रोजी मुंबई विद्यापीठ आणि संगमेश्वर महाविद्यालय आयोजित रत्नागिरी जिल्हा एन.एस.एस. विभाग वार्षिक नियोजन सभेमध्ये सहभाग.

२) दि. ५-९-२०१८ रोजी मुंबई विद्यापीठ आणि लांजा महाविद्यालय आयोजित रत्नागिरी जिल्हास्तरीय एलटीपी कॅम्पमध्ये 'शिबिरपूर्व तयारी' या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन.

३) दि. ४-१०-२०१८ रोजी महाराष्ट्र शासन (रत्नागिरी विभाग) आणि नवनिर्माण महाविद्यालय रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'युवा माहिती' कार्यशाळेत सहभाग.

४) दि. १-१२-२०१८ रोजी लांजा महाविद्यालय लांजा आयोजित रत्नागिरी जिल्हास्तरीय अर्धवार्षिक सभेमध्ये सहभाग.

५) महाविद्यालयातील 'स्टाफ ॲकॅडमी' मार्फत दि. ११-१-२०१९ रोजी आयोजित व्याख्यानमालेत 'भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंता व चिंतन' या विषयावर मार्गदर्शन.

६) दि. २३ व २४ फेब्रुवारी २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन आणि पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्टीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी राज्यस्तरीय कार्यशाळेत सहभाग.

७) दि. २१-२-२०१९ रोजी दैनिक लोकमत (रत्नागिरी आवृत्ती) मध्ये 'केंद्रिय अंदाजपत्रक' याविषयी लेख प्रकाशित.

# प्रा. बी. ए. कश्यप

१) दि. २४ जुलै २०१८ रोजी डीएलएलई विभाग, मुंबई विद्यापीठ आयोजित प्रथम सत्र प्रशिक्षणासाठी डी. जे. सामंत महाविद्यालय, पाली या ठिकाणी उपस्थिती.

२) दि. ०८ सप्टेंबर २०१८ रोजी दापोली अर्बन बँक, कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय दापोली येथे 'अविष्कार' संशोधन कार्यशाळेमध्ये सहभाग.

३) दि. २ ऑक्टोबर २०१८ रोजी म. गांधी जयंतीनिमित्त श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय पाचल येथ 'देशाच्या विकासातील महात्मा गांधीजींचे योगदान' या विषयावर व्याख्यान दिले.

४) दि. १० नोव्हेंबर २०१८ रोजी शाहू स्मारक भवन - दसरा चौक, कोल्हापूर येथे निर्मिती विचारमंच व राष्ट्राधार सोशल फौंडेशन' आयोजित 'भारतीय संविधान समजून घेताना' या राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभाग.

५) दि. २६ नोव्हेंबर २०१८ रोजी संविधान दिनानिमित्त आयोजित 'भारतीय संविधान' या विषयावर श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय पाचल येथे व्याख्यान दिले.

६) दि. ५ डिसेंबर २०१८ रोजी डीएलएलई विभाग मुंबई विद्यापीठ आयोजित द्वितीय सत्र प्रशिक्षणासाठी संगमेश्वर कॉलेज लवेल येथे सहभाग.

७) दि. ७ फेब्रुवारी २०१९ रोजी डीएलएलई विभाग मुंबई विद्यापीठ आयोजित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लांजा येथे 'उडान' महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांसमवेत सहभाग.

८) दि. १३ फेब्रुवारी २०१९ रोजी छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नेर्ले-तिरवडे येथे दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाच्या निमित्ताने प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती.

९) दि. २१ फेब्रुवारी २०१९ रोजी ग्रामपंचायत पाचल येथे निवृत्त जिल्हा न्यायाधीश मा. डी. एस. जामखेडकर यांच्या कायदेविषयक मार्गदर्शन शिबिरास उपस्थिती.

१०) दि. १ मार्च २०१९ रोजी महाविद्यालयामध्ये आयोजित ग्राहक मार्गदर्शन सोसायटी, मुंबई व बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आयोजित 'ग्राहक जागृती व गुंतवणूक साक्षरता' या कार्यशाळेत सहभाग.

११) दि. ०८ एप्रिल २०१९ रोजी डीएलएलई विभाग, मुंबई विद्यापीठ आयोजित उपकेंद्र रत्नागिरी येथे प्रकल्प मूल्यांकन प्रक्रियेमध्ये सहभाग.

# प्रा. एस. व्ही. चव्हाण

१) दि. १७ जून २०१९ रोजी चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पनवेल-नवी मुंबई येथे आयोजित केलेल्या एकदिवसीय एस. वाय. बी. कॉम. 'अकौन्टन्सी' या विषयाच्या बदलता अभ्यासक्रम या कार्यशाळेत सहभाग.

२) दि. २१ फेब्रुवारी २०१९ रोजी ग्रामपंचायत पाचल येथे निवृत्त जिल्हा न्यायाधीश मा. डी. एस. जामखेडकर यांच्या कायदेविषयक मार्गदर्शन शिबिरांस उपस्थिती.

३) दि. १ मार्च २०१९ रोजी महाविद्यालयामध्ये आयोजित ग्राहक मार्गदर्शन सोसायटी मुंबई व बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आयोजित 'ग्राहक जागृती व गुंतवणूक साक्षरता' या कार्यशाळेत सहभाग.






**पारंपरिक वेशभूषा कार्यक्रमातील क्षण**